Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ६ माहे दिसेंबर सन १९१५ ई० [ अंक ४४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें[?] त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥।≈ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं०.५

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

---

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो०-न० ३

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून[?] येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा, अग्रफुलें साखळी व बायकांचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापर

नो. नं १९२

---

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशीं ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठिण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रकारिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशीकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## कोकशास्त्र अथवा
## जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हे पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. [?] आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

# आठ आण्यांत लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील. )

१ कोकविद्या—सचित्र व समग्र कोकशास्त्र.
२ रसायनविद्या—सोनें चांदी व मात्रण्याची युक्ति
३ मंत्रविद्या—मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.
४ मृतार्शी संभाषण करण्याची युक्ती.
५ गानविद्या—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या
वशीकरण—विद्या.

पत्ता—स्पष्ट व बालबोधींत लिहावा.
प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.

सर्व बालरोगांवर वस्ताद.

# बालामृत

वटिका.

एकच वेळ वापरण्याची शिफारस. खोटें ठरविणारांस शेकडों रुपये बक्षीस देण्याइतके आह्मी श्रीमंत नाहीं. परंतु साहेब, एकदाच खात्री करून पहा. २० गो. किं. -।- टॅ. ख. वेगळा. प्रत्येक शिशी सोबत इनामाचें १ टिकीट बक्षीस. निकाल १००० बाटल्या खपतांच. बक्षीसें १००० रोख. खुलासा आजच मागवा.

चालक—बालामृत डेपो
आकोला आगरवेस


## पत्रव्यवहार.

श्री संपादक जी बरारसमाचार
कृपा करके इस लेख को अपने अमूल्य पत्रमें छापकर कृतार्थ करें।

### वर्तमान युद्ध और साधु फकीर।

भयानक युद्धके कारण उपस्थित हुए इस नाजुक समय मे प्रत्येक भारत—वासी का यह कर्तव्य है कि वह यथा सम्भव ब्रिटिश सरकार की सहायता करे। धनी लोग धन से सहायता करसके है, किन्तु लाखो ऐसे गरीब भी हैं कि जिनकी सेवायों को अगर भली प्रकार उपयोग में लायाजाए तो वह भी उपयुक्त विधियोंसे सहायता करसक्ते हैं। इस युद्ध के मौकेपर भारत के साधु और फकीरों की सेनायों को काम में लाने की ओर में इम्पीरियल रिलिफफण्ड और भारत के हित—चिन्तक एवं राज भक्त नागरिकों का ध्यान आकर्षित कराता हूं। यद्यपि साधु और फकीर लड नहीं सक्ते किन्तु जैन एम्बुलेन्स कोर्प्स में भरती कर घायलों की टहल सेवा के लिए शिक्षित किए जासके हैं। युद्ध काल की दीर्घता से अनुमान होता है कि घायलों की संख्या बहुत ज्यादा होंगी। मुझे साधुयों और फकीरों के साथ अधिक वास्ता रहता है इसलिए मैं अपने चिरकाल के अमली अनुभव से कहसक्ता हूं, कि अगर उनकी सेवायों को उपयोग में लाकर उन्हें उपयोगी बनाने की ओर विशेष ध्यान दिया जाए तो वह सहर्ष सेन्ट जौन एम्बुलैन्स कोर्पस में भरती होनें को उद्यत होजाएं गें।

मुझे आशा है कि भारत के हितचिन्तक और राजभक्त नागरिक मेरी इस सलाह से पुरी सहानुभूति रखते होंगे।

### भारत में शिल्प की आवश्यकता.

भारत में शिल्प के नए कारखाने खोलने की भारी जरूरत है। हम इस बारे में भारत का जापान से मुकाबला करते हैं। जापान में साधारण आदमियो ने जो ४० वर्ष पहले भारत निवासियों से न ज्यादा हुनरवर और न बुद्धिमान् थे, शिल्प के बहुत से काम जारी किए और बीस साल में ही उन्नत हो गए। अब यूरोप की तमाम चीजें अपने देश में तैयार करते हैं। हिन्द के लोग भी तब तक सुखी न होंगे जब तक वह शिल्प के क्षेत्र में आगे न बढेंगे और इस बात को अच्छी तरह से अनुभव न करेंगे कि हिन्दोस्तान में हर प्रकार के कारखाने खोले जायँ और उनको तरक्की दी जाय। तब भारत अपनी प्राचीन उन्नति को प्राप्त करेगा। आज कल हमारे इस्तेमाल की हर एक वस्तु विदेश से मङ्गवाई जाती है। आज तक जिस कदर कारखाने खोले गए हैं उन में से बहुत तो विदेश के रुपये से खोले गए हैं। इस प्रकार के कारखानों से भारत को कोई लाभ नहीं पहुंचता। क्योंकि विदेश के रुपयों से कारखाने चलाने में सब लाभ देश के बाहिर चला जाता है। जरूरत इस बात की है की हिन्दोस्तान का अपना रुपया कारखानों की तरक्की में लगे। भारत में निस्सन्देह धन मौजूद है परन्तु इस लाभदायक कामों में नहीं लगाया जाता। यदि यह रुपया शिल्प कारखानों में लगाया जाय, तो इन कारखानों की बहुत तरक्की होगी और साथ ही देश का धन भी बढेगा, और अवस्था भी सुधर जायगी। यदि हमारे राजे महाराजे और जागीरदार और धनाढ्य अपने रुपये को व्यर्थ दबाने या स्त्रियों के भूषण बनाने की पुरानी आदत को छोडकर इस मुफीद कामों मे लगाने की आदत बनाने का प्रयत्न करें तो वह अपने देश की भारी सेवा करेंगे। तब दुर्भिक्ष का भी प्रबन्ध हो जायगा। भारत में सम्भवतः कोई फिर्का ऐसा नहीं है, जिसने भारत की तरक्की के लिये इस कदर यत्न किया हो जितना पारसियों ने। इन्होंने अपनी पूंजी को कारखानों और तिजारत में लगा रक्खा है। पारसियों की संख्या सारे भारत में केवल दो लाख है। तो भी यह अत्युक्ति नहीं कि उन्होंने हिंदुस्तान में कारखाने खोलने की तमाम दूसरे फिरकों की निस्बत ज्यादा कोशिश की है। न उनमें कोई साधु है और न कोई भिक्षा पर गुजारा करता है। और न उनकी स्त्रियों में कोई वेश्या है। हालाँ कि अन्य तमाम फिरकों और जातियों कि वेश्यायें भारत में मौजूद है। क्योंकि इस गरीबी के कारण कई उंची जातों की स्त्रियां वेश्या बन गई हैं। इन सब खराबियों का इलाज यह है कि देश में हर प्रकार के कारखाने हिंदुस्तानी पूंजी से जारी किये जांय और उनकी तरक्की के लिये भारतीयों को दृढ निश्चय कर लेना चाहिये और अपने देश की बनी हुई चीजें इस्तेमाल करना चाहिये।

भवदीय
टहलराम गङ्गाराम
जमींदार डेरा इस्माइल खां


वऱ्हाडसमाचार

मिति कार्तिक वद्य ३० शके १८३७


### केवळ वऱ्हाडांतील शेतकऱ्यासाठीं.

गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थानांतल्या शेतकीची सुधारणा करण्याचे कामीं सरकारच्या प्रयत्नास कसें उत्तम यश प्राप्त झालें आहे याचें विवेचन मि. मॅकिना यांचे रिपोर्टाचे आधारें मागच्या अंकांत आह्मी केलेंच आहे. या यशाची खरी गुरुकिल्ली येथें आहे कीं शेतकी खात्याचे अधिकारी अलीकडे शेतकऱ्यांमध्यें मिसळून व त्यांची खरी स्थिति काय आहे व त्यांना काय पाहिजे याची माहिती करून घेऊन त्या धोरणानें इकडच्या परिस्थित्यनुरूप योग्य ती सल्ला शेतकऱ्यांना दिली पाहिजे हें कर्तव्य ओळखूं लागले आहेत. ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. तथापि त्यांच्या प्रयत्नांत अद्याप एक उणीव राहिलेली दिसते. ती जर ते भरून काढतील तर शेतकी खात्यासारखें लोकोपयोगी खातें पोस्ट आफिस व न्यायखातें याशिवाय आणखी कोणतें ही नाहीं असें ह्मणण्यास हरकत येणार नाहीं. ही उणीव ह्मणजे शेतकी खात्याचे अधिकारी वेळोवेळीं शेतकऱ्यांना सूचना ह्मणून जीं पत्रकें वेळोवेळीं इंग्रजींत प्रसिद्ध करीत असतात, त्यांचें शेतकऱ्यांच्या भाषेत भाषांतर करून तीं त्यांना समजावून देण्याची तजवीज करणें ही होय. आमच्या शेतकऱ्यांना इंग्रजी तर काय, पण मराठी सुध्दां वाचतां येत नाहीं. अशा स्थितींत इंग्रजींत काढलेल्या पत्रकांचा त्यांना काय उपयोग? हींच पत्रकें मराठींत लिहून गांवोगांवीं ग्रामाधिकाऱ्याकडे पाठविलीं, आणि गांवकऱ्यांना संध्याकाळीं चावडींत बोलावून त्यांना तीं समजावून देण्याची व त्यांच्या शंका ऐकून त्या शेतकी खात्याकडे कळविण्याची तजवीज करण्यांत आली तर त्या पासून खरा खरा फायदा होईल. हा फायदा किती होईल याचा अंदाज आज करतां येणें अशक्य आहे पण तो पुष्कळ होईल यांत शंका नाहीं. प्रांतांतल्या वर्तमान पत्रकर्त्यांनीं हें काम करावें तर आमच्या व्यवसायबंधूंपैकीं बहुतेकांचें लक्ष लढाई, राजकीय हक्क, व परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या इ. गोष्टींनीं इतकें वेधिलेलें असतें कीं घरच्या या उपयुक्त कामाकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसतच मिळत नाहीं! शिवाय सरकारनें काढलेलीं सर्वही पत्रकें ही त्यांच्या कडेस जात नाहींत. दुसऱ्यांसंबंधानें आह्मी बोलत नाहीं, पण स्वतः पुरतें आह्मी सरकारला हें आश्वासन देण्यास तयार आहों कीं सरकारी अधिकारी जर शेतकऱ्यांना उपयुक्त होईल अशी माहिती इंग्रजींत अगर मराठींत आमचेकडे पाठवितील तर आमच्या वाचकांत ( यांत पुष्कळ शेती करणारे गृहस्थ आहेत ) तिचा प्रसार करून सरकारच्या प्रयत्नाशीं सहकारिता ठेवण्यास आह्मी कदापि मागें पाऊल घेणार नाहीं.

वरील उद्गार काढण्यास कारण आमच्या एका स्नेह्याकडून वाचण्यासाठीं आणिलेला व शेतकीखात्याचे डायरेक्टर साहेब यांच्या हुकुमानें प्रसिद्ध झालेला ॲग्रिकलचरल व को आपरेटिव्ह गॅझेटचा नोवेंबरचा अंक होय या अंकांत येथील शेतकी खात्याचे अधिकारी रावसाहेब बी. एल. दुबे एल. एजी. इ. ए. डी. यांनीं आक्टोबर महिन्यांत वऱ्हाडांतल्या शेतकऱ्यांनीं कोणकोणत्या गोष्टी करावयास पाहिजेत. त्यांविषयींची फार उपयुक्त माहिती दिली आहे. पण या आक्टोबर महिन्यांत उपयुक्त झाल्या असत्या अशा गोष्टी सदर म्यागेझिनच्या द्वारें नोवेंबरच्या अखेर इंग्रजींत प्रसिद्ध होत आहेत, आणि मराठींत त्यांचें भाषांतर करून दिसेंबरमध्यें आह्मी लोकांना वाचण्यास देणार! अशा रीतीनें योग्यवेळीं शेतकऱ्यांना ही माहिती कशी मिळणार व 'वरातीमागून घोडे' या ह्मणीप्रमाणें त्या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना काय होणार? यासाठीं सदर माहिती योग्यवेळीं शेतकऱ्यांच्या कानीं जाईल अशी तजवीज सरकारी अधिकाऱ्यांनीं करावयास पाहिजे, व ही तजवीज शेतकऱ्यांच्या हितासाठीं ह्मणून मुद्दाम मोठा खर्च करून ठेविलेल्या शेतकी खात्याकडून योग्य प्रकारें होत आहे कीं नाहीं हें ही वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं पाहिलें पाहिजे. येवढी आमची त्यांस नम्रपणाची विनंति आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या पत्रकांतली माहिती शेतकऱ्यांच्या हातीं पडली असती तर किती उपयुक्त झाली असती हें दाखविण्यासाठीं या माहितीचा थोडासा मासला आह्मी येथें मुद्दाम भाषांतर करून देतों कापसाविषयीं या पत्रकांत पुढील सूचना आहेत—

नोवेंबर महिन्यांत कापूस वेंचण्याचें काम तुह्मी सुरू केलें असेल. कापूस जितका स्वच्छ वेंचतां येईल तितका वेंचा. तो वेंचण्याचे वेळीं वऱ्हाडांत नीट काळजी न घेतल्यामुळें तो अस्वच्छ असतो असा वऱ्हाडचा दुर्लौकिक झालेला आहे. स्वच्छ कापसाला भाव ही अधिक येतो व तुमच्या श्रमाचा योग्य मोबदला तुह्मांला मिळतो.

रोझिया कापूस पिकविणारांनीं त्या कापसाचें निर्भेळ बी जपून ठेवण्याविषयीं सावध असावें. कारण रोझिया या नांवाखालीं अशुद्ध कपाशीचें बीं विकणारे पुष्कळ लबाड लोक असतात. असे लबाड लोक आढळल्यास त्यांचीं नांवें मे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकलचर, वेस्टर्न सर्कल, नागपूर यांचेकडे कळवावीं.

हें कापसाविषयीं झालें. मोठा जपानी भुईमूग पिकविणारांना ही अशाच कित्येक उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्या अशा—

झाडें प्रथम मुळांसकट उपटावीं, व जितक्या मिरतील तितक्या शेंगा काढून घ्याव्या. मग बैलाच्या दोन जोड्यांनीं उचलल्या जागाच्या जड वखरानें जमेन वखरवी. त्यानें जमीनीचीं ढेंकळें मोकळीं होऊन त्यांना सूर्याची उष्णता चांगली. मिळेल, व कांहीं शेंगा ही आणखी हातीं लागतील.

याच अंकांत टर्नवेस्ट नांवाचा नांगर वापरल्यापासून शेतकऱ्यांना पैशाच्या दृष्टीनें कसा फायदा आहे व हा नांगर कोठें मिळेल याची ही माहिती दिली आहे. माहिती उपयुक्त आहे. पण ती योग्यवेळीं हातीं न पडल्यामुळें शेतकऱ्यांना तिच्यापासून फायदा करून घेतां येत नाहीं. या साठीं आमच्या सूचनेचा विचार सरकारनें जरूर करावा व आमच्या सारख्या वर्तमानपत्रकर्त्यांना तीं माहिती आगाऊ देण्याची तजवीज करावी ह्मणजे आह्मी ती प्रसिद्ध करून सरकारच्या स्तुत्य प्रयत्नास हातभार लावूं.

---

## एका शास्त्रीय शोधाचा इतिहास.

'सोन्याची परीक्षा अग्नींत' ठेवण्यांत परमेश्वराचा हेतु आहे. तसाच ज्ञानाच्या साम्राज्यांत ही खऱ्या सोज्वल शोधाची परीक्षा अनेक संकटांतून पार झाल्यावर व्हावयाची असें करण्यांत परमेश्वराचा थोर हेतु असला पाहिजे. तसें नसतें तर खरा शोधक व भोंदू शोधक यांच्यांतला भेद ओळखणें कठीण झालें असतें. आमचे त्रिखंडी कीर्ति गाजविलेले हिंदी शास्त्रज्ञ, कलकत्याचे प्रोफेसर जगदीश चंद्र बोस हे या सत्त्वपरीक्षेतून उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले हें ऐकून कोणा हिंदीवासियाला आनंद व अभिमान वाटणार नाहीं. इंग्रज लोक गुणज्ञ आहेत, व त्यांच्या कडून तरी खऱ्या गुणवान् माणसाला उत्तेजन मिळेल अशी कित्येकांची समजूत आहे. पण सत्त्वपरीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावांचून हें उत्तेजन मिळत नसतें. प्रो. बोस यांना हा लाभ घडण्यापूर्वीं कसकशा संकटपरंपरेंतून जावें लागलें याचा इतिहास फार मनोरंजक आहे व तो त्यांनीं स्वतःच कलकत्याच्या लोकांना नुकता सांगितला आहे. तो असा- प्रथम प्रो. बोस यांनीं २१ वर्षांपूर्वीं विद्युत्तरंग याविषयासंबंधानें कांहीं शोध लाविले. त्याबद्दलची माहिती रॉयल सोसायटीनें प्रसिद्ध केली, इतकेंच नाहीं, तर पार्लमेंटरी ग्रांट उत्तेजनार्थ देऊं केली. पुढें प्रो. बोस यांनीं एक विद्युयंत्र तयार केलें. तें बिन तारेचें तारायंत्र निघण्यापूर्वीं कित्येक वर्षें झालें होतें. त्याबद्दल ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांनीं त्यांना पेटंट ही दिलें, व त्या यंत्राचा उपयोग जहाजांतून व दीपस्तंभांवरून होऊं लागला. पुढें सचेतनासारखें जडांना सुद्धां मांद्य व थकवा येतात असा शोध त्यांनीं लाविला, व तो त्यांनीं १९०१ मध्यें रॉयल सोसायटीपुढें सप्रमाण सिद्ध करून दाखविला. पण त्याचा परिणाम असा झाला कीं बोस हे पदार्थ विज्ञानवेत्ते, यांनीं आमच्या शारीरविज्ञानशास्त्राच्या मर्यादेच्या आंत पाऊल ठेवण्याचें महत्पाप कां केलें या बद्दल वाद होऊन त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला. मूळ शोध बाजूला राहून हा जातिभेदाचा प्रश्न उभा राहिला. त्यामुळें त्यांचा निबंध कंपोज झालेला अखेर छापला गेला नाहीं. गंमत अशी कीं हा तसाच पडलेला निबंध हुबेहुब नकल करून दुसऱ्या एकानें आपल्या नांवानें प्रसिद्ध केला, व हा दुसरा एक मनुष्य ह्मणजे प्रो. बोस यांचेवर आग पाखडणाराच होता! या एका माणसाच्या विरोधामुळें प्रो. बोस हे १० वर्षें मागें पडले. ही गोष्ट पुढें जेव्हां शास्त्रज्ञांना कळली, तेव्हां त्यांना वाईट वाटलें. पुढें १९०३ सालीं प्राणी व वनस्पति यांच्यांतलें मनोविकाराचें सादृश्य दाखविणारा असा एक शोध प्रो. बोस यांनीं लाविला व तो फिलासाफिकल सोसायटी मार्फत प्रसिद्ध व्हावयाचा होता. पण तेथें ही तीच अडचण आली! तो निबंध तर प्रसिद्ध झाला नाहींच पण प्रो. बोस यांना शोधाच्या संबंधांत ज्या सवलती मिळाल्या होत्या त्यांना ही मुकावें लागतें कीं काय अशी भीती वाटावयास लागली! शेवटीं १० वर्षांनंतर त्यांना अनुकूळ काळ आला त्यांचा निबंध त्या सोसायटीनें प्रसिद्ध केला. सरकारानें ही त्यांना युरोप व अमेरिका येथें पाठविलें आणि जगाच्या शास्त्रज्ञानांत हिंदुस्थानानें घातलली भर महत्त्वाची आहे अशी कबुली पाश्चात्यांकडून मिळाली. हिंदुस्थाना विषयीं पाश्चात्यांना आदर वाटूं लागला. हिंदी विद्यार्थ्यांना अमेरिकेंत चांगल्या रीतीनें वागवूं लागले. अमेरिकन विद्यार्थी प्रो. बोस यांचें शिष्यत्व पतकरण्यास आले, आणि प्रो. बोस यांच्या शोधाचें वैद्यकी महत्त्वही लोकांना कळून आलें. प्रो. बोस ह्मणतात कीं मीं आतांपर्यंत शास्त्रीय शोधाच्या मार्गांतले नुसते कांटे काढण्याचें काम केलें आहे. खरे महत्त्वाचे शोध अद्याप पुढें लागावयाचेच आहेत!

---

## समरसमाचार.

गेल्या आठवड्यांत बाल्कन प्रांतांमध्यें लढाईला गंभीर स्वरूप प्राप्त झालें होतें. जर्मनी, आस्ट्रिया व बल्गेरिया या तिघांनीं मिळून सर्व्हियाचा बहुतेक भाग आक्रमून टाकला आहे. सर्व्हियन लोकांना बाबुना नांवाची खिंड सोडून देणें भाग पडलें. बल्गेरिया वगैरे शत्रूपक्षाचा प्रयत्न सर्वियाचें दक्षिणेंकडचें व उत्तरेकडचें सैन्य यांना विभक्त ठेवण्याचा आहे हें उघड आहे ह्मणून ते सर्वियन लोकांना पश्चिमेकडे हाकून लावीत आहेत. मोनास्टिर हें सर्वियाचें महत्त्वाचें ठिकाण आहे. तें शत्रूंनीं घेतल्याची खोटीच बातमी ग्रीसकडून आली होती. तींत तथ्य नसलें तरी येवढी गोष्ट खास आहे कीं मोनास्टिरचा बचाव करण्याचें सामर्थ्य सर्वियाचे अंगीं असतें तर तेथील लोक ग्रीसकडे पळून गेले नसते. सर्वियाला दोस्तराष्ट्रांकडून सैन्याचें पाठबळ मिळावें तसें मिळत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. तें मिळण्याचे मार्गांत अपरिहार्य अडचणी आहेत. त्या नसत्या तर सर्वियन सारख्या जवानमर्दांनीं शत्रूपुढें आणखी कित्येक दिवस तरी खास टिकाव धरला असता. पण आतां त्यांचे हात अगदीं टेकीस आलेले दिसत आहेत. यामुळें साऱ्या जगाचें लक्ष आतां बल्गेरिया व जर्मन— आस्ट्रियन पुढें काय हालचाल करतात इकडे लागलें आहे. ग्रीसनें आपली तटस्थवृत्ति अद्याप सोडली नाहीं. पण लवकरच त्याला ती सोडावी लागेल व कोणत्या तरी एका पक्षाला मिळावें लागेल. हा पक्ष कोणता तें सांगणें फारसें कठीण नाहीं. तथापि लार्ड किचनर साहेब नुकतेच तिकडे गेले आहेत. ग्रीसच्या राज साहेबांची व त्यांची मुलाखत होऊन चार घटका वाटाघाट ही झाली आहे तेव्हां राजनीति कशी अकस्मात् गिरकी खाईल याचा नेम कोणी सांगावा? लॉर्ड किचेनर यांची शिष्टाई सफळ होऊन ग्रीस दोस्त राष्ट्रांना मिळाला तर फार इष्ट गोष्ट आहे, व मग बाल्कनमधलें संकट अर्धें अधिक दूर झालें असें ह्मणतां यईल. पण तसें न झालें आणि विपरित प्रकार घडून आला तर? या प्रश्नाचें उत्तर देण्याचें सामर्थ्य दुर्बळ मानवांत नाहीं. ईश्वरी योजना असेल तसें घडेल असें ह्मणून स्वस्थ बसणें भाग आहे.

---

ग्यालीपोली कडली बातमी बरेच दिवसांत नव्हती, ती एकदाची आली आणि ती अत्यंत समाधानकारक आहे. ब्रिटिशांना एका घोर युद्धाचे प्रसंगीं जय मिळून तुर्क लोकांचे खंदक त्यांचे हातीं लागले.

---

राशियांत जर्मन लोकाचें कांहीं चालेनासें झालें आहे. बाल्टिकच्या बाजूला येवढ्यांतल्या येवढ्यांत जर्मन लोकांचा दोनदा पराभव झाला. रिगा घेण्याबद्दल जर्मन बादशाहाच्या मनाला लागून राहिलेली तळमळ अद्याप कमी होत नाहीं. आतां लवकरच राशियामध्यें असह्य थंडीचा कडाखा पडेल ह्मणून जर्मन सेनापति व्हॉन हिंडेन बर्ग यांनीं शिपायासाठीं गरम कपडे मागितले असतां जर्मन बादशहानें उत्तर दिलें कीं ते रिगांत मिळतलि. पण ज्या मानानें ही बादशहाची तळमळ वाढत आहे त्याच मानानें रिगा जर्मन लोकांच्या हातांत जाण्याचा संभव कमी कमी होत आहे. ता. २१ नोवेंबरच्या पेट्रोग्राडच्या तारेवरून कळतें कीं रिगाच्या आसपास अनेक ठिकाणीं जर्मन लोकांवर तोफांचा भडिमार होऊन त्यांना आपलीं शस्त्रें, दारूगोळा, व मृतशिपाई तसेच टाकून द्विनानदीच्या पश्चिमेकडे घाईनें पळून जावें लागलें. त्याच सुमारास स्टिर येथें ही त्यांचा पराभव झाला. राशियाजवळ शिपायांची कमताई बिलकुल नाहीं. तेव्हां तिकडे आपण यशस्वी होऊं अशी अपेक्षा जर्मनीनें करणें हा मूर्खपणा आहे.

---

खुद्द इंग्लंडांत मध्यंतरीं मुत्सद्यांत उदासीनता पसरली होती. पण पुनः त्यांच्या मुद्रेवर उल्हासाचें चिन्ह दिसूं लागलें आहे. पर्शियामध्यें त्यांचें राजकारण पूर्णपणें यशस्वी झालें आहे. पर्शियाच्या शहानें आपण कांहीं केल्या इंग्लंड व रशिया यांच्याशीं असलेला मित्रत्वाचा संबंध सोडणार नाहीं असें जाहिर केल आहे. त्यानें आपल्या या जाहिरनाम्याला कृतीनें ही पुष्टी दिली आहे. जे इंग्रजांना विशेषसे अनुकूळ नाहींत असे अधिकारी परत बोलावून दोस्त राष्ट्रांना पूर्णपणें अनुकूळ असे अधिकारी जबाबदारीच्या हुद्यावर नेमिले आहेत. कॉकेशसमधून पळून आलेल्या आस्टियन लोकांचीं हत्यारें काढून घेऊन त्यांना अडकावून टाकिलें आहे आणि दोस्त राष्ट्राच्या वकिलांच्या राहण्याचे जागीं मजबूत पहारे ठेविले आहेत. सारांश, पर्शियाकडची बाजू इंग्रज व रशियन यांनीं पक्की करून घेतली आहे. खुद्द इंग्लंडांत दारूगोळा तयार करण्याचे नवे कारखाने इतके जारीनें चालले आहेत कीं युद्धसामुग्रीची वाण पडण्याचा संभव आतां मुळींच राहिला नाहीं. सैन्यांत पुरेशी शिपायांची भरती अलीकडे होईना, ह्मणून सक्तीची लष्करी नोकरी करण्याचें ठरून त्याबद्दलची योजना ही लॉर्ड डर्बी यांनीं तयार केलेली प्रसिद्ध करण्यांत आली आहे. या योजनेप्रमाणें प्रथम १७ पासून २३ वर्षांच्या वयाच्या अविवाहितांना सक्तीनें लष्करांत भरती करण्यांत येईल. त्यानंतर विवाहितावर पाळी येईल. या योजनेपासून लोकांत असंतोष उत्पन्न होऊं नये अशी खबरदारी घेण्यांत आली असल्यामुळें ही योजना यशस्वी रीतीनें अंमलांत येईल असेंच साधारण लोकमत आहे.

---

'समानशील व्यसनेषु सख्यम्', ही ह्मण जर्मनी व त्यांचे दोस्त यांच्या संबंधानें अगदीं यथार्थ आहे. जर्मन लोकांची क्रूरता आतां सर्व प्रसिद्ध आहे. पण त्यांना मिळालेला नवा दोस्त—बल्गेरिया—जर्मनीला सुद्धां क्रूरपणांत मागें हटविणारा आहे. बल्गेरियानें गेल्या आठवड्यांत पिरोट हें ठिकाण सर्वियापासून घेतल्यानंतर बल्गेरियन लोकांनीं तेथील रहिवाशांना इतकें क्रूरपणानें वागविलें कीं जर्मन व आस्ट्रियन लोक सुद्धां थक्क झाले आणि त्यांनीं मध्यें पडून लोकांचे जीव वाचविण्यासाठीं मुद्दाम पोलीसचे लोक ठेविले!

---

## देशी वैद्यकावरलें संकट.

हिंदुस्थानच्या कित्येक प्रांतिक सरकारांनीं विलायतेचें अनुकरण करून डाक्तर लोकांच्या नोंदणीचा कायदा इकडे केला आहे. पण घाईनें व पूर्ण विचार न करतां केलेल्या गोष्टीमुळें कशी अनर्थापत्ति घडून येते व त्यापासून लोकांच्या मनांत कशी क्षुब्धता निष्कारण उत्पन्न होते याचें उत्कृष्ट उदाहरण सध्या मद्रासकडे घडलें आहे. विलायतची परिस्थिति वेगळी व येथली वेगळी आहे. विलायतेंत वैद्यकाची एकच प्रकारची पद्धति प्रचारांत आहे. अर्थात् तिकडे त्या पद्धतीचा सशास्त्र अभ्यास केलेले व परीक्षा देऊन पदव्या किंवा सनद मिळविलेले असे डाक्तर इतर नाकाडोळ्याच्या वैदूंहून भिन्न करण्यास तिकडे नोंदणीचा कायदा करावा लागला व तो परिणामकारक ही झाला. पण इकडे पाश्चात्य वैद्यक व देशी वैद्यक (यांत ही आयुर्वेद व युनानी अथवा मुसलमानी असे पंथ आहेत) अशा दोन पद्धति प्रचारांत असून पहिलीचा प्रचार विशेषतः थोड्याशा शिकलेल्या लोकांत व दुसरीचा सामान्यजनसमूहांत विशेष आहे. श्रेष्ठत्वाच्या दृष्टीनेंही कोणाचा नंबर वर लागेल तें ठरविणें कठीण आहे. कारण, देशी वैद्यकाला जरी कित्येक शतकांत

नव्या शोधाची भर पडली नसली तरी तें आमच्या लोकांच्या प्रकृतीच्या मानाच्या सूक्ष्म ज्ञानावर व अनुभवाच्या पायावर रचिलें असल्यामुळें पुष्कळवेळां जेथें पाश्चात्य वैद्यकानें हात टेकिले तेथें देशी वैद्यकानें हटकून गुण आणून दिल्याचीं उदाहरणें पुष्कळ सापडतात. शिवाय पाश्चात्य औषधें महाग व डाक्तर लोकांची फी जबर, आणि देशी औषधें काथ्यामिथ्यादि वनस्पतींचीं, व वैद्य लोकांचा द्रव्यलोभ ही कमी असल्यामुळें गरीब लोकांना तर देशी वैद्यक पद्धतिच ज्यास्त उपकारक झालेली आहे असें असतां डाक्तर लोकांच्या नोंदणीचा कायदा करून देशी वैद्यकाला अप्रत्यक्ष रीतीनें धक्का देण्यांत सरकारनें चूक केली आहे असें ह्मणावें लागतें. या कायद्यानें आह्मी पाश्चात्य वैद्यक सशास्त्र रीतीनें पढलेल्यांचें तेवढे हक्क संभाळीत आहों, इतर वैद्यकांचें त्यामुळें नुकसान होणार नाहीं असें आश्वासन ही त्यावेळीं कित्येक सरकारांकडून देण्यांत आलें होतें. पण सदर कायदा पास होऊन एक वर्ष लोटतें तों अनुभव मात्र उलटा आला आहे. मद्रासेंत एका उदार गृहस्थाच्या देणगीवर एक देशी पद्धतीचा दवाखाना चाललेला आहे व त्यावर देखरेख करण्याचें काम डा० कृष्ण स्वामी हे करीत असत. येवढ्यावरूनच नोंदणीच्या कायद्यानें स्थापित केलेल्या मेडिकल कौन्सिलनें सदर डाक्तराचें नांव नोंदणींतून वजा केलें ! आर्यवैद्यकाला निष्कारण दुखविणाऱ्या या कौंसिलाचें हें कृत्य शास्त्राच्या, कायद्याच्या किंवा उपयुक्ततेच्या कोणत्याच दृष्टीनें न्यायाचें झालें नाहीं अशी अर्थात् ओरड होऊन तिकडील लोकांचीं मनें अत्यंत क्षुब्ध झालीं आहेत. देशी वैद्यकाशीं डाक्तर लोकांनीं संबंध ठेवणें ह्मणजे महारोग्याशीं संबंध ठेवण्याइतकें यहत्पाप अशी या कौंसिलाची समजूत झालेली दिसते. मद्रासच्या कायदेकौंसिलांत या महत्त्वाच्या प्रश्नाची जी जोराची चर्चा झाली तिजवरून सदर कौंसिलचें कृत्य अत्यंत जुलमाचें आहे अशी कोणाही विचारी माणसाची खात्री होईल. तशी सरकारची होऊन कायद्यांत योग्य ती दुरुस्ती झाल्याशिवाय लोकांची क्षुब्धता शांत होणार नाहीं.

---

मद्रासचा हा संसर्ग मुंबईला ही लागलाच बाधला. मुंबईसही एक आयुर्वेद विद्यालय आहे व त्याच्या व्यवस्थेंत डा. पोपटप्रभुराम व डा. सर भालचंद्र या दोघांचें अंग आहे. मद्रासच्या कौंसिलनें डा. कृष्णस्वामी यांचेवर नोटीस काढून आपल्या नांवाचा डंका सर्वत्र गाजविला, तसा आपणही वाजवावा अशी मुंबईच्या मेडिकल कौंसिलला बुद्धि होऊन त्यानें ही डा. पोपट प्रभुराम यांचेवर नोटीस काढली. हें ऐकतांच आमच्या गाईसारख्या भिऱ्या स्वभावाच्या सर साहेबांनीं राजीनामा देऊन सदर विद्यालयाशीं असलेला आपला संबंध सोडला ! सर भालचंद्र यांचे वडील वे. शा. सं. कृष्णशास्त्री भाटवडेकर हे व्युतन्न वैद्य होते. त्यांच्या हाताखालीं सर साहेबांनीं आयुर्वेदाचें अध्ययन केलें असून आयुर्वेदाच्या उत्कृष्टत्वाविषयीं त्यांनीं अनेकवेळां व्याख्यानेंही दिलीं आहेत. शिवाय ते महाराष्ट्रसमाजाचे एक धुरीण आहेत. असें असतां मेडिकल कौंसिलचा रोष होईल असा रंग दिसतांच त्यांनीं असा भित्रेपणा दाखविला याबद्दल समाजाकडून त्यांचा तिव्र निषेध करण्यांत आल्यास समाजाला कोणी नांवें ठेवणार नाहीं अशी आमची समजूत आहे. ज्यांनीं आयुर्वेदाची न्यायाची बाजू उचलून धरून सरकारकडून न्याय मिळविण्याकरितां जोरानें भांडावयाचें तेच पुढारी जर असा भागूबाईपणा दाखवितील, तर अशा अवसान घातकी माणसाला पुढारपिणापासून भ्रष्ट करून त्यांची खरी योग्यता जनतेपुढें व्यक्त करून दाखविण्यांत कोणतेंही पाप होणार नाहीं. मुंबईसरकार या प्रश्नाचा काय निकाल लावतें तें आतां पहावें.

## बलगेरियन लोक.

प्रस्तुतचें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीं जर्मन लोकांविषयीं साऱ्या जगाचें इतकें चांगलें मत होतें कीं विद्येंत, सदाचरणांत तत्त्वज्ञानांत, कला कौशल्यांत हरएक बाबतींत सर्वांना आदर्शभूत असें जर एखादें राष्ट्र असेल तर तें जर्मनी हेंच असें सर्व मानीत. पण आज जर्मनीचें खरें स्वरूप युद्धानें प्रकट करून दाखविलें आहे. असा अनुभव आल्यानंतर बलगेरियन लोकांविषयीं रिव्ह्यु ऑफ रिव्ह्यूज पुस्तकांत मि. बेनाब्रेज यांनीं जें वर्णन केलें आहे त्याविषयीं लोकांच्या मनांत साशंकबुद्धि उत्पन्न झाल्यास आश्चर्य नाहीं. सामान्यतः लोकांची अशी समजूत आहे कीं बलगेरियन लोक हे अर्धवट सुधारलेले आहेत पण मि. बेनाब्रेज ह्मणतात कीं ही समजूत चुकीची आहे तेथील राजानें व्यापार, उद्योगधंदे, इ. चा उत्कर्ष करण्यासाठीं फार परिश्रम केले आहेत. तेथें मुफत व सक्तीचें शिक्षण आहे. तेथील शेतकरी स्वतः बायकासह शेतांत खपतात, पण मुलांना शाळेंत पाठवितात. ते लोक मितव्ययी असून धर्म व अधर्म यांविषयींची त्यांची कल्पना उच्च प्रतीची आहे. तसेंच ते पापभीरू असून त्यांना अब्रूची चाड मोठी आहे. ते प्रसंगीं मोठें धैर्य व स्वार्थत्यागाचा गुण दाखविण्यास चुकत नाहींत; त्यांच्यांत परधर्माविषयींची सहिष्णुता मोठी प्रशंसनीय आहे. तेथें ग्रीक, ज्यू, रोमन, क्याथोलिक, मुसलमान वगैरे सर्व लोकांना धर्मस्वातंत्र्य आहे. इ. इ. मि. बेनब्रिज यांचें हें वर्णन कितपत खरें आहे ते आह्मांस सांगतां येत नाहीं, पण लेखी कराराला पायाखालीं तुडविणाऱ्या आणि माणसाची तर नाहींच नाहीं पण ईश्वराची सुद्धां मनांत भीती न बाळगणाऱ्या जर्मन लोकांशीं दोस्ती करून हे लोक ज्या अर्थीं निष्कारण रक्तपात करून आपले हात रक्तांत बुडवून घेत आहेत, त्याअर्थीं हें वर्णन बलगेरिन लोकांचेंच काय, अशी शंका घेणें वाजवी दिसतें.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत युद्धाच्या रंगभूमीच्या ठळक ठळक क्षेत्रांत विशेषशी हालचाल झाली नाहीं. पश्चिमेकडील रणक्षेत्रांत दोन्हीपक्षाचा तोफखाना आपलें काम करीत आहे, पण विशेषसा परिणाम दिसला नाहीं. पूर्वेकडे रशिया हळूंहळूं पुढें पाऊल टाकीत आहे इटली डोंगराळ मुलुखांतून मार्गक्रमण करीत चालला आहे. ता बाल्कन प्रकरणांत उदासीन आहे असा त्याचेवर आक्षेप होता, पण ४००८० सैन्य देऊन तो धुऊन टाकण्याचा त्यानें संकल्प केलेला दिसतो. डार्डानेल्समध्यें ही गडबड ऐकूं येत नाहीं. मेसापोटोमियामध्यें ब्रिटिश पुढेंपुढें सरकत बगदादकडे जात आहेत. जर्मन क्यामेरून मध्यें ब्रिटिशांनी जय मिळविले आहेत. बाल्कनच्या बाजूला मात्र पुष्कळ गोष्टी होऊं घातल्या आहेत. त्यांना प्रकट स्वरूप केव्हां व कोणत्या रीतीनें प्राप्त होईल तें सांगतां येत नाहीं. तेथें सर्वियन लोकांची स्थिति निःसंशय उमेदीची आहे. ते शूर लोक ५०० लोकांसह आपल्या संख्येच्या तिप्पट बलगेरियनांचें बळ असतां बाबुना खिंडीतून पार पडले, आणि कुप्रुलापासून प्रिलिपपर्यंतचा प्रदेश त्यांनीं झगडून परत मिळविला. मोनास्टिर शत्रूच्या हातीं गेल्याची खोटीच बातमी मध्यें आली होती. पण तें सुरक्षित आहे. सालोनिका येथें ब्रिटिश व फ्रेंच फौजा अजून उतरत आहेत व त्या तेथें आपलें कायमचें ठाणें करून राहण्याच्या तयारींत आहेत. ग्रीसच्या राज्याकडे लार्ड किचनेर शिष्टाईसाठीं गेले होते; ते आतां तेथली कामगिरी संपवून इटलींत गेले आहेत. शिष्टाई सफळ झाली व आह्मी दोस्त राष्ट्रावर चाल करणार नाहीं असें अभिवचन ग्रीसच्या राजाकडून लॉर्ड किचेनर यांनीं मिळविलें. पण ग्रीस आपला करार खरोखर पाळील कीं आयतेवेळीं दगा देईल या विषयीं पुष्कळ लोक साशंक आहेत. रशियानें ओडेसा येथें व गालाझवळ जंगी सैन्य आणन ठेविलें आहे व रूमानियांतून जाऊन बलगेरियनांच्या पिछाडीवर हल्ला करण्याची त्याची उत्सुकता आहे. पण रूमानिया आपल्या प्रदेशांतून जाऊं देईल तर ! रशियाजवळ माणसांची, तशी फ्रेंच लोकाजवळ द्रव्याची विपुलता आहे असा जो समज आहे त्याची साक्ष नुकतीच पटली आहे. फ्रेंच सरकारला कर्ज पाहिजे ही गोष्ट कळतांच लोकांनीं एका दिवसांत २ खर्व फ्रांकची रकम काढून दिली ! सारांश सर्व बाजूंनीं दोस्तराष्ट्रांना शुभशकुन होत आहेत.

## इतर बातम्या.

ता. २ जानेवारी रोजीं ब्रिटिश राष्ट्रांतून सर्वत्र राष्ट्रीय प्रार्थना व्हाव्या ह्मणून लंडनच्या लॉर्ड मेयरनें विनंतिपत्रकें काढलीं आहेत.

ब्रिटिश प्रेसच्य सरकारी प्रतिनिधीचा असा अंदाज आहे कीं युद्धाच्या पहिल्या पंधरा महिन्यांत जर्मन लोकांची हानि ४५ लक्ष लोकांची झाली, व दर महिन्यास दोन लक्ष जर्मन मरत आहेत.

हैद्राबादच्या निजाम साहेबांनीं बादशहा जॉर्ज यांचे ऑनररी ए. डी. सी. नेमण्यांत आलें आहे.

जखमी झालेल्या रशियन शिपायांच्या शुश्रुषेसाठीं एक हॉस्पिटल उभारण्यासाठीं कॅनडानें ५० हजार डॉलर देऊं केले आहेत.

## मध्यप्रातीय प्रांतिक परिषद्.

### दिवस दुसरा

मागील अंकावरून पुढें चालू

**ठराव आठवा**—न्याय खात्याच्या पुनर्घटनेच्या योजनेनें मुनसफांच्या पगारांत जरी कांहीं सुधारणा केली जाईल तरी न्याय खात्यच्या इतर अधिकारी वर्गाच्या योग्य हक्कांची पूर्तता या योजनेनें होणार नाहीं असें या परिषदेचें मत आहे; विशेषतः खालील बाबीं संबंधानें ही योजना अपूरी आहे असें परिषद् समजते.

(१) नेटिव्ह जिल्हाजज्जांची संख्या जी सध्या अकरा आहे ती चार केली आहे.

(२) या प्रमाणें संख्या कमी करून त्यांचे अधिकारक्षेत्र लहान केल्यानें त्यांचे वजनास व दर्जास कमीपणा येणार आहे.

(३) त्यानां जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार मिळण्याचा जरी संभव ठेविला आहे, तरी हा संभव त्यांच्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादेच्या आकुंचनाबद्दल योग्य मोबदला होऊं शकत नाहीं.

४ या योजनेकडे सांपत्तिक दृष्ट्या बाघितलें असतां सरकारी पत्रांत दरवर्षी १९१००७ रुपये अधिक खर्च आकारला आहे, परंतु सध्याच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागा रिकाम्या झाल्यानंतर, नेटिव्हानां मिळूं शकणाऱ्या अतिशय उच्च दर्जाच्या जागा ह्मणजे फारतर जिल्हाजज्जाच्या अगदीं शेवटच्या वर्गाच्या होतील. व असें झाल्यानें मुनसफांचा वाढलेला पगार ८४०० रुपये मिळून नेटिव्हच्या वाट्यास फक्त २४००० रुपये येतील.

(५) नेटीव्ह अधिकाऱ्याच्या पगाराची बढती सध्यां होत आहे इतक्या जलदीनें होणार नाहीं.

(६) याप्रमाणें सर्वांत कामाचें ओझें ज्यांच्यावर अधीक असे जे सरकारचे नेटिव्ह अधिकारी, यांनीं आतांपर्यंत केलेल्या दुष्कर व जबाबदारीच्या कामगिरीकडे दुर्लक्ष या योजनेंत केलें आहे.

हा ठराव ऑ. दिक्षित व रा. मंगळमुर्ती यांनीं पुढें मांडिला तो सर्वानुमतें पास झाला.

**ठराव ९ वा**

(अ) या परिषदेचें असें मागणें आहे कीं जुडिशिअल कमिशनरचें कोर्ट चिफकोर्ट व्हावें व त्यांत असलेल्या जग्येसमध्यें तीन स्थानिक वकील मंडळांतून व प्रांतिक अधिकाऱ्यांतून निवडले जावे असाच कायदा व्हावा.

(ब) सध्या असलेल्या ज्युडिशिअल कमिशनरच्या कोर्टाच्या घटनेबद्दल होईतोंपर्यंत इतर हायकोर्टाच्या पद्धतीस अनुसरून एक न्यायाधिश नेटिव्ह असावा.

हा ठराव रा. पाध्ये यांनीं पुढें आणिला व त्याला श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं अनुमोदन दिलें. ते ह्मणाले पितळेच्या ताटा ऐवजीं चांदीचें ताट द्या अशा प्रकारचें आमचे मागणें आहे. परंतु जर तीन जज्ज आमच्या पैकीं नेमणार नसतील, तर आह्मांला तें चांदीचें ताट नको; आमची जुडिशिअरीच ठीक आहे.

**ठराव १० वा.**

हिंदुस्थानांतून मुदतबंदी मजूर नेण्याची पद्धत अजिबात बंद करून टाकण्याबद्दल

व्हॉइसराय साहेबांनीं आपल्या कौन्सिलच्या एकमतानें स्टेट सेक्रेटरीकडे शिफारस केली याबद्दल ही परिषद् समाधान व्यक्त करिते.

## सुखसंवाद.

### (राजश्री स्लाय यांची मुलाखत)

मयासूरी बगीचा, सुंदर चिनी रोषनाई रसभरित स्वादिष्ट फळफळावळ, गोड मेवा-मिठाई इत्यादि समृद्धीनें सुखसंवादाला मोठी बहारी येते; आणि अंतःकरणें प्रेमानें निगूडित करण्याला सुखसंवाद हीच सुंदर योजना होय. राजश्री बापूसाहेब जठार यांनीं असला योग गेल्या १ ले तारखेला आपल्या बंगल्यावर मुद्दाम घडवून आणिला. राजश्री स्लाय सारख्या जुन्या कमिशनरांच्या भेटीचा लाभ— त्यांच्या भावी चीफ कमिशनरीच्या भरारींत— या जिल्ह्यांतील हिंदी, पारशी, मुसलमान, ख्रिश्चियन, इत्यादि व्यापारी, अधिकारी, वकील वगैरे मंडळीस करून दिला आणि राजश्री जठारांच्या या सौजन्यानें त्यांच्या आमदानींतला हा पहिलाच आनंदाचा प्रसंग सर्वजणांस फार फार आवडला.

## सद्विद्यार्थिसंघ.

आफिशिएटींग कमिशनर राजश्री चापमन हे निराळ्याच उच्चतर कोटींतले गृहस्थ आहेत. त्यांचें अंतःकरण प्रेमळ कल्पनांनीं परिपूर्ण आहे. ते वक्ते नाहींत पण त्यांच्या शद्बांच्या गर्भांत फार सुंदर प्रेरणा आहेत. विद्यार्थी मंडळी ही त्यांची जीवश्च कंठश्च प्रेमस्थानें होत. त्यांच्या कल्याणाकडे— अर्थात् भावी राष्ट्रांच्या उन्नतीकडे— त्यांचे डोळे सदैव असतात. त्यांच्या कल्पनास मूर्त रूप देण्याला ते नेहमीं उत्सुक असतात. विलायतच्या Boy Scouts च्या पद्धतीकडे ते तरुण पिढीला वळवीत आहेत. लष्करी शिक्षण इंडियन कायद्यानें सध्यां उपलब्ध नाहीं तरी आपला मार्ग नाना खेळ, नाना ललितकला, नाना हुन्नरें, इत्यादि दिशांनीं काढून विद्यार्थी–चमू ईश्वरपरायण, राजानिष्ठ, व उत्तम नागरिक असा बनविण्याचा त्यांचा विचार आहे. यवतमाळ व उमरावती येथें त्यांना असे छात्रसंघ काढले आहेत. आणि गेल्या २ ऱ्या तारखेला आकोल्यासही जाहिरसभा भरवून तसा संघ स्थापित करण्यांत आला आहे. राजश्री बापूसाहेब जठार यांनीं आपल्या उत्तम भाषणानें या कल्पनेचा मोठा गौरव केला आणि आयुष्यांतील लढाया मारण्याला छात्रसंघ कसा उपयोगीं होईल हें इंग्रजींत सांगितलें. नंतर राजश्री चापमन यांनीं आपल्या स्फूर्तित विचारांनीं सभाजनांस आंदोलन दिलें आणि त्यांच्या स्फूर्तीनें एकवाक्यता होऊन सद्विद्यार्थिसंघ आकोल्यास स्थापित झाला ही मोठी आनंदाची गोष्ट होय. तूर्तातूर्तच्या पांचशें रुपये खर्चासाठीं राजश्री चापमन यांनीं १०० रुपये वर्गणी दिली. व इतर ठळक आंकडे तेव्हांच पडले. आम्ही राजश्री चापमन यांचे फार फार आभारी आहों. आण त्यांच्या पहिल्याच भेटींत त्यांनीं येथील 'मित्रसमाज' व 'बोटक्लब' येथें जी प्रेमळ सुजनता दाखविली ती प्रशंसनीय होय.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— हेमंत ऋतूचा आगम सूचित करणारीं लक्षणें मनाला प्रफुल्ल व प्रसन्न करितात. थंडी तीव्र पण किती तरी सौख्यवर्धक आहे. हा अमृत ऋतु प्लेगादि रोगांस पादाक्रांत करून शरीरसंपदांचे किल्ले नव्या जोमानें बांधीत आहे.

**राजीनामाः**— रा. रा. रामचंद्र मार्तंड गुते वकील, व्हाइसचेअरमन, म्युनिसिपालिटी, आकोला यांनीं आपला १९ वर्षांचा म्युनिसिपल संबंध तोडून टाकून राजीनामा दाखल केला आहे. अलीकडील पांच सहा वर्षे त्यांनीं या स्थानिक कारभारांत बहुत परिश्रम केलेले आहेत. तथापि असल्या बारभाईच्या काकतीर्थांत सद्गुणांचे चीज न होतां प्रसंग विशेषीं, क्षुल्लक दोषांनीं किंवा इतर अंतर्गत गोष्टींनीं ते सर्व सद्गुण नकोसेही होऊ लागतात. अशा वेळीं रामराम करणें व तो गोडीगुलाबीनें परत करणें हाच उभय पक्षीं आनंदाचा शेवट होय.

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible.

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

## नोटीस

विद्यमान सीनिअर सबजज्ज साहेब कोर्ट आकोला.

कि. दि. मु नंबर १९ सन १९१५

अर्जदार.

पार्वतीबाई जवजे संभू आप्पा वाणी रा. उंबर्डा

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, मय्यत संभू अप्पा वाणी हा तारीख १३।९।१९१३ इसवी रोजीं उंबर्डा येथें मयत झाला आहे. त्याचे वारस या नात्यानें अर्जदार पार्वतीबाई इनें वारसाचे सर्टीफिकिट मिळणेंकरिता आमचे कोर्टांत तारीख १६-१०-१५ इसवी रोजी अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची तारीख ११-१२-१५ इसवीची नेमली आहे. तरी तीचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असेल, त्यांनीं नेमल्या तारखेस कोर्टांत हजर व्हावे ता. २-१२-१५

D. K. Kolatker
Sub judge. Akola

No. No.404

## मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड कि. २ आणे कर्णाबिंदू – कानाचा विकार ९ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेथालार्क किं० १ आणा.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.

नो० नं० ९

## जाहीरनोटीस

दि. मु. नं. १९३ सन १८९८

सर्वत्र लोकांस जाहिर नोटिस देण्यांत येते कीं, मालेगांव जहागीर तालुके वाशीम येथील आठवडे मंगळवार बाजार व गांवांतील दररोजचा बाजार प्रमाणें कर वसूल करण्याची स्थळ भरती हे दोन्हीं मेहरबान वादी प्रतिवादीचे लिहून आल्याप्रमाणें (ता. १ माहे जानेवारी सन १९१६ इ. पासून ता. ३१ माहे दिसेंबर सन १९१६ इ. पावेतोंचा मक्ता) मौजे मजकूरचे आठवडे बाजारांत रिसीव्हर यांचे समोर ता. १४-१२-१९१५ इ. रोजीं दिवसाचे बारावर दान २ वाजतां लिलांव होणार आहे. ज्यास घेण्याची खुशी असेल त्यानें नेमलेले तारखेस हजर रहावे. कळावें. ता. १-१२-१९१५

सही

अमृतराव देवराव रिसीव्हर द. खु.

नो. नं. ४०५

## NOTICE

Notice is hereby given that the Municipal Committee of Malkapur in the Buldana District. in accordance with a resolution passed at a Special meeting held, as required by Section 44 (1) of the Berar Municipal Law,1886, on the 3.rd November 1915, proposes to impose under Section 42 of the said law a scavenging tax on all buildings and lands situated within Municipal limits at the rates and on the terms hereinafter stated from the 1st April 1916 in supersession of the tax levied under Central Provinces Gazette notification No. 177 dated 12th February 1907.

The proposal will be taken into further consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice, and any objections or suggestions in respect thereof must be forwarded in writing to the Secretary to the Municipal Committee before the expiry of the said period.

RULES

(1) For the purpose of these rules, buildings and lands shall be divided into two cllasses;—

Class 1 Those to which a private latrine served through the municipal agency is attached. Class 11—Those to which no private latrine is attached.

(2) The tax shall be levied at the following rates:—

| | ClassI Per annum Rs. As. Ps. | Class II Per annum Rs. As. Ps. |
|---|---|---|
| On Buildings and lands, the annual rental or estimated annual rental of which is Rs 12 and below | 1—0—0 | 0—8—0 |
| Where it exceeds Rs. 12 but does not exceed Rs25 | 2—0—0 | 1—0—0 |
| do " 25 do 36 | 3-0-0 | 1-8-0 |
| do " 36 do 50 | 4-0-0 | 2-0-0 |
| do " 50 do 75 | 5-0-0 | 2-8-0 |
| do " 75 do 125 | 6-0-0 | 3-0-0 |
| do " 125 do 175 | 8-0-0 | 4-0-0 |
| do " 175 do 250 | 11-0-0 | 5-8-0 |
| do " 250 do 350 | 18-0-0 | 9-0-0 |
| do " 350 do 450 | 24-0-0 | 12-0-0 |
| do " 450 | 30-0-0 | 15-0- 0 |

(3) Buildings which are used solely as granaries, which have no privies attached thereto, will be taxed at the rate fixed for the class II, provided the annual tax, to be recovered from each of such buildings, is not less than eight annas.

(4) The Committee may decline to undertake the cleaning of latrine attached to factories, workshops, Hospitals, markets, theatres, Government offices and buildings of a quasi—public nature situated within MuniciPal limits, and the tax on such buildings shall be levied at class II rates. The Committee may, under special agreement in each case, undertake to clean the latrines attached to such buildings in which case, instead of the ordinary tax, a special rate agreed upon between the Municipal Committee and the occupier shall be charged.

(5) An occupier of any building or land who wishes to make his own arrangement for cleaning his private latrine must first obtain the written permission of the Committee to do so in such cases the tax shall be levied at class II rates.

(6) Temples, mosques, churches and other places of public worship shall be exempted from tax if they fall in Class II.

(7) Sets of quarters or appartments in a building in which one or more latrines are provided for the common use of the occupants shall be included in class I, and the tax shall be recovered from the separate occupants according to the rental paid by each. A building includes a house or a block of house houses with out houses and godown having a common entrance and occupied by one family including servants, and the tax on such building shall be calculated according to the rental value of the house or portion of the house occupied by the family.

(8) The tax shall be payable in advance in quarterly instalments, falling due on the 1st April, 1st July, 1st October and 1st January respectively.

(9) Buildings or lands of either class which are occupied for any portion of a quarter shall be charged the full rates of their respective class for the whole quarter. If they remain unoccupied for the entire quarter no tax shall be levied.

(10 The valuation and assessment of buildings and lands shall be made by the managing committee, or by such members as the Committee may appoint in that behalf once a year and shall be subject to confirmation by the general committee.

Md. Mansur ali khan
Vice chairman Municipal Committee
Malkapur

## नोटीस

नोटिस बेशमी अभिमान चंद्रभान कुणबी रा. धानोरे

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची ता. २०-११-१५ ची नोटिस पावली, नोटिशीप्रमाणें मी झामु सोनाजी न्हावी रा. कामठ यांस बंद केले. तरी मी त्यास बंद केले नाहीं. कोणी बंद केले हे ही माहीत नाहीं, विनाकारण आमचे नांव घेतां हे बरोबर नाहीं. दुसरे भाऊबंद सांगतात कीं, व्यवहार केला तर त्यास जाती बाहेर टाकूं वगैरे मजकूर आह्मास कांहींच माहीत नाहीं. हें सर्व खोटें असून विनाकारण माझे नांव बदलाम करित आहां. हें बरोबर नाहीं. खोटी नोटिस दिली याजबद्दल आह्मीच फौजदारी करणार आहो. हल्लीं नोटिशीचे उत्तरास जो खर्च लागलां तो भरून देणें नाहींतर आह्मी दिवाणीमार्फत भरून घेऊं. न्हावी बंद केला असल्यास पंचानीं केला असेल. परंतु हें ही मजला माहीत नाहीं. ता. ३-१२-१५ द. लक्ष्मण जयराम पि. रा. आकोला

सही

भगवान उदेभान पाटील रा. धानोरे
पाटेकराचे पो. व ता. मुर्तिजापूर
नि. खुद आंगठा

नो नं. ४०३

## WANTED

A COMPOUNDER FOR THE CENTRAL JAIL NAGPUR.

Pay according to grad. Free quarters Application together with testimonials to be sent to the undersigned.

C. H. Bensley,
Lieut:Col: I. M
Superintendent, Central Jail
Nagpur,

N. N. 404

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना.

### ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठिः--पांजर पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचें मंदीर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी.

**अत्तरें.**– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

**तेलें.**– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व पितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आं १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, मंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. का रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची काळी, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० ३६९

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65 269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes a recerd for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख १३ माहे दिसेंबर सन १९१५ ई० [ अंक ४५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटावर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

## अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥।≈ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भोंगवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** याचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षीतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० न० ३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमून छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें ऱ्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९३

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

सर्व बालरोगांवर वस्ताद.

# बालामृत

वटिका.

एकच वेळ वापरण्याची शिफारस. खोटें ठरविणारांस शेकडों रुपये बक्षीस देण्याइतके आह्मी श्रीमंत नाहीं. परंतु साहेब, एकदाच खात्री करून पहा. २० गो. किं. ।- टॅ. ख. वेगळा. प्रत्येक शिशी सोबत इनामाचें १ टिकीट बक्षीस. निकाल १०००० बाटल्या खपतांच. बक्षीसें १००० रोख. खुलासा आजच मागवा.

सकळकळे ॲन्ड सन्स
शहर आकोला.

## नोटीस

रा. रा. नथु वा दवलत पाटील पान्हेरे ता० मल्कापूर

यांसः—

हरकचंद गुलाबचंद दु० तेल्हारा यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मांस ता० १९-४-१३ इ० रोजीं रुपये ९००० नऊ हजारचे साल्बंदी गहाणखत लिहून दिले आहे. त्यांतील स. १९७० ते १९७२ पावेतों ३ साल्बंद्या पडल्या असून अद्याप तुह्मी वसूल दिली नाहीं व साल्बंद्या चुकत्या केल्या नाहींत. तुमचे कडेस ११२ वेळां शिपायासही पाठविलें व समक्षही कळविले परंतु रकम चुकती केली नाहीं. या शिवाय चालूं खात्याचीही रकम येणें आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत येणें झालेल्या ३ साल्बंद्याचे रुपये ४५०० पंचेचाळीसशे व त्याचें व्याज व चालुं खात्याची रकम व्याजासुद्धां अशी चुकती करावी तसें न केल्यास आह्मांस रिती प्रमाणें फिर्याद दाखल करणें भाग पडेल. तरी सुचनार्थ कळविलें आहे. कळावे ता० ६-१२-१५ इ.

सही
हरकचंद गुलाबचंद दु. तेल्हारा
तर्फे नथु आप्पा

नो. नं. ४०८

## जाहीर नोटीस

नुरी मर्द पुंजाजी अ. पा. क. आई निंबाबाई मर्द यादोबा रा. हिंगण घोट ता. खामगांव

ईसः—

पुंजाजी वा विठोबा गायकवाड कुणबी रा. लासूर यांचेकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी ता. ४-१०-१५ चे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिलेली आमचे पाहण्यांत आली. ही नोटिस खोटी असून लबाडीची आहे. तुझें व माझें लग्न झालेलें असून तें अझून कायम आहे. मी तुझे आंगावर घातलेले दागीने ७० तोळे चांदी व २ तोळे सोनें हे ही तुझे जवळ आहेत. मी तुला घरीं नांदविण्यास तयार असून ह्याप्रमाणें पुष्कळवेळां तुला नेण्यास मी आलो असतां तुझी आई तुला धाडीत नाहीं. व तूंही येत नाहींस, तूं तुझे आईचा व इतर लबाड लोकांचा सल्ला ऐकून आपले आयुष्याची व संसाराची माती करीत आहेस. तूं येऊन माझे घरीं बायकोप्रमाणें नांदावेंस असें माझें तुला सांगणें आहे, तरी हें न ऐकतां तूं दुसरें लग्न वगैरे केल्यास तो फौजदारी गुन्हा होईल, व तूं त्याबद्दल जबाबदार होशील. तसेच तुझ्याशीं गंधर्व करणारा इसमही गुन्हेगार होईल. तुला या गोष्टीचा निकाल पंचयतीनें करणें असल्यास मार्गशीर्ष शु॥ १५ चे दिवशीं बाळापूर कासारखेडला गोसाव्याचे मठीवर यावे. ह्मणजे तेथें आह्मी येऊं. कळावें. ता. ७-१२-१५

सही
पुंजाजी वा विठोबा गायकवाड नि॥
खुद्द हातची रेघ असे
नो. नं. ४०९

## नोटीस

रा. रा. कासिराव खेतजी पाटील रा. काकनवाडं यांसः—

हरकचंद गुलाबचंद दु. तेल्हारा याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे दुकानचे रुपये घेणें असून २।४ वेळ शिपायांस पाठविले व गुमास्त्यांसही पाठविले. परंतु तुह्मी रकम चुकती करित नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आमची रकम व्याजासह चुकती करावी. तसें न केल्यास आह्मास रितीप्र॥ फिर्याद दाखल करणें भाग पडेल. करितां सुचविलें आहे. क. ता. ६-१२-१५

सही
हरकचंद गुलाबचंद दु. तेल्हारा तर्फे
नथुआप्पा
नो. नं. ४१०

## नोटीस

नोटिस बेशमी नारायण वा भगवान धनगर राहणार देऊळखेड तालुका खामगांव जिल्हा बुलडाणा.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून तुह्मी मजला मारठोक करून आंगावरील डागीने काढून घेऊनें मुलांसह तुह्मी तुमच्या हातानें माझे आईचे घरीं आणून घातले. त्याला आज चारवर्षें झालीं आहेत. तरी तुह्मी आजपर्यंत मजला नेण्यास मुळींच आले नाहीं. व माझे खाण्यापिण्याची सोय तुह्मी करून दिली नाहीं. तरी माझे अन्नवस्त्राबद्दल रुपये ३०० तिनशें माझा मामा शिवाजी याचेजवळून कर्ज काढलें आहे. तरी ते रुपये देऊन मजला नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत घेऊन जावे. तसें न केल्यास नोटिस हीच फारकत समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क राहणार नाहीं. व वरील रकमेबद्दल दिवाणींत दावा करण्यांत येईल. क. तारीख ७-१२-१९१५ दस्तुर रामराव गोविंदराव देशमूख पिंपळडोळीकर

सही
चिनकी मर्द नारायण धनगर रा.
कदमापूर ता. खामगांव निशानी
खुद्द आंगठा
नो. नं. ४११

## जाहिर नोटिस

नोटिस बेशमी शेखरुस्तुम वा शेखगुलाब मु.॥ रा. मल्कापूर हल्लीं कोठें पत्ता नाहीं

यांसः—

या जाहिर नोटिशीनें खालीं सही करणार नोटिस देते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्नास सुमारें ७ वर्षें झालीं. लग्न झाल्यावर १ महिना मी तुमचे येथें राहिली. नंतर तुह्मी अन्यायाशिवाय मजला माहेरी आणून घातलें. माझ्या खाण्यापिण्याची कांहींच व्यवस्था केली नाहीं. व मला घेऊन जाण्याची ही व्यवस्था केली नाहीं. त्यामुळें माझे पोषणाचा खर्च माझे वडील भावास लागला. याप्रमाणें ३ वर्षें तुह्मी मल्कापूरास राहून आतां ४ वर्षांपासून फरारी आहां. मी पुष्कळ शोध केला परंतु शोध लागत नाहीं. तरी तुह्मास (तुह्मी असाल तेथें) कळविण्यांत येते कीं, आतां मला ७ वर्षांवर काळ भावाचे घरीं कंठावा लागला यावर मी तुमचे नांवावर कोठवर बसावें? तरी तुह्मास नोटिस ही कीं, आज तारखेपासून १ महिन्यांत तुह्मी माझे अन्नवस्त्राचे माझे भावाचे पैसे देऊन टाकून मला घेऊन जावें. असें न केल्यास तुमचें अस्तित्व नाहीं, अगर तुह्माला माझी गरज नाहीं, असें मानून मी दुसरा निका करीन. मग तुमचा कोणताच हक्क मजवर राहणार नाहीं. दरमहा ६ रुपये प्रमाणें माझे भावाजवळून आजामित्तीस ४९२ रु. मी कर्ज घेऊन खाल्ले आहे. हें तुह्मास व सर्वत्र लोकांस माहित होण्याकरितां कळवित आहे. क. ता. ६-१२-१९१५

सही
कुलसमबी मर्द शेखरुस्तुम रा. मल्कापूर
नि॥ नो० नं० ४१२

## नोटीस

नोटिस बेशमी अब्दुलरहेमान वा॥ शेखकरीम मुसलमान इंजीनीअर फ्लावरमिल रा. आकोला ताजनापेठ यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहां. लग्न होण्यास सुमारें ७ वर्षें झालीं. व तुह्मापासून मला तीन मुलें ही झालीं आहेत. परंतु हल्लीं माझा कांहींच अपराध नसतां तुह्मी विनाकारण मजवर तुफान लाविलें आहे व तूं माझी आई व बहिणीप्रमाणें आहेस. असें लोकांसमक्ष सांगितलें आहे. त्यावरून मुसलमानी धर्माचे कायद्याप्रमाणें मी तुमचे निकाहात राहिलें नाहीं. व तुमचा व माझा बेबनाव मरेपावेतों राहणार असें तुमच्या कृत्यावरून झालेले आहे. करितां ह्या नोटिशीनें कळविते कीं, ही नोटिस पावल्या बरोबर चार दिवसाचे आंत मला फारकतीचे दस्तैवज लिहून द्यावें. असें न केल्यास मुदती नंतर या नोटिशीवरून मला दुसरा घरठाव करण्याचा हक्क होईल मग तुमचा कोणतेच प्रकारें नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. व पुढें चालणार नाहीं करितां ह्या नोटिशीनें मुद्दाम सूचना केली आहे. कळावें. ता. ८-१२ १९१५ इ. द. शेरखां पि. रा. आकोला

सही
फातमाबी मर्द अब्दुर्रहेमान नि॥
आंगठा खुद्द
नो० नं० ४१३

## पत्रव्यवहार

श्री सम्पादक जी बरारसमाचार

कृपया इस लेखको अपने अमूल्य पत्र में छाप कर कृतार्थ करें।

### अपने देश की चीज़ें बरतो

भारत की दरिद्रता को यह भी एक भारी कारण है कि यहां के कपड़े के कारखानें बिलकुल नष्ट होगये है। और हर एक वस्तु हम विदेशियों की तैयार की हुई इस्तेमाल करते हैं। इसलिए भारत का बहुत सा रुपयां विदेश की ओर खिंचा चला जा रहा है और यहां के लोग अजीविका के अभाव के कारण भूको मर रहे हैं। इसका प्रतीकार यह है कि न केवल विद्या सम्बन्धी वरन् क्रियात्मिक कार्यवाही भी आरम्भ कर देनी चाहिए। इस मे शक नहीं कि विदेश के लोग ज्यादा और कारीगर हैं इस लिए वह चीजें अच्छी और सस्ती तैयार कर सकते हैं। और कुछ समय तक इस मुल्क में बनी हुई चीजें विदेश में बनी हुई चीजों के साथ मुल्य में मुकाबला नहीं कर सकती। यदि हिन्दुस्तानी इस बात का दृढ निश्चय करलें कि हम केवल हिन्दुस्थान की बनी हुई चीजें इस्तेमाल करेंगे तो वह समय बहुत दूर न होगा जबकि इस देश में हर प्रकार के कारखाने कायम होकर उन्नति करेंगे और फिर यहां की बनी हुई चीजें विदेश की चीजों की तरह अच्छी और सस्ती होंगी। अब हिंदुस्थान के कई जिलें ढाका, भागलपुर, अहमदाबाद और लुधियाना में ऐसे अच्छे कपडे तैयार होते हैं कि युरोपियन कपडे के साथ मुकाबला कर सकते हैं। परन्तु जब तक हिंदके लोग इस में उस लेडी की नकल न करेंगे जिसने एक निहायत ही गर्म और तैयार चाय का प्याला पीने से इस लिए इन्कार कर दिया कि वह उसकी अपने मुल्क की बोई हुई चाय से नहीं बनाई गई थी, तब तक इस देश के कारखाने अच्छी तरह से नहीं चल सकते क्योंकि जरूरत ही हर प्रकार की उन्नति की जड़ है। आशा है देश के हितचिन्तक अपने देश की बनी हुई चीज़ें इस्तेमाल करेंगे। ईश्वर भी उनकी सहायता करता है जो प्रथम अपनी सहायता आप करते हैं। आशा है कि आप अवश्य इसपर अमल करेंगे॥

### मुकदमेबाज़ी के दोष।

भारतवासियों की निर्धनता और दरिद्रता का एक कारण हदसे ज्यादा मुक़दमेबाजी भी है। जिन लोगों को ऐतिहासिक ग्रंथों के पढ़ने का अवसर प्राप्त हुआ है वे जानते हैं कि प्राचीन समय में भारतवासी इस दोष से कितने रहित थे। एक चीनी तीर्थयात्री सातवीं शताब्दी में भारतवर्ष की यात्रा करके जब लौट कर अपने देश में गया, तब वह भारतवासियों के विषय में ऐसा कहता था कि "भारतवासी झूठ बोलना महापाप समझते हैं इस लिये वे बिलकूल झूठ नहीं बोलते।" इस बात को उस ने स्वरचित एक पुस्तक में भी लिख दिया है। प्रोफेसर मॅक्समूलर

साहव ने ( जो यूरोप में बड़े भारी संस्कृत के विद्वान् और भारतवर्ष के सच्चे हितैषी थे ) अपनी पुस्तक "भारत स हम क्यां सीखें सकते है" में लिखा है की प्राचीन आयगणं सत्य बोलने के लिये बहुत प्रसिद्ध थे। परन्तु शोक है कि आज कल हम उसी भारत के निवासी और उसी प्रशंसित आर्य्यजाति की सन्तान इतने बदनाम हो गये हैं कि यूरोप अमेरीका और अन्य सभ्य देश के लोग हमारे नाम से घृणा करते हैं। विदेशी लोग हम को जूठे, कपटी, छली और दग़ाबाज़ के नाम से पुकारते हैं। जिन लोगों को आज कल कचहरियों, अदालतों की कारवाई का ज्ञान है, वे भली भाँति जानते हैं कितने लोग दीवानी फौजदारी अदालत में कैसा जूठ बोलते हैं। और कदाचित् उतना जूठ वे कचहरी के बाहिर कभी नहीं बोलते होंगे। अनेक जन चार २ आने के लिये पवित्र से पवित्र नामों का शपथें खाते हैं, जिस का परिणाम यह हुआ कि आज कल हमारी जाति असत्य, छल, कपट के लिये बहूत बद-नाम हो गई है। यहां तक कि परस्पर मित्रों और रिस्तदारी मे भी एक दुसरे पर विश्वास नही रहा। ओर इसी लिये भारतवासी वाणिज्य, तिजारत में भली भांति उन्नति नही कर सके। इस मक़-द्दमेबाज़ी से भारतवासियों को जो हानी पहुंचती है वह बुद्धिमानोंसे छिपी नहीं। असल रकम से पांच गुणा अधिक मुक़द्दमा पर ख़र्च हो जाता है और उभय पक्ष ( फरीकेन ) मुक़द्दमेबाजी से बरबाद होजाते हैं। इस कारण हम पन्चायत करनी चाहिये।

### भारत में शिक्षा की उन्नति

भारतवर्ष अपनी प्राचीन सभ्यता धन आर प्रताप को कभी प्राप्त नहीं कर सक्ता जब तक शिक्षा मुफ्त और ज़रूरी न दी जायगी। यदि भारत सरकार शिक्षा को मुफ्त और जरूरी रूप में नहीं देना चाहती तो भारत के नेताओं, राजा महा-राजाओं, जागीरदारों, कमेटीके मेम्बरों, सभाओं और शुभाचिन्तकों का कर्तव्य है कि वह स्वयं ही इस कार्य्य को अपने हाथ में लें। हर एक मन्दिर और धर्म-शाला के साथ वाचनालय और पुस्तका-लय खोलें जहा वह लोग जिन को दिन में फुर्सत मिलता है शिक्षा प्राप्त कर सकें। मज़दूरों के लिए हर एक गांव में और नगर की हर एक गली में रात्रि पाठशालाएं खोली जांय।

ज़रूरी समाजिक राजनैतिक, धार्मिक और आर्थिक विषयों पर देशी भाषाओं में पुस्तकाएं छापे जांय और उन को मुफ्त या थोडी सी कीमत पर साधुओं और ब्राह्मणों में जो देशी भाषाएं जानते हों बांटी जांय क्यों कि साधुओं और ब्राह्मणों का आम लोगों पर बहूत प्रभाव है। ज्या ही इन धार्मिक श्रेणियों के समय और ताकतों का जो दुर्भाग्य से इस समय नष्ट हो रहा है सामाजिक राज-नैतिक और धार्मिक विषयों के सुधार के लिए काम में लाया जायगा, त्यों ही हिन्दु जाति अवश्यमेव उन्नत होगी। अन्य सभ्य जातियां कुदरत के तत्वों को यानि अग्नि, वायु, जल को रेलों, स्टीमरों मिलों हवाई जहाजों में लगा रहे हैं और अपनी सभ्यता, धन और अभ्युदय को बढ़ा रही हैं; परन्तु शोक कि हम कुदरत के तत्त्व स्वामियों अर्थात् पुजारी श्रेणियों, साधुओं और ब्राह्मणों को अपनी जाति को उन्नति के लिए इस्तेमाल नहीं कर रहे।

ईश्वर उन की मदद करता है जो अपनी मदद आप करते हैं।

आपका शुभचिन्तक
टहलराम गङ्गाराम
जमींदार डेरा स्माइलखां

---

वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष शुद्ध ७ शके १८३७

## हिंदुस्थानांतल्या शिक्षण प्रसाराचें-गौडबंगाल.

हिंदुस्थान देशाच्या अभ्युदयाचा काळ नजीक येणें किंवा दूर जाणें हें सर्वथा शिक्षण आणि आरोग्य या दोन गोष्टीवर अवलंबून आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. शरीर सलामत तर पगडी पच्यायशी, तसें आरोग्य नीट राहून लोकांच्या अंगांत धड-धाकटपणा येईल, तर हिंदुस्थानचे लोक जगांतल्या कोणत्याही लोकांना हार जाणार नाहींत. हाच सिद्धांत शिक्षणालाही लावतां येईल. आमच्या उन्नतीचें सारें घोडें शिक्षणाच्या अभावापाशीं अडलें आहे. समा-जसुधारणा, औद्योगिक उन्नति, उच्च महत्त्वा-कांक्षा, शील, कर्तव्य जागृति वगैरे साऱ्या गोष्टी शिक्षण प्रसारावर अवलंबून आहेत. ह्मणूनच सालोसाल आमच्या देशांत शिक्षण-प्रसार किती होत आहे या गोष्टीकडे विचारी माणसांची दृष्टि लागलेली असते. शिक्षणाचे मार्गांत गेल्यासाली आपल्या देशा-नें किती पुढें पाऊल टाकलें या विषयींची जिज्ञासा १९१३-१४ सालचा हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण विषयक रिपोर्टानें अंशतः तरी तृप्त होइल ह्मणून आज त्याच रिपो-र्टाची मीमांसा करण्याचें काम आह्मी हातीं घेत आहों.

प्रथम विद्यार्थ्यांची संख्या पाहूं. १९१३-१४ सालीं ७९,१८,१४७ होती. मागच्या सालापेक्षां ही ३,९७,२०३ नें वाढलेली आहे. हिंदुस्थानच्या तीस कोट प्रजेच्या मानानें ही विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प आहे हें सांगावयास नकोच. प्रांतवारीनें पाहिलें तर फार गंमत दिसते. ह्मणजे सरहद्दीवरच्या प्रांतांत वाढीचें प्रमाण शेंकडा १९॥, दिल्ली प्रांतांत १४, आसामांत १० ब्रह्मदेशांत ९॥, मध्यप्रांतांत ९ चे जवळ, मद्रास यांत सुमारें ८, पंजाबांत ७, मुंबईत ४, व बंगाल्यांत १॥ वर किंचित् आहे. याचा अर्थ असा कीं जेथें सुशि-क्षितांचा भरणा विशेष अशा प्रांतांतून शिक्षणाचा प्रसार कमी, व जेथील लोक अडदांड, अशिक्षित, आणि अडाणी तेथें तो जास्ती झाला आहे! बंगाल व सरहद्दी-वरील प्रांत यांची तुलना केली ह्मणजे ही गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते. हें कसें घडून आलें व हें गौड बंगाल काय आहे त्याचा उलगडा आह्मांस होत नाहीं.

आतां दुय्यम प्रतींच्या शिक्षणाची (हायस्कुलांतल्या इंग्रजी शिक्षणाची) स्थिति कशी होती तें पाहूं. गेल्यासालीं हें शिक्षण घेणारांची संख्या ६९९७२ नें वाढली. रिपोर्टांत ह्मटलें आहे कीं, इंग्रजी शिक्षणाला लोकांकडून फार मागणी होती; पण मागणी ज्या मानानें मोठी त्यामानानें शाळेंतल्या जागा वाढल्या नाहींत. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. हजारों मुलांना शाळेंत प्रवेश न मिळाल्यामुळें भटक्या मारीत हिंडण्याचा प्रसंग आला. इतक्या मुलांच्या आयुष्यांतलें एक मोलवान् वर्ष सरकारनें कसें फुकट जाऊं दिलें, त्यांच्या शिक्षणाची तजवीज करणें हें सरकारचें कर्तव्य नव्हतें काय? असल्यास शिक्षणाची महती पूर्णपणें ओळख-णारें इंग्रज सरकार कसें स्वस्थ बसलें हें दुसरें गौडबंगाल ह्मटलें पाहिजे.

आतां उच्च प्रतीचें शिक्षण घेऊं. हिंदुस्थानांत कॉलेजांची संख्या एकंदर १२९ आहे. व रिपोर्टाच्या सालीं या कॉलेजांतून ३७९२० विद्यार्थी शिकत होते. ही संख्या मागच्या सालापेक्षां ९॥ हजारांनीं वाढली. पण त्यामानानें कॉलेजांची संख्या जितकी वाढावयास पाहिजे तितकी वाढली नाहीं. कां बरें? उच्च शिक्षणावरचा सरकारचा विश्वास उडाला असें ह्मणावें काय?

✓ज्या शिक्षण प्रसारावर देशाच्या भावी उत्कर्षावर सारी मदार त्या शिक्षणाची ही स्थिति गेल्यासालीं होती. यापुढें युद्धामुळें काटकसरीची कैंची लागून आणखी किती दुर्दशा व्हावयाची आहे कोणास ठाऊक! सरकारला खर्चांत काटकसर करण्याला दुसऱ्या पुष्कळ जागा आहेत. शिक्षणाचे कामीं का-टकसर करणें हें व्यवहारज्ञानास संमत नाहीं. अडक्याचे फायद्यासाठीं दिडकीचें नुकसान असा प्रकार यांत होत आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचे लक्षांत ही गोष्ट येत नाहीं. शिक्षणाचे कामीं काटकसर करण्याचें उदाह-रण मुंबई सरकारनें घालून दिलें आहे. त्यांनीं शिक्षणसंस्थांना इमारतीसाठीं किंवा नव्या सुधारणेच्या गोष्टीसाठीं पैसा मिळणार नाहीं अशी स्पष्ट सूचना देऊन ठेविली आहे! मुंबई सरकारचें अनुकरण इतर प्रांत ही करतात कीं काय अशी भीती आतां वाटूं लागली आहे. शिक्षणाचे कामीं खर्चांत काटकसर केल्याशिवाय सरकारचे अन्य उपाय हरले असा याचा अर्थ समजावयाचा काय?

---

### कोण ही जल्पना!

पुदुकोटा येथील राजे साहेबांनीं एका आस्ट्रेलियन मडमेशीं विवाह लावून तिच्यासह मोठ्या थाटानें नगर प्रवेश केला, तेव्हां राजनिष्ठ प्रजेनें त्यांना मानपत्र दिलें. त्या मानपत्रास उत्तर देतांना राजेसाहेबांनीं आप-ल्या कृत्याचे समर्थनार्थ सांगितलें कीं माझ्या डोक्यावरील कर्तव्यभार हल्का करण्यास योग्य अशा सहधर्मचारिणीचा शोध मी आपल्या देशांत पुष्कळ केला, पण माझी निराशा झाली, तेव्हां माझ्या ध्येयाला जवळ जवळ जाऊन पोचणारी अशी वधू मी परदेशांतून आणिली आहे! ज्या देशांत संयोगि-ता, अहिल्याबाई होळकर, मैनाबाई पवार, इ. स्त्रीरत्नें निर्माण झालीं त्या देशांत इतक्यांतच कर्तव्यदक्ष अशा स्त्रीयांचा येवढा दुष्काळ पडावा हें आश्चर्य आहे. पुदुकोटचें संस्थान ह्मणजे देशी संस्थानांत अग्रगण्य आहे असें नाहीं. तेथील राजेसाहेब ही मुत्सद्देगिरींत किंवा पाश्चात्य फ्याशन्सची नक्कल उठवि-ण्यापलीकडे शहाणपणाच्या बाबतींत इतर संस्थानिकांना मागें टाकणारे आहेत अशी ही प्रसिद्धी नाहीं. मग त्यांच्या सारख्या सामान्य प्रतीच्या संस्थानिकांना साजेशी पत्नी हिंदुस्थानांत दुर्मिळ झाली आहे असें ह्मणणें ह्मणजे केवढी धृष्टता ह्मटली पाहिजे! हिंदुस्थानच्या स्त्रीवर्गाचा हा धडधडीत अपमान आहे. पाश्चात्य देशांत स्त्रियांना मान देण्याची चाल आहे. पण ही साधी गोष्ट सुद्धां पाश्चात्य देशांत प्रवास करून आलेल्या ज्या राजेसाहेबांना शिकतां आली नाहीं, त्यांनीं माझा कर्त-व्यभार हल्का करणारी स्त्री मला हिंदु-स्थानांत आढळली नाहीं असें ह्मणणें ह्मणजे स्वतःच्या तोंडावरून दिवे ओवाळून घेण्या-सारखेंच आहे.

---

### हिंदुस्थानचा कापूस आणि जपानचे व्यापारी.

सध्यां हिंदुस्थानांतून पुष्कळसा कापूस जपानांत जाऊं लागला आहे याबद्दल व्या-पारी लोकांत—विशेषतः गोऱ्या व्यापाऱ्यांत विशेष चर्चा चालूं आहे. जपान एकसारखा हिंदुस्थानचा कापूस खरीद करून नेत आहे हें पाहून म्यांचेस्टरचे व्यापारी चकित झाले आहेत. जपानशीं स्पर्धा केल्यास आपला टिकाव लागणार नाहीं हें त्यांना पूर्णपणें कळून चुकलें आहे. कोलंबो येथील एका प्रतिष्ठित व्यापाऱ्यानें वर्तमानपत्राच्या एका प्रतिनिधीशीं बोलतांना यांतलें जें इंगित सांगितलें तें असें आहे कीं हिंदु-स्थानांतून कापूस नेऊन त्याचें सूत काढून किंवा कापड विणून तें परत हिंदुस्थानांत विकण्यासाठीं आणण्याचे कामीं जपान सर-कार आपल्या व्यापाऱ्यांना द्रव्यसहाय्य करीत आहे. त्यांना जपानी सरकारकडून सर्व तऱ्हेच्या सवलती मिळत आहेत. येथपर्यंत कीं इकडून कापूस भरून नेणाऱ्या जहा-जांचें भाडें सुद्धां जपानी सरकार कंपन्यांना देत आहे. यामुळें जपानी लोक हवा तो भाव देऊन कापूस खरीद करीत आहेत. तितका भाव म्यांचेस्टरवाल्यांनीं दिला तरी त्यांना बोटीचें भाडें फार पडतें. जपानशीं स्पर्धेंत त्यांच्यानें टिकाव धरवत नाहीं.

## मध्यप्रांतांतील सहकारी मंडळ्या.

पृथ्वीच्या पाठीवर एक ठिकाणीं भूकंपाचा धक्का बसला तरी त्याचा परिणाम शेंकडों किंबहुना हजारों मैलांच्या अंतरावरील नाजूक यंत्रांत जसा दिसून येतो, त्या प्रमाणें पांच हजार मैलांवर युरोपांत चाललेल्या युद्धाचा परिणाम हिंदुस्थानांतल्या शेतकीवर व तिच्याशीं संबद्ध असलेल्या सहकारी चळवळीवर झालेला आहे ही गोष्ट जशी संयुक्त प्रांताच्या त्याच प्रमाणें मध्यप्रांताच्या ही अनुभवाला आलेली आहे. गतवर्षी युरोपांत युद्ध सुरू झाल्याबरोबर सहकारी पतपेढ्यांतल्या आपापल्या ठेवी लोकांनीं भराभर काढून घेतल्या. ती वेळ रब्बीच्या पेरणीची असल्यामुळें शेतकऱ्यांना पतपेढ्यांकडून कर्जाऊ पैसे काढण्याची वेळ होती. अशा ऐन हंगामाचे वेळीं पतपेढ्यांना ठेवींचे पैसे परत द्यावे लागल्यामुळें शेतकऱ्यांना फार अडचण झाली. तथापि पेढ्यांनीं ठेवींची रकम पै नपै चुकती केल्यामुळें लोकांत पेढ्यांची पत राहिली ही मोठी समाधानाची गोष्ट ह्मटली पाहिजे. अर्थात् लोकांचा विश्वास कायम राहिल्यामुळें सहकारी मंडळ्यांची संख्या वाढण्यास मदत झाली. प्रत्येक संस्थेला परीक्षेचा—कसोटीला लागण्याचा—काळ येत असतो. तसा हा काळ आला असतां सहकारी मंडळ्या त्या कसोटीला उतरल्या, हेंच त्यांची संख्या सभासदांची संख्या, व भांडवलाची रकम यांच्यांत वाढ होण्याचें मुख्य कारण होतें. लोकांना आतां सहकारीतत्त्वाचा फायदा बराच चांगला कळूं लागला आहे व रजिस्टर न केलेल्या मंडळ्या जागोजाग स्थापन होत आहेत. एका अर्थी ही संतोषाची गोष्ट आहे. पण रजिस्टर न केलेल्या मंडळ्यांना आपल्यावरची जबाबदारी ओळखण्यास न शिकविलें तर मात्र केव्हां त्यांच्या हिशोबांत घोटाळा उडेल व सहकारी तत्त्वाची अब्रू जाऊन लोकांत त्याच्याविषयीं अविश्वास उत्पन्न होईल याचा नेम नाहीं. यासाठीं त्यांच्या हिशोबाच्या तपासणीची कांहीं व्यवस्था सरकारनें लवकर करणें अत्यंत अवश्यक आहे. सहकारी तत्त्व नुसतें शेतकीलाच नाहीं, तर भांडवलाच्या अभावामुळें बसत चाललेल्या विणकऱ्याच्या उद्योगाला ही लागू करण्याचा सरकारचा विचार आहे. याच्याही पलीकडे या तत्त्वाचा उपयोग करून घेतां येईल या कामीं ब्रह्मदेशाचें उदाहरण अनुकरणीय आहे. तेथें या सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या गांवकऱ्यांनीं गुन्हेगाराचा तपास लावण्याचें कामीं पोलिसाला मदत केल्याबद्दल पोलिस रिपोर्टांत उल्लेख आहे. यांत आह्मांस कांहीं गूढ वाटत नाहीं. कारण, सहकारी चळवळींत एकी व विश्वास या गोष्टी मूलभूत आहेत. त्या संपादल्यावर त्यांचा उपयोग व्यापार, उद्योगधंदें वगैरेंत जसा करतां येतो, त्याच प्रमाणें गांवचा बंदोबस्त, व समाजसुधारणा मद्यपाननिषेध, शिक्षणप्रसार, इ० गोष्टींत ही सहज करतां येण्यासारखा आहे. तत्त्व हातीं आलें आहे. आतां योजकाचीच तेवढी वाण आहे.

---

## बादशहाचा निरोप.

गतवर्षी युरोपांत युद्ध सुरू झाल्याबरोबर हिंदुस्थानांतून जें सैन्य ब्रिटिश सरकारच्या मदतीसाठीं धावून गेलें, त्याला युरोपांतला कडक हिंवाळा गतवर्षी तिकडे काढावा लागला. त्यांत त्याचे बरेच हाल झाले तरी राजनिष्ठेनें प्रेरित झालेल्या शिपायांनीं त्या हालांना न जुमानतां शौर्यानें लढून इंग्रज सरकारला चांगली मदत केली व ब्रिटिश राज्याची इभ्रत राखली. यंदा पुनः त्यांना हिंवाळ्यांत पूर्वीच्या सारखे हाल भोगण्याची पाळी येऊं देणें इष्ट न वाटून बादशहा पांचवे जार्ज यांनीं त्यांस तेथून काढून अधिक उष्ण हवेंत नेण्यासाठीं नुकताच निरोप दिला, त्या निरोपाचे शब्द खरोखर अत्यंत कळकळीचे व हिंदी शिपायांचे मनाला ब्रिटिश सरकारविषयीं प्रेमाचे भरतें आणणारे आहेत यांत शंका नाहीं. प्रेमाच्या शब्दांनीं मनुष्याचा शीण हरतो. आणि पुनः तसे क्लेश भोगण्यास नवी उमेद वाटूं लागते हा अनुभव कोणाला नाहीं? या शिपायांनीं ब्रिटिशलोकांच्या खांद्याशीं खांदा लावून जिवाची परवा न करतां लढून जें शौर्याचें कृत्य केलें त्यामुळें इंग्रज व फ्रेंच सेनापतींकडून वाहवा मिळविली, यांतच त्यांनीं हिंदुस्थानची ही निःसंशय मोठी सेवा केली आहे. त्यांनीं आपल्य मातेचें मुख उज्ज्वल केलें आहे. आणि जेव्हां इमानांची खैरात करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां त्यांची ही मर्दुमकी आणि ही निरपेक्षतेची सेवा ब्रिटिश राष्ट्राच्या स्मरणांत पूर्णपणें राहील अशी सर्वांस मोठी उमेद आहे.

---

## प्रसादचिन्ह.

चित्ररथ गंधर्व कौरवावर हल्ला करून त्यांनां कैद करून घेऊन चालल्याची बातमी पांडवांच्या कानीं पडतांच एक क्षणाचाही विलंब न करितां कौरवास सोडविण्यास त्यांना सशस्त्र उभे ठाकलेले पाहून गंधर्वांनीं पांडवाची विनवणी केली कीं "कौरव हे तुमचे शत्रू आहेत. आपल्या शत्रूला आह्मी कैद करून घेऊन चाललों यांत आह्मी आपलें शक्य तें हीतच करीत आहोंत. तेव्हां हितकर्त्यावर हत्यार उचलणें हें आपल्यासारख्यांना उचित नव्हे त्यावेळीं राजनीतिकुशल सहदेव पांडवांनीं गंधर्वांना असें बाणेदार उत्तर दिलें कीं "परि अन्यशत्रूघातीं बंधू आहोंत एकशें पांच" आपसांत भांडत असतांना ते शंभर व आह्मी पांच आहोंत परंतु दोहोंच्याही शत्रूशीं भांडतांना मात्र आह्मी 'एकशेंपांच आहोंत हें तुह्मी विसरता कामा नये! सर्व युरोपखंडभर युद्धाचा प्रचंड वणवा पेटवून देऊन जर्मन शत्रू प्रत्यक्ष आपल्या दरवाज्याशीं येऊन भिडला असतां जर आपण स्वयंप्रेरित ऐकमत्याच्या बळकटीनें शत्रूस प्रतिरोध करण्यास तयार होऊन 'हिंदुस्थान हें अभेद्य आहे. येथें शत्रूस तसूभर सुद्धां स्थळ मिळणार नाहीं' अशी खात्री करून देण्यास सिद्ध होणार नाहीं, तर आत्मनाशाचे ग्रह प्रबळ झाले आहेत असेंच ह्मटलें पाहिजे; परंतु नागपूर येथें भरलेली प्रांतिक परिषद् ज्यानें ज्यानें ह्मणून पाहिली आहे त्याची खात्री झाल्यावांचून राहिली नसेल, कीं प्रसंगोपात् हिंदुस्थान हे एकीचे माहेरघर होऊं शकतें. व विपरीत बुद्धि हिंदुस्थानास अझून झाली नसून विनाशकालाची कल्पनासुद्धां मनांत उद्भवणें शक्य नाहीं.

चार भांडीं एके ठिकाणीं आलीं ह्मणजे तीं एकमेकांस लागावयाचींच या न्यायानें पक्षभेद कोणत्याही देशांत केव्हांही असतोच व राष्ट्रांतील जिवंतपणा त्यानें कायम राहतो या दृष्टीनें तो आवश्यकही आहे; परंतु राष्ट्रीय आपत्तीची छाया पसरली असतां आपसांतील पक्षभेद विसरणें हें खरें राष्ट्रीयत्वाचें लक्षण आहे. स्वतःचा नाश झाला तरी पत्करला पण दुसऱ्याचा नाश करीन अशा बुद्धीनें पक्षभेदाची रणें माजविणें ह्मणजे प्रत्यक्ष राष्ट्रदेवतेशी वैर करण्यासारखें होय! डॉ. मुंजे व सर बिपिन बोस हीं नांवें पक्षभेदाच्या परस्पर तीव्र विरोधाची दर्शक झालीं होतीं; परंतु तेच डॉ. मुंजे व सर बिपिन हातांत हात घालून पास केलेले ठराव परिषदे तर्फे प्रांतिक सरकारापुढें ठेवण्यास घेऊन जातात.

जहालांनें जहालत्व नष्ट झालें कीं मवाळांचें मवाळत्व नष्ट झालें अशी शंका उत्पन्न होऊन विचारी माणसाची अशी ठाम समजूत होते कीं, ज्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें पक्षभेद उत्पन्न होतात तीच राष्ट्रीयत्वाची भावना आपत्काळीं पक्षभेद विसरून जाण्यास कारण होते व आमच्या या मध्यवर्ती प्रांतात ती भावना पूर्णपणें नांदत असून एकीचें श्रेय उभय पक्षाला आहे. आपण अशी आशा करूं या कीं नागपूर या मध्यापासून प्रकट झालेल्या या भावनेचें किरण आसमंतात सर्व हिंदुस्थान प्रकाशित करतील व इतर प्रांतांना नागपूरचें अनुकरण करण्यास शिकवितील या दृष्टीनें मध्यप्रांतीय परिषद् हा येत्या नाताळांतील परिषदांचें पूर्व प्रसादचिन्हच होय.

---

## स्वर्गारोहण.

### (देऊळगांवराजा येथील श्रीमत् परमहंस रंगनाथ महाराज यांचें निधन.)

मोगलाई इलाख्यांतील जालनापूर येथील यजुर्वेदी ब्राह्मण देशमुख घराण्यापैकीं सुप्रसिद्ध परमहंस रंगनाथ महाराज यांनीं कार्तिक वद्य १३ शके १८३७ शनिवार रोजीं दुपारीं चार वाजतां न्हावें या गांवच्या जंगलांत एका पर्णकुटिकेंत आपला पंचमहाभूतात्मक देह ठेविला. त्या पर्णकुटिकेजवळ त्यांचे शिष्यांनीं व भाविक मंडळींनीं विस्तीर्ण मैदानांत श्रीदत्ताचें देवालय बांधून ठेविलें आहे. त्या देवळाचे तळास चिरेबंदी भुयार तयार करून ठेविलेलें होतें. त्यांत रंगनाथ महाराजांचे देहास रविवारीं संध्याकाळीं समाधि दिली. समाधिचे वेळीं आसपासचे हजारों लोक जमले होते, व वाजंत्री, चौघडे, वगैरे महाराजांचे सन्मानार्थ वाजत होते. यांचे पुण्य तिथीचे दिवशीं मोठी जत्रा भरणार आहे असें समजतें.

श्रीमत् रंगनाथ महाराजांचे तीर्थरूप चिमणाजी पंत देशमुख हे साधुमार्गांतलेच होते. हे खाऊन पिऊन सुखी अशा जमीदार घराण्यापैकीं होते, तरी मधुकरी मागून आपला निर्वाह करीत असत. यांचें कुटुंब जालनापूर येथील केशवराज मठाचे तळघरांत प्रसूत होऊन त्यांचे उदरीं रंगनाथ महाराज यांचा जन्म झाला. यांचे आईबाप लहानपणींच वारले. यांचे लहानपणचे खेळ साधारण मुलांचे खेळाप्रमाणें नसून वाळूच्या पिंडी कराव्या, वगैरे खेळ खेळत असत. कोणी यांना मारलें असतां त्यांच्यावर यांनीं कधीं रागाऊं नये. वडिलाप्रमाणें यांनीं ही मधुकरी मागून पूर्ववयांत आपला निर्वाह केला. जालनापूर येथील लोक यांस वेडा पिसा ह्मणत असत. त्याकाळीं जालनापूरास नूरशावली नांवाचे अवलिया राहत होते. व त्यांस हिंदू व मुसलमान सारख्या भावानें भजत असत. कारण नूरशावली हे मूळचे हिंदू होते. त्यांचेकडे चिमणाजीपंतानें आपल्या चिरंजीवास नेऊन सांगितलें कीं, हा मुलगा वेड्या पिशासारखा करितो हें काय! तेव्हां नूरशावली ह्मणाले कीं, हा मुलगा तुमचे उपयोगीं पडण्यासारखा नाहीं; व नूरशावली यांनीं मुलास आपले मांडीवर घेतलें. व त्यांच्या डोळ्यांस आनंदाश्रू आले. जमीदार घराण्यांत मुलगा लग्नावांचून राहूं नये. ह्मणन त्यांचे चुलत्यानें लग्न करण्याचा पुष्कळ घाट घातला; परंतु रंगनाथ महाराजांनीं त्यांची अद्वैत दृष्टीनें समज घालून घरांतून चालते झाले. नंतर जवळच्या गोळेगांव, न्हावें, वरूड, वगैरे खेड्यांतून ते रहात. वरूडच्या महादू पाटलाचे मळ्यांत यांनीं बारा वर्षें घालविलीं. भिक्षा मागून धान्य पीठ मीठ आणावें व महाराज महादू पाटील व किसन पाटील यांनीं मिळून तें अन्न ग्रहण करावें व आल्यागेल्यास द्यावें, ही वहिवाट होती. महादू पाटील व किसन पाटील हे दोघे ही हल्लीं हयात आहेत. त्यांचे सांगण्यांत येतें कीं, महाराज जे कोरडे अन्न भिक्षा मागून आणीत ते सर्व एका मडक्यांत शिजवीत. त्या मडक्यास दिवाणी हंडी ह्मणत. व किती ही लोक भोजनास बसोत ती अन्नपूर्णा दिवाणी हंडी सर्वांस अन्न पुरवी. कधीं कोणास कमतरता पडली नाहीं. त्यांचेकडून आणखी ही कांहीं सिद्ध चमत्कार झाल्याचें सांगतात. पुढें टेंभूर्णी, डोणगांव, व देऊळगांवराजा, येथें त्यांनीं मठ स्थापन केले. प्रसिद्ध सर्कसवाले काशीनाथपंत छत्रे हे रंगनाथ महाराजांचे शिष्य असून त्यांचेकडून बरीच मोठी देणगी यांचे देऊळगांवचे मठास मिळालेली आहे; तसेंच कित्येक शिष्य मंडळी व भाविक लोक यांजकडून बऱ्याच दणग्या द्रव्यरूपान व धान्यरूपानें नेहमीं येतात. मुकुंदराज महाराजांचे परमामृत ग्रंथातील मुक्ति रहस्य प्रकरणांतील ओंवी २१ पासून २९ पर्यंतचें रहस्य रंगनाथ महाराजांचे ठिकाणीं पूर्ण

वसत होतें, त्या ओंव्या वाचकांस सहज वाचण्यास मिळाव्या ह्मणन पुढें दिल्या अहितः—

कां धरी पिशाच लीला ॥ तरी होय जगा वेगळा ॥ लोकां न दाखवी डोळा ॥ शहाणपण ॥२१॥ इत्यादि आचार दाविती ॥ फळापेक्षा न भाविती ॥ लोकांसी देखी लावेती ॥ वर्तती ऐसे ॥२२॥ विश्वसाक्षी योगीराणा ॥ जाणे सर्वांतरीच्या खुणा ॥ परि तो वाटे जना ॥ वेडिया ऐसा ॥२३॥ असे तरी लोकां माजी ॥ परि कर्म क्रिया सर्व त्यजी ॥ राहे सहजा सहजीं ॥ निष्कर्म पणें ॥२४॥ आपण एक सर्वेश्वरू ॥ कोणा सांगेना व्यवहारू॥ क्रिया कर्म न सांगे करू ॥ नाथिलेंची ॥२५॥ उग्र खलता दावितसे॥ तेणें लोक हांसतसे॥ हेंही तया नाहीं पिसें॥ अद्वैतपणें ॥२६॥ ऐशिया स्थिती राहावें॥ स्वरूप जाणोनि भोगावें॥ जन उद्धरावे कीं त्यजावे॥ न स्मरे तो॥२७॥ विश्व आपण भोगो न भोगो॥ परि स्वरूप तया सांगो॥ हें कांहीं नदे लागों॥ आपणाकडे॥२८॥ विश्वाचा दाहो न लागे अंगा॥ तो द्वंद्वातीत पैं गा॥ एक देशिया जगा॥ न पाह योगी॥२९॥

श्रीमत् रंगनाथ महाराजांचा पेहराव अंगांत भगवी लांब कफनी व डोकीस टोपी हा असे समाधिकाळीं यांचें वय सुमारें ८० वर्षांचें होतें. यांचे सुप्रसिद्ध शिष्यवर्गापैकीं सदानंद महाराज कांहीं वर्षापूर्वी समाधिस्थ झाले. त्यांची समाधि यांचे समाधीपासून एक मलावर धारकल्याण गांवचे. जंगलांत आहे; व त्यांचे सन्मानार्थ पौषमासीं यात्रा भरत असते. रंगनाथ महाराजांची प्रसिद्ध शिष्यीण आनंदीबाई चार वर्षांपूर्वी निवर्तली. तिची समाधि महाराजांचे समाधी जवळच आहे व वर देऊळ बांधलेल आहे.

अर्वाचीन दृष्टीचे ऋषीवर्य नामदार गोखले, नामदार फेरोजशा मेथा वगैरे पुरुषांनीं जनतेची सेवा निराळ्या दिशेनें केली. या प्राचीन दृष्टीच्या ऋषीचा उपयोग जगास निराळ्या दिशेनें झाला. ऋषींची व महर्षींचीं चरित्रें जगांत पारमार्थिक दृष्टीनें सदैव बोधपर व हितपरच व्हावयाचीं मग ते कोणत्याही कुळांत, कोणत्याही ज्ञातींत, व कोणत्याही देशांत निर्माण झालेले असोत. या उपजत सिद्ध पुरुषाचें सांद्यंत चरित्र देण्याचा लेखकाचा विचार आहे, परंतु ही सेवा घडणें विश्वसनीय माहिती मिळण्यावर अवलंबून आहे व त्यास कालावधी लागेल.

श्रीमत् रंगनाथ महाराज लौकिक दृष्टीनें हें जग सोडून गेले ! व लौकिक दृष्टीनें ही मोठी हानिच होय ! त्यांचें चारित्र डोळ्यांपुढें ठेवून बोध घेत असणें हें जनतेचें आतां कर्तव्य होय, एवढें लिहून ही समाधिस्थ महाराजांची अत्यल्प व नम्र सेवा पुरी करितों.

व्य. रा. मु.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—या ऋतूंतली हवा शरीराला जशी संवर्धक तसें पाणीही विशेष रुचीकर असून क्षुधेला तीव्र करिते. थंडी वड्याळांतील लोलकाप्रमाण कधीं कडक व कधीं मंद अशी असते, पण उन्हाच्या तीव्रपणानें थंडीची बाधा बिल्कुल होत नाहीं. या हंगामाच्या दिवसांत कॉटन मार्केटच्या मैदानांत डोंगरासारख्या कापसाच्या राशी पाहून मोठी मौज वाटेत.

रा. रा. मूलचंद तिवारी सबार्डिनेट जज्य मल्कापूर यांची बदली खांडवा येथें झाली आहे. हे गृहस्थ न्यायाच्या कामांत फार चांगले असून कामाचा निकालही लवकर लावण्याकडे यांचें धोरण विशेष असतें. यांस इतर विद्या व्यासंगाचीही गोडी असून त्यांच्या सौजन्यामुळ ते जेथें जेथें राहतात तेथें तेथें लोक त्यांस आपोआपच विशेष मान देत असतात.

**दिल्ली दरबारचा वाढ दिवस**— १२ डिसेंबरची तारीख इतिहासांतच सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेविली आहे असें नाहीं तर तिची आठवण दरसाल नतन पिढींतली विद्यार्थी मंडळी आपापल्या शाला गृहांतून मोठ्या प्रेमोत्साहानें वृद्धिंगत करीत असतात. आणि तदनुरुप आमच्या जिल्ह्यांत कालचा दिवस फार सुंदरपणानें साजरा करण्यांत आला.

महानुभाव धर्मोन्नति परिषदेची ३ री बैठक श्रीक्षेत्र जांभोरा तालुका यवतमाळ येथें दत्त जयंतीच्या मुहुर्तावर भरणार आहे.

रा. रा. आर. जे जॅकसन असिस्टंट कमिशनर यांची स्पेशल ड्यूटी संपल्या कारणानें त्यांस ज्युडिशिअल कमिशनरच्या कचेरीचे रजिस्ट्रार नेमण्यांत आलें.

रा. रा. एन. जी. राउटन रजिस्ट्रार निस्बत ज्युडि. कमिशनर यांस बुलडाण्यास असि. कमिशनर नमण्यांत आल.

रा. रा. धनजीशा दोराबजी दार्दीमास्तर ए. अ. कमिशनर बुलडणा यांस शिवणी जिल्ह्यास बदलण्यांत आलें. यांच्या आजपर्यंतच्या वऱ्हाडच्या नौकरीमध्यें प्रामाणिकपणा व कार्य दक्षता हीं विशेष दिसून आलीं; आणि त्यामुळें लोक त्यांस विशेष चाहतात.

---

## NOTICE

NOTICE is hereby given that Messrs Sorabji Edalji Warden and Khursedji Maneckji Dalal trading under the name and style of Sorabji and Khursedji have contractad to sell to my clients the Leasehold properties more particularly first and secondly described in the schedule hereunder written together with the Press and Ginning Factories and other buildings and structures erected and standing thereon.

ALL PERSONS having any claims against the said properties either by way of inheritance gift sale mortgage charge lien lease or otherwise are hereby required to make the same known in writing to the undersigned at his office at 99 Medows Street. Fort Bombay within 14 days from the date hereof; otherwise the purchase will be completed without reference to any such claim and the same, if any, will be considered as waived.

The schedule above referred to:-

Firstly:- ALL THAT piece or parcel of Inam land or ground containing by admeasurement three acres forming part of a larger piece of land admeasuring 28 acres 8 Gunthas situate at Mauza Shahjwanpur Taluka Akola Zilla Akola bearing Survey No. 130 and which said piece of land is bounded as follows:- that is to say, on or towards the East by a road for carriage from Akola to Shiloda, on or towards the West by the field of Sonaji Rakhode, on or towards the South by Doharpure and on or towards the North by the remaining land of the field belonging to the heirs of Vithal Balkrishna Mahajan and beyond that by the field of Chhatrapati Deshmukh.

Secondly:- ALL THAT piece or parcel of land or ground containing by admeasurement 3 acres forming part of a larger piece of land admeasuring 4 acres and one guntha situate at Mouza Shahjwanpur Taluka Akola Zilla Akola bearing survey No. I Dated this 8 th day of December 1915.

Barjor B. Aibara
for Mr. Daolatrao Jayaram Mantri
Purchasers, Attorney.

N. N. 414

---

## नोटीस

नोटिस बेशमी गणु वा। नवलाजी पाटील तायडे मौजे तुलंग

यांसः—

नोटिस देणार भागाई मर्द खुशाल पाटील मौजे कळंबी खुर्द ता. बाळापूर जि. आकोला लिहून देण्यांत येते कीं, तुह्मी मजला माझे सावकाराचे कर्ज तोडण्याकारितां रकम रुपये एकहजार १००० शिक्केसारी देऊन सर्व रकम नाहींसि करून बचत राहिल्यास माझे शेतीचे लागवडा करितां द्यावी परंतु असें तुमचे व आमचे आपसांत बोलणें ठरलें होते. परंतु तुह्मी सावकाराची रकम तोडाधी ती न देतां व मजला खर्चाकरितां रकम न देतां विनाकारण रकम रुपये एकहजार चा दस्तैवज लिहून घेतला. तर मी ज्या जरूरी करितां दस्तैवज लिहून दिला, ती जरुर ह्मणेज सावकाराची मजवर फिर्याद करू नये. व कोर्ट खर्च मजवर बसू नये असे हेतूनें करून दिला परंतु तुह्मी दस्तैवज करून घेऊन आपले घरीं स्वस्थ बसलां करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदर्हु दस्तैवज करून दिलेला मजला नोंदून देण्याची व रकम घेण्याची कांहीं जरुरात राहीली नाहीं. कारण सावकारानीं ही फिर्याद केली, व लागवडीचाही वेळ गेला, करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदर्हु दस्तैवजास खर्च लागलेला माझा तुह्मी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत पाठऊन द्यावा. कारण तुह्मी मजला विनाकारण धापीवर घेऊन खर्चांत घातले व माझे काम ही केलें नाहीं. करितां नुकसानीचे मालक तुह्मी आहांत. मी नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत आले आहे. तर मजला त्या दस्तैवजाची व रकम घेण्याची जरुरात राहीली नाहीं. करितां या नोटिशीनें कळविले, शिवाय तुह्मास दिलेले मुकत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केले आहे. व या पूर्वी तोंडीं सांगितलें आहे. कळावें. ता. ९-१२-१५

सही

भागाई मर्द खुशाल पाटील नि. खु.
दस्तुर विठोबा रामजी पाटील
नो. नं. ४१९

---

## नोटीस

सक्शेशन सार्टीफिकीट नंबर. ९-१९१५
विद्यमान सब जज्ज सा॥ खामगांव

मैत चंपाबाई मर्द रंगलाल आगरवाले इचे जीनगीचे वारसाचे सार्टीफिकीट संबंधीं अर्ज.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, चंपाबाई जवंजे रंगलाल आगरवाले रा. खामगांव ही मैत झाली असून तिचा वारस पुतण्या नंदलाल रामाकिसन रा. खामगांव यानें चंपाबाई जवजे रंगलाल रा. खामगांव इच्या जिनगीचे वारसाचे सार्टीफिकीट मिळण्याविषयीं या कोर्टांत अर्ज केला आहे. तरी नंदलाल रामाकिसन रा. खामगांव यांस सार्टीफिकीट देणें बद्दल ज्या कोणाची हरकत असेल त्यांनीं या कोर्टांत ता. ८-१-१९१६ इसवी रोजीं हजर होऊन आपली हरकत दर्शवावी. तसें न केल्यास नंदलाल रामाकिसन रा. खामगांव यांस सार्टीफिकीट दिलें जाईल. कळावें. ता. ८-१२-१९१५

आमचे सही निशी व कोर्टाचे शिक्या निशी दिले.

R. N. Trivedi
Sub Judge Khamgaon

No.No.416

---

## नोटीस.

नोटीस बेशमी पितांबर व्यंकोबा सोनार रा. खामगांव ता० मजकूर जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी बायको नामे पार्वती मर्द नारायण ही तुमची पुतणी असून आज सहा सात महिने झाले माझे घरून तुमची आई अगदीं मरणोन्मुख झाली आहे. अशी थाप देऊन तुह्मी आपले घरीं नेली त्यावेळी माझे घरून तिनें आपल्या आंगावर खालीं लिहील्या प्रमाणे डागीने नेले आहेत.

१२० रु. तोड्याचा जोड १ चांदीचा वजन तोळे १२५
८० रु. पुतळ्या सोन्याच्या १२ व पदक १ वजन ३ तोळे ४ मासे
५० रु. नथ खऱ्या मोत्याची त्यांत मोती १५ ल्हान मोठे व सोने ४ मासे
३० रु. बुगड्या सोन्याच्या वजन ९ मासे व झुबे सोन्याचे मोत्यासहीत वजन ३ मासे
२८० रुं

येणे प्रमाणें डागिने तिनें आपले आंगावर नेले आहेत. मी माझे बायकोस तुमचे घरीं सात आठ वेळां घेण्यास आलो असून तुह्मी तिला पाठविलें नांहीं, यावरून तुमचा तिचे डागिने पचविण्याचा विचार दिसतो. तरी नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत वरील डागिन्यासह माझी बायको माझे घरीं मु० टाकळी येथें आणून घालावी. तसें न केल्यास तुमचेवर रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. व पुढें तुह्मी तिचे खावटी खर्चाबद्दल वगैरे दावा केल्यास किंवा नोटीस वगैरे दिल्यास त्याजबद्दल मी जबाबदार नाहीं. कळावें. या नोटीसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल ता० ९-१२-१९१५ इ.

सही

नारायण कृष्णाजी शिणगारे वार्शि-
टाकळीकर मु० आकोला द. खु.

नो. नं. ४१७

# आठ आण्यांत लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र.

२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति

३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.

४ **मृताशीं** संभाषण करण्याची युक्ती.

५ **गानविद्या**—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या

**वशीकरण**—विद्या.

**पत्ता**—स्पष्ट व बालबोधींत लिहावा.

प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible.

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet, the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

## WANTED

A COMPOUNDER FOR THE CENTRAL JAIL NAGPUR.

Pay according to grad. Free quarters Application together with testimonials to be sent to the undersigned.

C. H. Bensley,
Lieut:Col: I.M.S.
Superintendent, Central Jail
Nagpur

N. N. 404

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना.

## ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठि:--पांजर पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! **ओटो सुरंगी** ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी.

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर. मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळयास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळयापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ १ रु. १॥ रु पर्यंत अरगजा व पिंना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

ॐ नमः श्रीगणेशाय.

# आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह. जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें त्यांत उपयुक्त वनस्वतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, कारितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. [illegible] यांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांचा लाला, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

**पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी.** } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० ३६९

# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4 1/2 CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607, | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86 [illegible]0 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes a recort for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after provining for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted–Terms liberal

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २० माहे दिसंबर सन १९१५ ई० [ अंक ४६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घ्यावयाची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागेराहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक त्यावर तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } S. Clements, एजंट

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥।-- तो. शुद्ध शिलाजीत. -।- तो. खालिस कस्तुरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला. जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयांचें विवेचन करणारें--

### आर्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं मार्मिक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता-- विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः-- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भत्याचे, लिस्टफार्म पद्याच व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमून छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोल } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने-- मंगळसूत्र साज, ठुशी-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळ टीका, मुद्रा, अग्रफुलें सांखी व वाघन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल--तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तांटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर बाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय--कोल्हापूर
नो. नं. १९३

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशीं हा विद्या फार प्रबळ असून तिकडील नटेली, लंगोटे, छा छू करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें विशेष नाहीं. यात कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारीकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशीकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया. ट. ख. २ आणे.

पत्ताः-- गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

## NOTICE

Tenders are invited for the Supply of the Undermentioned grain to the Nagpur Central Jail for the year 1916.

Sealed Samples with the prices and conditions, percentage of refractions etc., clearly stated should be submitted to the Superintendent not later than 10 A. M. on the date mentioned below:—

| | Mds. | |
|---|---|---|
| Jawari | 6000 | 20th January 1916. |
| Linseed | 400 | 20th January 1916. |
| Jagni | 200 | 20th ……do…… |

C. H. Bensley,
Lieut: Col: I. M. S.,
Superintendent, Central Jail,
Nagpur.

N. N. 418

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible.

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

## WANTED

A COMPOUNDER FOR THE CENTRAL JAIL NAGPUR.

Pay according to grad. Free quarters Application together with testimonials to be sent to the undersigned.

C. H. Bensley,
Lieut:Col: I.M.S
Superintendent, Central Jail
Nagpur

N. N. 404

### सर्व बालरोगांवर वस्ताद.

## बालामृत वटिका.

एकच वेळ वापरण्याची शिफारस. खोटें ठरविणारांस शेकडों रुपये बक्षीस देण्याइतके आह्मी श्रीमंत नाहीं. परंतु साहेब, एकदाच खात्री करून पहा. २० गो. किं. ।- ट. ख. वेगळा. प्रत्येक शिशी सोबत इनामाचें १ टिकीट बक्षीस. निकाल १०००० बाटल्या खपतांच. बक्षीसें १००० रोख. खुलासा आजच मागवा.

सकळकळे सन्स
शहर आकोला.

## जाहिर नोटीस

सर्व शेट सावकार व्यापारी व कजबे मार्डी इजारा व मौजे पाहापळ इजारा प्रगणे मार्डी ता. वणी जि. यवतमाळ येथील सर्व कास्तकार लोक

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर रितीनें कळविण्यांत येते कीं, माझी स्वसंपादित इष्टेट खेरीज करून बाकी बरीचशी इष्टेट वडिलोपार्जित असून माझेच नांवानें आहे. व त्यांत एक द्वितियांश हिस्सा निळकंठ कृष्ण वैरेचा व एक द्वितियांश हिश्शांत आह्मी त्रिवर्गबंधू (नारायण राजेश्वर व दाजी राजेश्वर आणि मी स्वतः) हिस्सेदार आहात. व सर्व माझेतून यंदाचा चार वर्षांपासून अलग राहात आहेत. मात्र वडिलोपार्जीत सर्व इष्टेट समाईकींत आहे. सन १९११ सालांत त्यांच्यात व माझ्यांत घरगुती बरेच तंटे उपस्थित होऊं लागले. ह्मणून मी त्यांचे उदर निर्वाहा करितां कांहीं कांहीं इष्टेटीचा भाग त्यांना दिला. व पुढें कायदेशीर रितीनें सर्व इष्टेटीची वाटणी हिशाप्रा॥ करून देण्याचे ठरलें. वरीलप्रा॥ कांहीं इष्टेटीचा भाग त्यांना दिल्यानें दिवसें दिवस त्यांच्यात व माझ्यांत जास्तच द्वेष वाढत चालला. त्यामुळें त्यांनीं माझें बरेंच नुकसान केले. तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, आमची भाऊबंदाची कायदेशीर रितीनें वाटणी होई पावेतों माझे नांवानें असलेल्या इष्टेटीची माझे भाऊबंदापासून कोणी ही विक्री किंवा गहाण, अगर बक्षीस करून घेऊं नये. व त्याचप्रमाणें कजबे मार्डी व मौजे पाहापळ या इजारे गांवच्या आसामीनें फक्त माझे वाचून माझे मुलास अगर माझे वरील भाऊबंद यांस शेताचा वायदा देऊं नये. भाऊबंदाजवळ अगर मुलांजवळ वायदा दिल्यास कोणतीही आसामी माझे देण्यांतून कायदेशीर रितीनें मुक्त होणार नाहीं. आणि त्यांचेवर दिवाणी कोर्टांत दावा आणून शेत सारा वसूल केला जाईल. या नोटिशीचे व्यातिरिक्त जो कोणी कोणताही व्यापार माझे भाऊबंदाशी करील, त्यामुळें मी अगर माझे नांवानें असलेली इस्टेट जबाबदार नाहीं. कळावें. ही नोटिस दिली. ता. ११ माहे डिसेंबर सन १९१५ इसवी.

सही

माधव राजेश्वर देशपांडे राहणार
कजबे मार्डी ता. पो. वणी जि.
यवतमाळ द. खुद

नो. नं. ४१९

त्वरा करा. जंगी लूट अपूर्व लाभ

## जानेवारी अखेर खर्च माफ.

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

गुण न आल्यास पैसे परत.

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

पत्ता — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर ब्रम्हाणपूर

नो. नं. ४२०

वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८३७

## पुढें काय होणार ?

हा प्रश्न आतांच कशाला पाहिजे? सध्यां लढाईवर जाण्याला माणसें तयार करा, युद्धासाठीं फंड जमवा आणि मित्रराष्ट्रांना परमेश्वराजवळ यश चिंतीत रहा, असा उपदेश करणारे शेंकडा ९९ किंवहुना ९९ सुद्धां निघतील. आणि सध्यापुरत्या कर्तव्याचा विचार करतां त्यांचा हा उपदेश सर्वथा योग्य आहे. पण मनुष्य हा दूरदृष्टीचा प्राणी आहे. दूरदृष्टि नसलेला मनुष्य व्यवहारांत नादान ठरतो, त्याला वरचेवर ठेचा लागतात, आणि त्याचें नुकसान होतें. यासाठीं सध्याच्या कर्तव्याला दक्ष राहून भावी स्थिति ही कल्पनेनें ताडली पाहिजे. ह्मणून या विषयाकडे वळावें लागतें. विलायतेच्या मानानें आजच्या घटकेला हिंदुस्थान देश अधिक भाग्यवान् आहे. विलायतेंत ज्या घराण्यांतले सगळे कर्ते पुरुष लढाईवर गेले आहेत व बायकामुलेंच घरीं राहिलीं आहेत अशीं असंख्य कुटुंबें आहेत. त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी सरकारनें आपल्यावर घेतली आहे. हिंदुस्थानला ही प्रस्तुतच्या युद्धानें जोराचा आघात दिला आहे, पण तो केवळ महागाईपुरता आहे. इंग्लंडांत पुरुषांचीं कचेऱ्यांतलीं व कारखान्यांतलीं कामें करण्यासाठीं लक्षावधि स्त्रियांना त्या कामांचें शिक्षण देण्याची जरूरी पडली आहे. हिंदुस्थानांतल्या स्त्रिया तुळशीला प्रदक्षिणा घालणें, कापसाच्या वाती करणें, चोळीवर कशीदा काढणें किंवा यासारखीं दुसरीं कृत्यें करण्यांत पूर्वीच्या सारख्याच निमग्न आहेत. पण ही स्थिति अशीच पुढें टिकेल काय? कां दिवसेंदिवस महागाईमुळें उपासमार होऊं लागून वरच्यापेक्षां अधिक उपयुक्त कामाकडे त्यांना वळावें लागणार आहे? या प्रश्नाचें उत्तर हिंदुस्थानच्या भावी सांपत्तिक स्थितीच्या अनुरोधानेंच देतां येईल. या भावी स्थितीचें चित्र जें एका आंग्लो-इंडियन पत्रानें काढलेलें आहे तें कांहीं उमेद आणणारें नाहीं. तें पत्र ह्मणतें कीं फार दूर नको, यंदाच्याच बजेटांत उत्पन्नाच्या बाबतींत मोठी तूट येईल व येत्या एप्रिलच्या बजेटाचे वेळीं त्या तुटींत आणखी भर पुढें पडण्याची भीती वाटत आहे. अशा स्थितींत नवीन कराचा चट्टा बसल्याशिवाय रहावयाचा नाहीं हें खास. हिंदुस्थानासारख्या गरीब देशाला हा चट्टा हलका बसला तरी तो त्याचा प्राण कासावीस करील. ही आपत्ति अंशतः कमी करण्याचा एकच उपाय दिसतो. तो हा कीं सरकारानें पब्लिक वर्क्स खात्यावरचा आपला खर्च कमी करावा. हा खर्च कांहीं सामान्य नाहीं. कोटीनें मोजण्याइतका आहे. तूर्त आह्मांला रेल्वे, सडका, टोलेजंग इमारती, सार्वजनिक बगीचे नसले तरी चालतील. पूर्वींच्या काळीं कोठें हीं सुखाचें साधनें होतीं? त्या काळीं लोकांचा जीवित क्रमाचा काळ काय दुःखांत गेला? तेव्हां सरकारनें तर्त हा खर्च होईल तितका कमी करावा सूचना अगदीं योग्य आहे. त्या बरोबर लोकांना ही एक सूचना आह्मांला करावीशी वाटते ती ही कीं त्यांनीं अल्पकाल पर्यंत आपण ऋषिकाळांत आहों अशी कल्पना करावी, व विसाव्या शतकांतल्या चैनीच्या संबधी विसरून जावें. चहापान, नाटकें, कपड्यांच्या फ्याशन्स, रेल्वेचे चैनीखातर प्रवास, इ० निष्कारण खर्चाच्या बाबींना अजीबात फाटा द्यावा. आज कित्येक वर्षें अंगवळणीं पडलेल्या या गोष्टींचा त्याग करणें प्रथम जड जाईल. पण सध्याच्या प्रसंगीं करणें जरूर आहे. साध्या राहणीची संवय एकदा लागली ह्मणजे त्या राहणींतच आनंद वाटूं लागेल. विलायतेंत असें काटकसरीनें राहण्याचें व्रत पुष्कळांनीं घेतलें आहे. विलासप्रिय अशा विलायतच्या स्त्री पुरुषांना जी गोष्ट साधते ती आह्मां विलासपराङ्मुख आणि तापसी वृत्तीनें राहणाऱ्या ऋषींच्या वंशजांना साधणार नाहीं असें कोण ह्मणतो? जर कोणी असेल तर त्यानें पुढचा जन्म फुलपाखराचा घ्यावा.

## महायुद्धाची प्रगति.

आज इतके दिवस ज्या अशुभ स्थितीचीं दुःस्वप्नें पडत होतीं, ती स्थिति सर्वियन लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवाला आली. त्यांचा सगळा देश शत्रूंनीं आक्रमण केला. मोनास्तिर- त्यांच्या आशेचा शेवटचा तंतूही शत्रूच्या हातीं जाऊन आस्ट्रियन निशाण त्याच्या तटावर फडकूं लागलें. मोनास्तिरचें सर्वियन सैन्य आतां मांटेनिग्रो व अल्बानियाकडे वळलें. त्यांनीं मोनास्तिर येथें टिकाव धरणें अशक्य समजून राजीखुषीनें त्याचा त्याग करून जय शत्रूंना आपला पाठलाग करणें कठीण जाईल अशा मांटेनिग्रोच्या पहाडी मुलखाचा आश्रय केला. तेथें त्यांना एकच अडचण—अन्न सामुग्रीची—वाटेल. कारण त्या मुलखांत धान्य चांगलें पिकत नाहीं. एरवीं मांटेनिग्रोचे लोक पाहुणचार करणारे आहेत. आल्बानियाचें सर्वियाशीं वर्तन कसें राहील तें अद्याप संदिग्धच आहे. पण त्यांना किनाऱ्यावरील इंग्रज-फ्रेंच आरमाराची भीती आहे, आणि त्यांच्याशीं लढण्याला ते दुर्बळ आहेत. ह्मणून या नव्या आश्रयाच्या स्थानीं सर्वियन लोक सुरक्षित आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

बल्गेरिया लढाईला कंटाळलेला आहे. जेथें तेथें जर्मनीचा सामूपणा त्याला कां कंटाळा आणणार नाहीं ? आणि आतां पुढें लढून त्याला काय अधिक मिळवायाचें आहे ? त्याला मासिडोनिया प्रांत मिळवायाचा होता तो मिळाल्यासारखाच आहे. गेल्या दोन महिन्यांत त्याच्या सैन्याचा एक तृतीयांश भाग नष्ट झाला. लढाईच्या तोंडाशीं त्याच्या सैन्याला दिलें होतें. आतां आपल्या शिपायांना विसावा देण्याची इच्छा होणें हें त्याच्या दृष्टीनें स्वाभाविक आहे. शिवाय कडक हिंवाळ्याचें आगमनही दर

नाहीं. तेव्हां यापुढें युद्धवार्तेत बल्गेरियाचें नांव बहुधा ऐकूं यावयाचें नाहीं.

इटली सर्वियाला मदत करील ही आशा फारशी नव्हतीच. तेव्हां ती नष्ट झाली ह्मणून निराशा टणार नाहीं. पण वरातीमागून घोडे या ह्मणी प्रमाणें सर्विया स्वतंत्र राखण्यास आपण मदत करूं अशा त्याच्या वल्गना चालल्याच आहेत! ही मदत ह्मणजे प्रत्यक्ष सैन्याची मदत नाहींच तर अन्नसामुग्री व दारूगोळा यांचा पुरवठा! इतकें सांगितल्यानंतर इटालियन फौज सालोनिकाकडे पाठविण्यांत येईल अशी आशा करावयाला नको. इंग्रज व फ्रेंच यांना इच्छा असून ही कांहीं अडचणीमुळें सर्वियाला योग्यवेळीं मदत करतां आली नाहीं हें सर्वियाचें दुर्दैव ह्मटलें पाहिजे. इकडे राशियन फौजेनें ड्यानूब नदी ओलांडल्याची बातमी आहे. पण ती कितपत खरी आहे कोण जाणे! राशियन येतात असें पाहून जर्मनीनें आपलें सन्य बाल्कन मधून हलविलें अशी बातमी आहे, पण ती विश्वसनीय ह्मणतां येत नाहीं.

---

राशियाच्या पश्चिमेकडची स्थिति आशाकारक आहे. हिंडेनबर्गच्या सैन्याचें पाऊल रिगापासून मागें हटलें आहे तें तसेंच आहे. सप्तेंबर मध्येंच रिगाला पोहचूं अशी जर्मनीला उमेद होती ती नोवेंबरें अखेर ही पुरी झाली नाहीं. याचें कारण राशियन फौजेची नवी तरतरी होय. लेंबर्ग, वार्सा, व पोलांड हातून सुटलीं तेव्हांचें निराशेचें पटल राशियानें आतां दूर झुगारून दिलें आहे आणि आतां हिंवाळा तर राशियन फौजेला अनुकूलतेचा काळ आहे

---

इटलीचा गॉझ घेण्याचा हेतु अद्याप पूर्णपणें सफळ झाला नाहीं. तें घेण्याचा इटलीचा जेवढा दृढ निश्चय आहे तेवढाच तें न देण्याचा आस्ट्रियाचा आहे. कारण तो किल्ला महत्त्वाचा आहे.

---

पश्चिमेकडील रणक्षेत्रांत मधून मधून तोफांचा गडगडाट ऐकूं येतो व वर आकाशयानांची धावपळ दिसते पण एकंदरींत सामसूमच आहे अशा वेळीं लोकांच्या करमणुकीसाठीं जर्मन लोक तहाच्या कंड्या उठवीत असतात. तशा आतां ही उठल्या आहेत, आणि भोळे बिचारे पोपमहाराज त्यांना आपल्या आशिर्वादानें खऱ्याचें स्वरूप देऊं पाहत आहेत! या बाबतींत रूटरचा बातमीदार ही फसूं पाहत आहे न्यूयार्कमधल्या जर्मनीच्या हुंडीच्या भावावरून जर्मनीची पत राहिलेली नाहीं, तेव्हां जर्मनी आतां तह करण्यास कबूल होईल असें त्याला वाटत आहे. अजून त्यानें जर्मनीच्या युक्त्या ओळखल्या नाहींत असें दिसतें. जोंपर्यंत जर्मनीचा तोरा अजीबात नष्ट झाला नाहीं तोपर्यंत तरी दोस्त राष्ट्रें तहाची गोष्ट ऐकणार नाहींत व कां ऐकावी? सापाचें डोकें ठेंचलें पाहिजे, शेपटीवर पाय देणें अनर्थावह असतें येवढी गोष्ट दोस्त राष्ट्रांना समजत नाहीं असें कां रूटरला वाटतें?

---

## युद्धाविषयीं हिंदी लोकांचा उत्साह.

मनुष्याचे अंगीं गुण आहेत, पण ते प्रकट करण्याची संधी त्याला दिली नाहीं तर 'जीर्णमंगे सुभाषितम्' या ह्मणीप्रमाणें त्या गुणांची माती होते. हिंदी शिपाई लढाईंत युरोपियन सोल्जरांच्या बरोबरीनें शौर्य दाखवितील ही गोष्ट दोन वर्षांपूर्वीं पुष्कळ लष्करी अंमलदारांना सुद्धां खरी वाटत नसे. पण आज त्यांना आपलें मत पाल्टावें लागलें आहे कीं नाहीं? असें धडधडीत उदाहरण दिसत असतां व लढाईसाठीं सैन्यांत भरती करण्यास शिपाई मिळण्याची विलायतेंत पंचाईत पडली असतां जे कित्येक उत्साही हिंदी तरुण लढाईवर जाण्यास उत्सुक आहेत त्यांच्या उत्सुकतेला सरकार कां दाबून टाकीत आहे तें कळत नाहीं. मद्रासच्या इंडियन पेट्रियट पत्रांत अशीं कित्येक विचित्र उदाहरणें दिलीं आहेत कीं तीं वाचून सरकारचें धोरण काय आहे तेंच कळत नाहीं. एका सुप्रसिद्ध व इंग्रज सरकारची सेवा अव्वलपासून ज्यानें केली आहे अशा घराण्यांतला, विलायतेंत लष्करी शिक्षण घेतलेला, अनेक युरोपियन भाषांचें ज्ञान संपादलेला, जर्मनी, पोलांड व तुर्कस्थान या देशांत राहिलेला, व बाल्कन मध्यें व्हालेंटियरचें काम केलेला अशा एका तरुण पारशी गृहस्थानें सरकारला लढाईवर जाण्याची आपली इच्छा कळविली असतां सरकारनें गरज लागेल तेव्हां कळवूं असें उत्तर दिलें. पुढें त्यानें लष्करी खात्याकडे अर्ज केला. लष्करी अधिकाऱ्यांनीं त्याची शिफारस करून त्याचा अर्ज सिमल्यास पाठविला. त्याला वर्ष झालें, तरी अद्याप उत्तर नाहीं! दुसऱ्या एका हिंदी गृहस्थानें असाच अर्ज कलेक्टरामार्फत पाठविला. याला तारायंत्राचें काम व निशाणबाजी येत असतां त्याला उत्तर आलें कीं तुमचा देशाभिमान स्वतःच्या सेवेच्या रूपानें नको आहे, त्याबद्दल तुह्मी युद्धसाह्य फंडाला रकम द्या ह्मणजे पुरे आहे! त्यानें मुंबई सरकारकडे व व्हाइसराय साहेबाकडे अर्ज केला असतां उत्तर मिळालें कीं ज्यांना लष्करी शिक्षण मिळालें आहे अशांनाच लढाईवर पाठविण्यांत येतें. युरोपियन टेरिटोरियल फौजेंत भरती होणारांना हिंदुस्थानांत पाठवून लष्करी शिक्षण देतां येतें, तर मग तसेंच शिक्षण हिंदी लोकांना येथच्या येथें देऊन तयार करण्यास कोणती अडचण आहे? मनुष्याच्या राजनिष्ठाप्रेरित उत्साहापेक्षां सरकारला पैशाची किंमत अधिक कां वाटावी? विलायतेंत असा प्रकार नाहीं. हिंदुस्थानची हवाच कांहीं निराळी दिसते.

---

### अजब!

सरकारी आंकडेपत्रकावरून असें कळतें कीं गेल्या एप्रिलपासून सप्टेंबरपर्यंत जपानाहून ४१६००० रुपयांचे, इटलीहून २३९००० रुपयांचे, संयुक्तराज्य (विलायत) हून ८४००० रु. चे, फ्रान्सहून १६००० रु. चे, जर्मनीहून २००० रु. चे, व इतर देशांहून ६००० रु. चे असे एकंदर ८३९००० रुपयांचे नुसते बटन हिंदुस्थानांत आले! हिंदुस्थानांत कपड्यांची फ्याशन कशी जोरानें फैलावत आहे याला कांहीं सोयसुमार आहे? यांतला बराचसा माल इकडे कां तयार होऊं नये? आह्मी हिंदी लोकांनीं नुसती बडबड व काव्यरचना करण्याचाच मक्ता घेतला आहे काय?

---

## एक नवा डिप्रेस्ड क्लास.

मागासलेल्या जातीच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना पांढरपेशावर्गाच्या बरोबरीला आणून सोडण्यासाठीं चोहीकडे स्तुत्य आणि जोराची चळवळ सुरू आहे आणि तिला उत्कृष्ट यश लवकर प्राप्त व्हावें असें आह्मी चिंतितों. पण त्या बरोबरच दुसरी एक अनपेक्षित भीती खुद्द पांढरपेशा जातीच्या मुलांच्या शिक्षणासंबंधानें अलीकडे उत्पन्न झाली आहे, तिच्याकडे ही आमच्या समाजाग्रणींचें व सरकारचें लक्ष जावें असें इच्छितों. मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला गेल्या दोन चार वर्षांत गंभीर स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे. शिक्षणाची गोडी आमच्या लोकांना ज्या मानानें लागूं लागली आहे, किंवा त्याची अवश्यकता वाटूं लागल्यामुळें शाळेंत भरती होऊं इच्छिणाऱ्या मुलांची संख्या ज्या मानानें ज्यास्त ज्यास्त वाढत आहे, त्या मानानें शाळांच्या संख्येंत वाढ न झाल्यामुळें प्रत्येक प्रांतांत शाळेंत मज्जाव झाल्यामुळें रिकामे बसावें लागलेल्या मुलांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. देशाच्या प्रगतीला हें आतिशय बाधक आहे येवढेंच नाहीं, तर विघातक आहे हें सांगावयास नकोच. कारण, हल्लींची मुलें हाच हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षाचे मुख्य आधारस्तंभ होत. हे आधारस्तंभच जर त्यांचा कांहीं दोष नसतां कच्चे राहूं लागले, तर त्या उत्कर्षाची इमारत कच्या पायावर उभी राहणार. शिक्षणाच्या अभावीं इतक्या मुलांची बुद्धिची तरतरी नष्ट होणार; भलभलत्या समजुती तीं आतांपासून उराशीं बाळगून बसणार; वाईट नादाला लागन बिघडणार; अशा एक कां दोन शेंकडों मार्गांनीं हिंदुस्थानच्या अधोगतीचा मार्ग खुला होण्याचा संभव आहे. इकडे कांग्रेस, सोशल कान्फरन्स, व इतर परिषदा देशाच्या उन्नतीसाठीं आज पांच पंचवीस वर्षें धडपड करून जें काय थोडें बहुत यश संपादीत असतील तें अधोगतीचें हें नवें द्वार खुलें झाल्यामुळें सगळें नष्ट होणार. कोणत्या स्वदेशाभिमानी पुरुषाच्यानें हें संकट मुकाट्यानें पाहवेल? प्रजेच्या कल्याणाचें अहर्निश चिंतन करणारें कोणतें सरकार हें अधोगतीचें द्वार एकदम बंद करण्याचा उपाय तत्काळ केल्याशिवाय राहील? पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं लोकांच्या पुढाऱ्यांच्या भाषणांतून व वर्तमानपत्रांच्या लेखांतून या प्रश्नाची चर्चा जोरानें चालली असतां ही सरकार अद्याप या प्रश्नासंबंधानें जागृत होत नाहीं. उलट शिक्षणाच्या सोयी वाढविण्यापेक्षां आहे त्याच शिक्षणसंस्थांतून विद्यार्थ्यांसंबंधानें कडक निर्बंध होत आहेत. अमक्या वयाच्या वरच्या किंवा खालच्या मुलाला शाळेंत घ्यावयाचें नाहीं, अमक्याच तऱ्हेनें मुलगा शिकला किंवा अमक्या अमक्या परीक्षा तो नेमानें पास होत गेला तरच त्याला शाळेंत राहूं द्यावयाचें, खाजगी शाळांना अमक्या प्रकारच्या पक्क्या इमारती बांधण्याची ऐपत असली तरच त्यांना सरकारी मदत मिळावयाची, नाहीं तर नाहीं. अशा प्रकारचे निर्बंध किती ही सद्धेतूनें घातलेले असले (आणि ते सद्धेतुपूर्वकच घालण्यांत येतात या बद्दल आह्मांस बिल्कुल शंका नाहीं.) तरी मुलांना द्यावयाचें झाले तर उत्तम प्रकारचें शिक्षण द्यावयाचें, नाहींपेक्षां त्यांना मुळींच शिक्षण नसलें आणि ते भटक्या मारीत हिंडले तरी चालेल, अशा प्रकारचा हट्ट देशाच्या उन्नतीला घातकच होईल अशी भीती पुष्कळांना वाटत आहे. या निर्बंधाच्या बाबतींत आमचे प्रांतिक सरकार इतर प्रांतांतल्या सरकारापेक्षां अधिक सावधगिरी ठेवीत आहे. आमच्या प्रांतांतल्या शाळांतून मुलांवर जेवढे निर्बंध आहेत त्याच्या निंमेनेंही मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे शिक्षणांत पुढें गेलेल्या ठिकाणीं दिसून येत नाहींत. अशी स्थिति कां असावी व या निर्बंधामुळें शाळेच्या शिक्षणास मुकाव्या लागलेल्या मुलांच्या संख्येकडे व त्यापासून पुढें मागें घडणाऱ्या दुष्परिणामाकडे सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष कां जाऊं नये हा एक मोठा गूढ प्रश्न आहे.

कित्येक लोक युनिव्हर्सिट्यांतून परीक्षेंत नापास होणारांची वाढती संख्या आणि लोकांत शिक्षणप्रसार अमर्यादित होऊं नये अशी कित्येक अधिकाऱ्यांची काल्पनिक इच्छा यांची सांगड घालूं पाहतात. आह्मी हा त्यांचा प्रयत्न अगदीं वेड्यासारखा समजतों. शिक्षणामृताची गोडी ज्यांना कळली आहे असे अधिकारी हिंदुस्थानांत शिक्षणप्रसार अमर्यादित होऊं नये असें इच्छित असतील ही गोष्टच आह्मांला खरी वाटत नाहीं. आमच्यामतें ही गोष्ट संभवनीयच नाहीं. असे अधिकारी असतलि ही कल्पनाच आमच्यामतें चुकीची आहे. तसें असतें तर अलीकडे हिंदुस्थान सरकारनें गेल्या पांच सात वर्षांत ज्या कोट्यावधि रुपयांच्या देणग्या शिक्षणासाठीं ह्मणून दिल्या आहेत त्या कधीं दिल्या नसत्या. आमच्या मतें लोकमत व सरकारी अधिकाऱ्यांचें मत यामध्यें जें अंतर पडलें आहे तें अगदीं निराळ्या कारणामुळें पडलें आहे. हिंदुस्थानांत शिक्षणप्रसार व्हावयाला नको असें नाहीं, तर जो व्हावयाचा तो उत्तम प्रकारच्या पाश्चात्य पद्धतीचा हवा असें सरकारी अधिकाऱ्यांना वाटत आहे. ह्मणूनच नवीन शाळा उघडण्यावर अधिक खर्च करण्यापेक्षां अधिक पगाराचे युरोपियन हेडमास्तर, व इन्स्पेक्टर, उत्तम श्रृंगारलेल्या आणि हवाशीर इमारती, क्रीडास्थानें, वगैरे गोष्टींकडे सरकार अधिक खर्च करतें. आमच्या लोकांचें ध्येय निराळें आहे, आणि तें ऋषिकोटापासून आमच्या लोकांच्या हाडीमासीं खिळलेलें आहे. तें हें कीं शिक्षणानें मन सुसंकृत व्हावें, साध्या—अगदीं गरीबीच्या राहणीनें राहावें, आणि यथाशक्ति परोपकार व देशसेवा करावी. सरकारी अधिकाऱ्यांचें ध्येय केवळ द्रव्य साध्य आहे. आमच्या लोकांचें ध्येय तसें नाहीं. आणि हिंदुस्थानच्या दारिद्र्याकडे नजर

दिली ह्मणजे कोणतें ध्येय हिंदुस्थानाला अधिक श्रेयस्कर आहे हें सांगावयास नकोच.

पण ध्येय भिन्नत्वामुळें आज प्राप्त झालेली दुःस्थिति अशीच राहूं देणें इष्ट आहे काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हल्लींची स्थिति थोडक्यांत पटेल अशा रीतीनें सांगावयाची ह्मणजे आपल्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट असलेलें ध्येय साधण्याच्या प्रबळ इच्छेमुळें सरकारी अधिकारी एक नवा डिप्रेस्ड वर्ग समाजांत निर्माण करून ठेवीत आहेत. शाळेंतले कडक निर्बंध, परीक्षेत नापास होणारांची वाढती संख्या, परदेशी भाषेच्या द्वारें दिलें जाणारें शिक्षण, अभ्यास क्रमांत व्यवहाराला अगदीं निरुपयोगी अशा विषयांची गर्दी, शिक्षणाची महर्घता, इ. अनेक कारणांमुळें गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्यांची बुद्धि, शरीरसामर्थ्य, उमेद, उत्साह, वगैरे अमोलिक गुणांचा ऱ्हास होत चालला आहे. ज्यांना आपण डिप्रेस्ड क्लास ह्मणतों त्यांच्याविषयीं आजपर्यंत समाजानें दुसरें काय केलें होतें? वर सांगितलेल्या गुणांचा ऱ्हास होऊं दिला व त्यामुळें त्या गुणांचा उपयोग जो एरव्हीं देशकार्याला झाला असता त्याला देश मुकला हेंच कीं नाहीं? समाजाच्या हातून अज्ञानामुळें ह्मणा किंवा भ्रममूलक समजुतीमुळें जें अन्यायाचरण आजपर्यंत घडलें, त्या पासून झालेल्या अनर्थानें आतां त्या समाजाला पश्चात्ताप होऊन तो डिप्रेस्ड क्लासाच्या सुधारणेला लागला आहे. अशा वेळीं सरकार हा नवा डिप्रेस्ड क्लास आणि तोही फार मोठ्या प्रमाणावर निर्माण करून त्या चुकीची पुनरावृत्ति करणार काय? आमचें सुधारलेलें सरकार असें कधीं करणार नाहीं अशी आमची पूर्ण खात्री आहे.

## सरकारी नोकरींतले हिंदी लोक.

या महिन्याच्या कलकत्त्याच्या मॉडर्न रिव्ह्यूच्या अंकांत सरकारच्या प्रत्येक खात्यांत वरच्या जागांवर हिंदी लोक किती आहेत व युरोपियन किती आहेत याची तुलना करून दाखविणारें कोष्टक दिलें आहे. या कोष्टकांतले आंकडे पाहिले ह्मणजे हिंदी माणसाची नाउमेद होते. विशेषतः सध्याच्या काळांत जेव्हां युरोपच्या समरांगणांत हिंदी शिपाई व युरोपियन सोल्जर खांद्याशीं खांदा लावून ब्रिटिश साम्राज्याची इभ्रत कायम राखण्याकरितां बरोबरीनें लढत आहेत व या त्यांच्या राजनिष्ठेच्या प्रशंसनेनें सगळें जग दुमदुमून जात आहे अशावेळीं हे आकडे पाहिले ह्मणजे हिंदी माणसाच्या मनाची कशी द्विधा स्थिति होत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. पब्लिक सर्विस कमिशननें या कोष्टकांतल्या विषमतेवर हरताळ फासली आहे कीं तिला चिरस्थायित्व दिलें आहे हें कळण्यास तूर्त मार्ग नाहीं. कसें ही असलें तरी पब्लिक सर्विस कमिशन लढाई सुरू होण्याच्या आधीं बसलें ही गोष्ट वाईट झाली, तें लढाई संपल्यानंतर बसावयास पाहिजे होतें असें पुष्कळांना वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्या कमिशननें जर ही विषमता काढून टाकली असली तर या कोष्टकाला बिनतोड उत्तर दिल्यासारखें होईल. तसें नसलें तर त्या कमिशनचा रिपोर्ट सूर्यप्रकाशाचें दर्शन न करो असें ह्मणण्याची पाळी येईल.

## कांग्रेस आणि सरकारी नोकर.

सरकारी नोकरांनीं कांग्रेसला जाण्याला हरकत आहे काय? अशा अर्थाचा एक प्रश्न ना. मि. पटेल यांनीं मुंबईच्या कायदेकौंसिलांत गेल्या आठवड्यांत विचारला, आणि त्याला उत्तर देतांना मुंबई सरकारनें १८९० सालीं लॉर्ड ल्यान्स डौन यांच्या कारकीर्दींत झालेल्या स्टांडिंग ऑर्डरकडे बोट दाखविलें. वास्तविकरीत्या हा प्रश्न निराळ्या रीतीनें व खुबीनें विचारावयास पाहिजे होता. सरकारी नौकरांनीं कांग्रेसला जाऊं नये असें १८९० सालीं सरकारचें मत होतें आणि त्याला तशीं कारणें ही त्यावेळीं होतीं. त्यावेळीं सरकार कांग्रेसकडे निराळ्या दृष्टीनें पाहत असे. कांग्रेस ही संस्था राज्यकारभारांतलीं व्यंगें बाहेर काढणारी व सरकारला विरोध करणारी आहे अशी त्यावेळीं सरकारची समजूत असे. पण गेल्या दहा वर्षांत ती समजूत पालटली आहे, आणि मद्रासचे गव्हर्नर तेथील कांग्रेसला, व मुंबईचे गव्हर्नर पुण्याच्या प्रांतिक सभेला गेले होते, इतकेंच नाहीं तर त्या सभेंत त्यांनीं भाषण ही केलें यावरून सरकारच्या कांग्रेस विषयींच्या मतांत फरक पडला आहे हें उघड आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं तर स्टेटसेक्रेटरी असतांना नेमस्तांना आपलेसें करून घ्या असा सरकारी अधिकाऱ्यांना उपदेश ही केला होता. त्यांचा कटाक्ष त्यावेळीं कांग्रेसवर नव्हता, कायदेशीर उपायांनीं आपली राजकीय उन्नति घडवूं पाहण्यांत सरकारशीं विरोध होत नाहीं, तर बेकायदेशीर पद्धतीचा अंगीकार करणारे ते मात्र सरकारचे विरोधी होत, असें त्यांनीं स्पष्ट ह्मटलें होतें. पण सुरत कांग्रेसपासून अशा लोकांचा कांग्रेसशीं विभक्तपणा झालेला आहे. तेव्हां अर्थातच् कांग्रेस विषयीं जर सरकारचें मत पालटलें आहे तर त्या कांग्रेसला सरकारी नौकरांनीं जाऊं नये असा निर्बंध घालणारा हुकुम हा सरकारनें रद्द करावयास पाहिजे अशा प्रकारें ना. मि. पटेल यांनीं सरकारला कळवावयास पाहिजे होतें व तशा झोंकानें आपला प्रश्न विचारावयास पाहिजे होता. पण असें झालें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. यंदाच्या कांग्रेसच्या अध्यक्षांनीं तरी आपल्या भाषणांत या मुद्यावर जोर देऊन सदर हुकुम रद्द करण्याविषयीं विनंति केली असतां ती सरकारकडून अमान्य होण्याचा फारसा संभव दिसत नाहीं.

## खरें का?

मुंबईत नवीनच निघूं लागलेल्या 'यंग इंडिया' पत्रानें मुंबईस कांग्रेस भरण्याच्या सुमाराला साखरेचा एक गोड घास कांग्रेसवाल्यांच्या तोंडांत घालण्याची संधी साधली आहे. आपल्या नव्या पत्राची लवकर प्रसिद्धी व्हावी येवढाच हेतु या प्रयत्नाच्या मुळाशीं असेल अशी आह्मास तरी जबरदस्त शंका येते. न्यायखातें आणि अंमलबजावणी खातें हीं विभक्त करण्याची सूचना पाव शतकावर दिवस झाले, हिंदुस्थान सरकारच्या रेकार्ड आफिसांत धूळ खात पडलेली आहे. तिच्या भाग्योदयाचा काळ लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दींत येणें यांत मोठेसें आश्चर्य नाहीं. ज्या प्रश्नाविषयीं लॉर्ड डफरिन सारख्या व्हाइसरायांनीं किंवा सर हार्वे अॅडमसन सारख्या होममेंबरांनीं अनुकूळ अभिप्राय दिलेल्या प्रश्नाचा लॉर्ड हार्डिंज सारख्या सहानुभूति प्रेरित व्हाइसराय साहेबांनीं पुरस्कार केला असला तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. पण आश्चर्य वाटण्यास ह्मणा, किंवा या बातमीच्या सत्यतेविषयीं शंका घेण्यास ह्मणा, कारण आहे तें निराळें आहे. वरील सुधारणा अंमलांत आणणें हें राज्यकारभाराचा खर्च वाढविल्यावांचून होणार नाहीं. असें त्यावेळच्या पुष्कळशा प्रांतिक सरकारचें व सरकारी अधिकाऱ्यांचें मत होतें, आणि जरी सर फेरोजशहा मेथा व मनमोहन बोस यांनीं आंकडे मोडून हें मत चुकीचें आहे असें दाखविलें तरी सरकारचा एकदा झालेला ग्रह त्यामुळें दूर झाला नाहीं. असा खरा प्रकार असतां खर्चाच्या सबबीवर मागें टाकलेला प्रश्न लार्ड हार्डिंज सारखे दूरदृष्टि व्हाईसराय सध्या युद्धामुळें सरकारची खर्चासंबंधानें चाललेली ओढाताण दिसत असतां व कोणत्याही मतभेदाच्या प्रश्नाचा विचार करण्यास सध्याचा काळ अनुकूळ नाहीं अशी परिस्थिति प्रत्यक्ष पाहत असतां अशावेळीं पुढें आणतील हें संभवनीय नाहीं. या कारणामुळें आह्मांला तर वाटतें कीं आपल्या पत्राची प्रसिद्धी आणि ती ही जाहिरातीचा खर्च न करतां करण्याची यंग इंडिया कर्त्यांची ही एक युक्ति आहे. पण या युक्तीनें विचारी लोक फसणार नाहींत ही गोष्ट त्या पत्रकर्त्यास कळूं नये हें आश्चर्य आहे. विचारी लोकांकरितां आपलें पत्र नाहीं, भावड्या लोकांकरितांच आहे असें त्या पत्राचे संपादकांनीं जाहिर केलें तर मात्र आह्मी निरुत्तर होऊन स्वस्थ बसूं. एरवीं येवढी मोठी गोळी आमच्यानें गिळवत नाहीं.

## लुटारूपणाचा धंदा.

बळेंच चिखलांत दगड टाकून अंगावर चिखल उडवून घेणारास कोण शहाणा ह्मणेल? तें खोडसाळपणाचेंच लक्षण आहे. पण असा खोडसाळपणा कलकत्याच्या स्टेट्समन पत्राच्या अंगीं इतका जडला आहे कीं मधून मधून तो केल्यावांचून त्याला चैनच पडत नाहीं नुकतेंच बंगाल्यांत दरोड्यांची संख्या वाढत आहे या गोष्टीस अनुलक्षून त्या पत्रानें असें लिहिलें आहे कीं दरोडे घालणें किंवा लुटारूपणा करणें हा बंगालच्या व्यावसायां पैकीं एक आहे. बंगालच्या लोकांना अशा उद्गारामुळें कां चीड येऊं नये? शहाणे बंगाली लोक या वात्रटपणानें आपल्या मनाची शांतता ढळूं न देतां अशा पत्राचा तिरस्कार करतील. त्याहून अधिक उतावळे असतील ते सभा भरवून किंवा लेख लिहून या उद्गारांचा निषेध करतील; आणि स्टेट्समन सारखेच वात्रट पत्रकर्ते विलायतेंतल्या गुन्ह्यांशीं इकडच्या गुन्ह्यांची तुलना करून स्टेट्समनशीं वादही घालीत बसतील. पण सध्याच्या क्षुब्ध परिस्थितींत देशांत शांतता ठेवण्याची सर्व पत्रकर्त्यांवर जी जबाबदारी आहे तिच्यांतून सरकारनें स्टेट्समनची मुक्तता केली आहे असें समजावयाचें कीं सरकार या वात्रट पोराचें कान धरून त्याला सूर्याचीं पिलें दाखवून त्याला ताब्यावर आणण्याचा प्रयत्न करणार आहे हें कळावयास पाहिजे.

## मॉस्लेम लीग.

मॉस्लेम लीगची बैठक यंदा मुंबईस भरवावी किंवा नाहीं याबद्दल आज कित्येक दिवस वर्तमानपत्रांतून निष्कारण वाद चालला होता. त्याचा समाधानकारक निकाल मुंबईच्या ना. गव्हर्नर साहेबांच्या मध्यस्थीनें लागलेला पाहून आह्मांस खरोखर फार संतोष वाटतो. वादाचें मूळ अगदीं क्षुद्र होतें. यंदा लढाईमुळें सरकारचें चित्त त्रस्त झालें आहे अशावेळीं कोणतीही राजकारण विषयक सभा भरविणें किंवा ठराव पास करणें कित्येकांना पसंत नव्हतें यासाठीं लीगची सभाच अजीबात बंद ठेवावी असें त्यांचें ह्मणणें होतें. वादग्रस्त राजकीय विषयांची चर्चा किंवा सरकारच्या कृत्यांवर टीका तुह्मी करूं नका, पण राजनिष्ठा व्यक्त करणारा ठराव किंवा लार्ड हार्डिंज साहेबांची मुदत वाढविण्याविषयीं विनंति करण्यास कोणती हरकत आहे? असें दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें होतें. वस्तुतः हे ठराव निरुपद्रवी आहेत इतकेंच नाहीं तर सरकारपक्षाला बळकटी देणारे आहेत येवढें न समजण्याइतका खुळा पहिला पक्ष नाहीं. पण आंतलें मर्म हें होतें कीं लीगची सभा झाली तर कांहीं थोडे तरी मुसलमान पुढारी त्याचवेळीं मुंबई येथें भरणाऱ्या कांग्रेसला जातील व तिच्याशीं संबंध ठेवतील, आपल्या लीगचा सोवळेपणा मग राहणार नाहीं, अशी भीती जरी त्यांनीं उघड बोलून दाखविली नाहीं, तरी कित्येकांच्या अंतर्यामीं ती होती. ह्मणून लीग न भरविण्याविषयीं ते आग्रह धरून बसले होते. वस्तुतः कांग्रेसला जाणें किंवा तिच्याशीं संबंध ठेवणें या गोष्टी ना० व्हाइसराय ना. मद्रासचे गव्हर्नर किंवा दुसरे सरकारी अधिकारी यांनीं कोणत्याही प्रकारें अप्रिय होण्यासारख्या नाहींत तर लीग मधल्या स्वतंत्र धंद्याच्या माणसांना त्यांचा येवढा बाऊ कां वाटावा तें कळत नाहीं. कदाचित् सर सय्यद अहमदाची विशेष दाट छाया या पुढाऱ्यांवर पडली असावी. असो. शेवटीं मुंबईचे ना. गव्हर्नर साहेबांस या बाबतात सल्ला विचारण्यांत आला. त्यावरून त्यांनीं पुढील तीन गोष्टी दोन्ही पक्षांच्या विचारानें ठरवून समेट घडवून आणिला, त्या तीन गोष्टी या—१ मुंबईस सभा भरवावी व राजनिष्ठेचा ठराव करावा, २ लीगनें वाटल्यास एक कमीटी नेमून इतर राजकारणी संस्थाशीं मुसलमानांचे हितास जपून योग्य ती योजना ठरवावी, व त्या कमिटीनें पुढचे वर्षीं आपला रिपोर्ट लीगला सादर करावा; आणि ३ लॉर्ड हार्डिंज साहेबांची मुदत वाढविण्याविषयीं श्रीमान् जार्ज बादशहास अर्ज करण्याचा ठराव पास करावा. अशा रीतीनें क्षुद्र

गोष्टीबद्दलचे तंटे ही आमच्या पुढाऱ्यांना आपसांत मिटवितां येत नाहीत, त्याला सुद्धां सरकारी अधिकाऱ्यांची मध्यस्थी लागते असा शितोडा उडवून घेऊन शेवटीं वाद घालणाऱ्या पक्षांनीं हातांत हात घातले.

## युद्धाचा रंग.

युरोपांतल्या युद्धाच्या रंगांत गेल्या आठवड्यांत विशेषसा पालट झाला नाहीं. दोस्त राष्ट्रांना मासिडोनियामध्यें मागें हटण्याची अवश्यकता दिसून ते शत्रूंची संख्या मोठी असतांही धैर्यानें हटून दुसऱ्या ठाण्यांतून तळ देऊन राहिले आहेत. बल्गेरियन लोक मधून मधून इंग्रजांवर हल्ले करीत आहेत, पण इंग्रजांचें सैन्य थोडें असतां ही त्यांच तोफखाना उत्कृष्ट असल्यामुळें संख्येंतलें व्यंग भरून निघाल्यासारखा परिणाम होत आहे. जसें इंग्रजांवर तसें फ्रेंचांवर ही बल्गेरियाचे हल्ले चालले आहेत. पण बल्गेरियाचे प्रयत्न निष्फळ होत आहेत. ग्यालीपोलींत तुर्क लोकांचा तोफखाना जोरानें काम करीत आहे. जर्मन लोक त्यांच्या तोफखान्यावर नेमिले गेल्यापासून त्याचें स्वरूप पालटलें असावें. सुरुंगटाकण्याचा क्रम ही झपाट्यानें सुरू आहे. राशियन टार्पेडो बोटींनीं तुर्कांच्या तीन बोटी व एक जहाज बुडविलें. आस्ट्रियन लोकांना मांटे ग्रीस पासून हटावें लागलें ही गोष्ट ते लोक सुद्धां कबूल करतात. बाल्टिक समुद्रांत एका जर्मन क्रुझरला अपघात घडला. जर्मन लोकांची अन्न सामुग्री संपुष्टांत आली असल्यामुळें पुढें कसें होईल व आतांपर्यंत केलेली द्रव्य हानि व प्राणहानि फुकट जाईल यावद्दल जर्मन चान्सेलरास वाईट वाटून रीचस्टागच्या एका बैठकीचे वेळीं त्यांनीं भाषण करतांना अश्रु ढाळल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ब्रिटिश, फ्रेंच व इटालियन प्रधान पारीस मध्यें नुकतेच जमले होते; सर्वांनीं एकमतानें कांहीं विशेष जरूरीच्या प्रश्नाचा निकाल लाविला. खुद्द इंग्लंडांत लढाईवर जाण्यासाठीं लोक कसे मिळतील ही काळजी पडल्यामुळें लॉर्ड डर्बी यांनीं कांहीं मुदत दिली होती व ती संपल्यानंतर इंग्लंडांत सक्तीची लष्करी नोकरी अंमलांत आणण्यासाठीं एक योजना तयार केली होती. पण आतां तिचें काम पडणार नाहीं असें दिसतें. कारण इंग्लंडांत इतके लोक लढाईवर जाण्यास तयार झाले आहेत कीं त्यांचीं नांवें नोंदण्यासाठीं नवीं पुष्कळ आफिसें उघडलीं तरी प्रत्येक आफिसाच्या दाराशीं हजारों लोक खोळंबून बसलेले असतात. श्रीमान जॉर्ज बादशहांनीं या बाबतींत ही उत्कट उदाहरण घालून दिलें आहे. त्यांनीं आपल्या तैनातींतल्या माणसांचें मनें वळवून त्यांच्याकडून आपला नांवें नोंदविलीं आहेत. विलायतेंतल्या लोकांना सध्या युद्धाविषयीं इतका उत्साह उत्पन्न झालेला दिसत आहे कीं हा कांहीं तरी दैवी चमत्कार आहे असें लोकांना वाटूं लागलें आहे.

बल्गेरियन लोकांच्या मदतीनें शत्रूंनीं सर्बिया आक्रमण केला खरा. पण तोच प्रदेश अखेर त्यांच्या आपापसांमधल्या यादवीला कारण होईल असा रंग दिसत आहे. सर्बियाच्या संबधांत आस्ट्रिया व हंगेरी यांच्यामध्यें भांडण लागलें आहे. व बेलग्रेड वर हंगेरियन लोकांनीं लावलेलें आपलें निशाण आस्ट्रियन कम्यांडरनें काढून टाकिलें. त्यावरून हंगेरियन लोकांत चळवळ उत्पन्न झाली आहे.

## युद्धाचा वणवा.

सध्याचा युद्धाचा वणवा जर्मनीनें ईजिप्त आफगाणिस्तान व हिंदुस्थान घेतल्याशिवाय शांत होणार नाहीं अशी वल्गना जर्मन लोक करीत असतात. त्यांना विनतोड उत्तर हर हार्डेन नांवाच्या एका जर्मन लेखकानें एका जर्मन पत्रांत दिलें आहे तें वाचण्यासारखें आहे. तो ह्मणतो कीं या वल्गना इतक्या मूर्खपणाच्या आहेत कीं शहाण्या माणसाला त्या ऐकून हसूच येईल. इंग्रज लोकांचा पाठलाग तांबड्या समुद्रांत किंवा हिमालय पर्वतापर्यंत करण्याची ताकद जर्मनीमध्यें नाहीं. जर्मनींतलें लष्करी बंड मोडण्याचा दोस्त राष्ट्रांचा निश्चय सुदृढ कालच्यांत ही नाहीं व इराणी आखातांत ही नाहीं, पण खुद्द जर्मनीच्या मध्यभागींच दोस्त राष्ट्रें तडीला नेतील. त्याला जर्मनीनें येत्या हिंवाळ्यांत जपावें व त्याच्या रक्षणासाठीं आपलें सगळें सैन्य तेथें एकवटावें.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—धनु राशीला रवि आल्यापासून थंडीला वाऱ्याचेंही बळ मिळालें आहे. सूर्यकिरणांचा ताप ही कडक असतो. रोगराई कांहीं विशेष नसून प्लेग मात्र ठिकाठिकाणच्या आरोग्यवृद्धीच्या नैसर्गिक अडचणी दूर करण्यास अद्याप शिकवीतच आहे.

**आनंद वेलाः**—आमचे येथील वे. शा. सं रा. रा. गोविंद हरी दामले यांस गेल्या सोमवारीं शीतज्वराच्या विकृतीनें सर्व मुलाबाळांमध्यें व इतर सुखसमृद्धीमध्यें देवाज्ञा झाली ही आनंदाची गोष्ट होय. वयाच्या ८२ वे वर्षीं पिकलेल्या पानाप्रमाणें जीर्ण शरीर टाकून मनाच्या प्रसन्न स्थितींत सर्वांना आशिर्वाद देत देत जेव्हां मनुष्य निरोप घेतो, तेव्हां ती त्याची आनंदवेळाच होय. राजश्री गोविंद शास्त्री हे कै० कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांचे सहाध्यायी असत तर्क व न्याय हे यांचे आवडते विषय. ज्योतिर शास्त्र व उपनिषदें यांतहि त्यांनीं चांगला अभ्यास केलेला असे. यांना काव्याचा नाद विशेष असे. त्यांचे **प्रश्नोत्तर चमत्कृति** हें पुस्तक शास्त्रीय कोटींतलें चांगल्यापैकीं आहे. हस्ताक्षर अगदीं सोन्यासारखें असून त्यांनीं आपल्या कुळाला त्याचें वरदानच दिलेलें आहे. गेली १८-१२ वर्षें दृष्टीमांद्य येईपर्यंत त्यांचा दांडगा व्यासंग चालूच असे. कीर्तन, गायन व सारंगी यांची यांना फार आवड असे. अलंकार व सुभाषितें यांचा साठा यांना मुखोद्गत येत असे. यांची बाल्बोध रहाणी व विद्येची अभिरुची यांची साक्ष त्यांचे कर्ते सवरते चौघेही चिरंजीव देत आहेत. दुसरे चिरंजीव रा. ब. केशवराव हे प्रांतिक कौंसिलचे सभासद आहेत यावरून शास्त्रीबुवांच्या पुण्याईनें सर्वच घराणें किती उंच शिखरावर पोचलें आहे याची कल्पना येईल.

रा. रा. बी. पी. स्टँडन कमिशनर यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला असून रा. रा. चॅपमन हे पुनः येवतमाळच्या डिप्युटी कमिशनरच्या जागीं रुजू होत आहेत.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डिप्टी कमिशनर हे हिवरखेड तेल्हाऱ्याच्या बाजूनें येत्या शुक्रवारीं आकोल्यास येतील.

## नोटीस

दिवाणी सबजज्ज साहेब कोर्ट मलकापूर कि. नादारी अर्ज नं. २२ सन १९१५

अर्जदार

दत्तु वा गणपत सोनार रा. फुली ता० मलकापूर.

सावकार

राघो वा चंद्रभान कुणबी वडनेर भोलजी वगैरे राघो वा चंद्रभान कुणबी रा. वडनेर भोलजी ता० मलकापूर जि० बुलडाणा

यांसः—

कळविण्यांत येते कीं वरील नादारी मुकदम्यांत अर्जदार दत्तु वा गणपत सोनार रा० फुली ता० मल्कापूर याने नादार होणें करितां आमचे कोर्टांत अर्ज दिला आहे.

त्याची चौकशीची तारीख १९-१-१६ इसवीची आहे. करितां तुह्मी आपलें कर्ज शाबीत करणे करितां सदर्हू तारखेस आमचे कोर्टांत सकाळीं ११ वाजतां हजर व्हावें. कळावें ता० १६-१२-१९१५

N. N. 421 M C Tiwari<br>Sub Judge Malkapur

## नोटिस

रा० रा० नथमल रामप्रताप मारवाडी रा॥ दानापुर ता० आकोट यांसः—

तुकाराम वा॥ गोविंदा तेली रा. दानापुर ता० आकोट याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी मजजवळून स्थावरचे खरेदीखत रुपये १९०० पंधराश्याचे करुन घेतले व त्यांत लिहुन घेतलें कीं. मला रुपये ८०६ आठशे सहा नगदी दिले परंतु मला तुह्मी मुळीच दिले नाहींत व मागील भरण्याचा हिशेब ही दाखवीला नाहीं. करितां मला ते खरेदीखत कबुल नाहीं कळावे ता० १९-१२-१९ इ० द. विठ्ठल लक्ष्मण पंडीत

तुकाराम गोविंदा तेली रा. दानापुर

नो. नं. ४२२ दस्तुर खुद

## कापूस–तक्ता–साप्ताहिक– ११ डिसेंबर १९१५ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. ता. ११-१२-१५ पर्यंतचा आठवडा | कापसाच्या गाड्यांची संख्या. १।९।१५ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. ता. ११।१२।१५ पर्यंतचा आठवडा | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. १।९।१५ पासून |
|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालू साल | १४,९९४ | ६८,२८० | ४६८ | १,१८९ |
| | गुदस्त | ९,४७१ | १७,१३८ | १३३ | ३६९ |
| | तिगस्त | ६,०४३ | ३९,९६७ | ३७७ | १,८९९ |
| यवतमाळ | चालू साल | २,१४९ | १४,४७८ | १,०८४ | २९९९ |
| | गुदस्त | २,७४१ | ७,८८६ | ४२३ | ६४८ |
| | तिगस्त | १,२९९ | १८,७०६ | १९४ | १,१८० |
| आकोला | चालू साल | १९,४९९ | ८९,९२९ | ३६७ | ९०९ |
| | गुदस्त | ६,९९९ | २२,६०४ | १९२ | ३७९ |
| | तिगस्त | ९,७९७ | ९९,६६७ | २३६ | २,०२७ |
| बुलडाणा | चालू साल | १०,०९१ | ७२,०६९ | २४९ | ३९१ |
| | गुदस्त | ६,३४६ | २०,८७६ | ८८ | १४६ |
| | तिगस्त | ९,४९८ | ४९,२३३ | ६८३ | १,१२९ |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ४२,६८९ | २४०३४८ | २,१९४ | ९,००० |
| | गुदस्त | २१,९९७ | ६८,९०४ | ७९६ | १,९३८ |
| | तिगस्त | १८,९९७ | १६७१७३ | १,४९० | ६,२३९ |

टीप— चालू सालच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १२ डिसेंबर १९१४ व १३ डिसेंबर १९१३ पावेतों होते.

सी. बी. क्लटरबोच<br>डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर इंडस्ट्रीज मध्यप्रांत

## आकोला बाजार भाव.

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥। |
| सोनें | | २४॥। |
| चांदी | | ७८ ते ७९ |
| जवस | | १३० |
| जवारी नवी | | ७० |
| गहूं काठे | | १३० ते १५० |
| गहूं खांडवा पीवडा | | ७। |
| चणे | | ५॥ |
| तुरी | | ४॥ |
| उडीद | | ४॥= |
| मूग | | ६ |
| टोळी मोहाचे बीज | | १२॥. |
| तेल | | ६॥. |
| सरकी | १०। | १०।= |
| तुप | | १२॥ |
| कापूस | ६१ | ६२ |
| रुई आकोला जीन | | ७५॥ |


# आठ आण्यांत

# लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील. )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र.

२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति

३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.

४ **मृताशीं** संभाषण करण्याची युक्ती.

५ **गानविद्या**—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या

**वशीकरण**—विद्या.

**पत्ता**—स्पष्ट व बालबोधींत लिहावा.

प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.

---

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना.

## ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठि:--पांजर पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! **ओटो सुरंगीं** ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो सुरंगी.

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर. मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधा अरगजा १ तोळ्यास ६ आ. १२ आ १ रु. १॥ अरगजा व फितना निरनिराळ्या मु[illegible] दर डबीस ३ आ. ४ आ. ६ [illegible] आ. १ रु. उदणें दर डबीस २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १ [illegible] १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुल[illegible] मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावत[illegible] जिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धन[illegible] डॅस, बिझिक, इस्पिकें, हस्तीदंती [illegible] फण्या, पितळी सामान, [illegible] करणे, मंच्या, सरबतें व मु[illegible] बदामाचें तेल, व बातहार[illegible] वर्धक तेलें, सुर्टे व वेणीचें गंगाव[illegible] त्यादि वरील पत्यावर मिळेल. ज्या[illegible] सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्यु पाठविला जाईल. नो. नं.

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. [illegible] चे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाळा, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

**पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी.** } **कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**

नो० नं० ३६९

---

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL A[illegible] PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5,26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607, | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18.89 |
| 1914 | . 72,46,0 | 4,96,8650 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constites record for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted–Terms liberal

*A. C. Lal,*
Branch Secretary.
*C. P. Berar & Khandesh*
NagPUR.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २७ माहे दिसंबर सन १९१५ ई० [ अंक ४७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटावर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागेंराहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट
नं २

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ।।।≈ तो. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो. न० ३

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय,
सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिलदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही [illegible] न्याशनलचें शंभर नंबरी वापर[illegible] व डागाचा उपयोगही नियमितच [illegible] असतो. यामुळें जिन्नस पांढरे [illegible] अगर वाईट निवण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९३

---

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशीकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १।। रुपया

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेववें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

## WANTED

A COMPOUNDER FOR THE CENTRAL JAIL, NAGPUR.

Pay according to grad. Free quarters Application together with testimonials to be sent to the undersigned.

C. H. Bensley,
Lieut:Col: I.M.S
Superintendent, Central Jail
Nagpur

N. N. 404

---

## नोटीस.

खालीं सही करणार यांजकडून सर्व लोकांस जाहीर नोटिस देण्यांत येते कीं, ... ब्याहारीलाल गिरधारीलाल हा गिरधारी-... चिमणलाल यांचा दत्तक मुलगा आहे. आणि गिरधारी यांची मकानची व दुकानची सर्व स्थावर जंगम इस्टेट व त्यांचे दुकानदारीची गहाणखतें, कर्जरोखे, वैगेरे इतर दस्तैवजाचा मालक मी आहे. परंतु हल्लीं रामलाल नेमीचंद याचा हक्क नसून वरील मिळकतीची अफरातफर करून राहिला आहे. ह्मणून मी त्यांचेवर दिवाणी कोर्टांत फिर्याद आणणार आहे. करितां सर्व लोकांस जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, वरील रामलाल नेमीचंद याजला वरील दुकानचे कांहीं कर्ज देऊं नये. जर द्यावयाचे असेल तर मजला आणून द्यावें. नाहीं तर वरील दुकानचे कर्ज जर रामलाल नेमीचंद याजला दिलें. तर त्यांना मजला सदर्हु कर्ज पुन्हा द्यावें लागेल. ता. २३-१२-१५

सही

बिहारीलाल वल्द गिरधारीलाल खत्री
रा. आकोला द. खु.
नो. नं. ४२३

---

## पत्रव्यवहार

श्रीयुत सम्पादक जी वऱ्हाडसमाचार
कृपा करके निम्न लिखित विषय को अपने अमूल्य पत्र में छापकर कृतार्थ करें।

### भारत में दान का सुधार।

इस में संदेह नहीं है कि भारतवर्ष में दान का विषय बहुतही बिगडा हुआ है। शास्त्रों में विद्या दान सब से उत्तम कहा गया है, चूंकि साधुओं, ब्राह्मणों और अतिथियों का कर्तव्य विद्या का प्रचार और देश सेवा थी, इसलिये यही लोग दान के सुपात्र माने गये हैं। जब तक इस देशमें विद्या की उन्नति रही तब तक ये महात्मा लोग विद्वान् होकर अपने सत्य कर्तव्य का पालन करते रहे। परन्तु विद्या-के लोप होजाने से ये लोग भी मूर्ख बनकर अपने कर्तव्य को भूल गये और केवल नाम के साधु ब्राह्मण रह गये। सन् १९११ की मनुष्यगणना के अनुसार ५६ लाख मनुष्य साधु या भिक्षुक बतलाये गये हैं जैसे कि साधारण लोगें में राजा और रईस हैं वैसे ही इस साधुमण्डली में बहुतसे धनवान् हैं जिनकी आमदानी लाखों रुपये साल की है तैसे महंत गया का सालाना आमदानी एक लाख से ज्यादा है. लखनऊ के साधु हजारी बाग़ के रियायत की आमदानी साढे तीन लाख रुपया सालाना है, इसी तरह स्वामी शंकराचार्य के मठों और अन्य २ साधुओं के अखाडे रियास्तों और रईसों से लाखों रुपया दानमें पाते हैं। करीब दो करोड़ भारतवर्ष में ब्राह्मणों की गणना है इन में से फी सैकड़ा ५ ऐसे हे जो स्वयं व्यापारादि उत्तम रीति से धन उपार्जन कर आजीविका करते है बाकी सैंकड़ा पीछे ९५ केवल दान ही पर निर्भर हैं। यदि ४) फी मनुष्य का माहवारी पोष्ण पालन का खर्च हो तो ८ करोड रुपया माहवारी ब्राह्मण लोग केवल दानमें लेते हैं। इसके अतिरिक्त ५६ लाख साधुओं के पोष्ण में भी करीब ३ तीन करोड रुपया माहवार हिन्दू जाति खर्च करती है क्योंकि साधु लोग पोषण के अलावा भारतवर्ष के तमाम तीर्थों में प्रायः रेलगाड़ी के द्वारा भ्रमण करते हैं इसालिये हर एक साधु पर ६) माहवार से कम खर्च नहीं पड़ता. क्योंकि प्रायः साधू लोग तमाकू, गांजा, चरस, अफीम, आदि पदार्थों के सेवन में लिप्त हैं। इस तौर दस करोड रुपया हर महीने भारत वर्ष का दान में खर्च होता है। अब प्रश्न यह है कि दस करोड रुपया माहवारी दान के बदले हिंदू जाति को कितना लाभ पहुंचता है। इन साधू और ब्राह्मणों में सैंकड़ा पीछे एक भी अपने शास्त्रोक्त कर्तव्य का पालन अर्थात् विद्या की उन्नति, स्वदेशी वस्तु का प्रचार और देश भक्ति नहीं करता। इनमें साधु और ब्राह्मणों का इतना दोष नहीं है जितना कि दान देने वाले लोगों का, क्योंकि कुपात्रों और मूर्खों को दान देना इन लोगों को सुस्त और दुराचारी बनाना है और इसी कारण कुपात्रों और मूर्खों को दान देनेवाले भी पाप के भागी है, क्योंकि यदि दान देने वाले इन मूर्ख साधुओं और ब्राह्मणों को दान न देते तो कदापि यह लोग दुराचारी न होते, निस्सन्देह बहुतसे लोग भिखारी बन गये हैं, और भिक्षा मांगन इन्होंने अपना एक पेशा बना रक्खा है। प्रायः ये लोग भिक्षा मांगते समय लोगोंको तग और दिक करते हैं। युरोप और अमेरिका आदि सभ्य देशोंमें नियम है कि भीक मांगनेवाले को ६ महीने की कैद होती है क्योंकि वह सभ्य जातियां अपने देश में सुस्ती और दुराचार फैलाना नहीं चाहतीं। मगर भारतवर्ष में कानून के द्वारा भीख मांगना बन्द कराने का यत्न करना बहुत ही बुरा है, क्योंकि दानका विषय एक धार्मिक बात है, इसालिये धर्म की बातों में सरकार कभी दखल न देगी और सरकार से धर्म के विषयोंमें प्रार्थना करना अपनी मूर्खता और अयोग्यता बतलाना है। इसके शिवाय यादि भीख मांगना, अन्य सभ्य देशों की न्याई जुर्म माना जायगा तो पुलीसको जो अभी मूर्ख और असमर्थों पर बहुत जुल्म कर रही है इनको साधुओं और ब्राह्मणोंपर जुल्म करने का अधिक मौका मिलेगा॥

इसके सिवाय भारतवर्ष में भिक्षुकों की गणना जियादा बढ़ने का कारण यह भी है कि इस देशमें सब प्रकार के लाभदायक व्यापार और कारखाने बिल्कुल बंद होगए हैं जिससे यहांके लोगों को आजीविका नहीं मिल सकती। और सब सभ्य देशों और जातियों में हर एक चीज़ के कारखाने कायम हैं जिन कारखानों की बनी हुई चीजें संसार के हर एक देशमें भेजी जाती हैं और इन्हीं कारखानों में हर एक देश के सैंकड़ा पीछे ८५ लोग आजीविका प्राप्त करते हैं इन्हीं कारखानों से यह सब देश और जातियां करोड़ों अरबों रुपये हर महीने पैदा करके धन पैदा कर रहीं हैं परन्तु भारतवर्ष मे विदेशी व्यापारियों ने यहां के सब कारखानों और लाभदायक व्यापारियों को नष्ट कर दिया है जिनसे कि लोग या तो नोकरी करते हैं जो कि शास्त्रों में सब से नीच मानी गई है क्योंकि लिखा है "उत्तम खेती मध्यम व्यापार निकृष्ट चाकरी भीख निदान" या भीख मांगने से लोग पेट पालन करते हैं इस का मुख्य कारण यह है कि यहां के महाराज और रईस अन्य देश का बनी हुई चीजों के गुलाम बन गए हैं और इसी कारण यहां से हरसाल दोसौ करोड रुपया अन्य २ विदेशी लोग बहार ले जाकर इस भारतवर्ष को निर्धन बना रहे हैं। इसी से देशमें आप जियादा बढ़नेके जिम्मेवार नहीं है जो स्वदेशी चीजों को छोड़ विदेशी चीजें वर्तते है, बस निश्चय हुआकि वे लोग धर्मात्मा या धर्म के रक्षक हैं जो केवल स्वदेशी चीजों को वर्तते हैं, ताकि इस देशमें फिर सब प्रकार के कारखाने स्थापित हो जावें जिनसे सब लोगों को आजीविका प्राप्त हो और फिर हमारा सारा दान विद्या की उन्नति अर्थात ग्राम २ में पाठशालायें और हर एक मंदिर और धर्मशाला में पुस्तकालय और समाचार पत्रालयों कें खोलने मे लगे ताकि फिर भारतवर्ष जापान और अन्य २ देश और जातियों की न्याई स्वतन्त्र धनवान सभ्य और धर्मात्मा बने।

टहलराम, गंगाराम जमींदार,
डेरा इस्माइलखां।

---

### JEWELRY ON CHILDREN.

To THE EDITOR. Berar Samachar

SIR,—I have read with very great interest the Correspondence on the above subject. Your correspondents interested in Social Reform have done a distinct service in inviting public attention to this important social evil Those politicians who lay so much stress on the poverty of India, should pay sufficient attention on this subject whether how much money is employed unproductively in the manufactures of ornaments by the rich Maharajas and their zenanas and how many goldsmiths, etc, are engaged in this line as unproductive labourers. This considerable amount of golden ornaments and precious stones if directed and utilized for the development of material resources, shall go a long way in remedying the poverty of agricultural and labouring classes. It is a pity that the Indian Social Conference while discussing other social reforms and passing resolutions have up to this time neglected to discuss this important subject; and it is hoped, now that the public attention has been directed to this important subject, they shall also discuss and adopt some suitable measures. I am enclosing here with a tract in which I have explained what a large amount of money is being abused by Indian nobility and gentry in feeding about 56 lakhs of so called (sadhus) and professional beggers, and this tract will be sent free to any body applying for it on enclosing half anna postage stamp.

TAHL RAM GANGA RAM,
Zamindar.

Dera Ismail Khan, 16 Decr 1915

---

वऱ्हाडसमाचार

मित्ति मार्गशीर्ष वद्य ६ शके १८३७

## विद्यार्थी आणि राजकारण.

या विषयाचें गेल्या पांच सात वर्षांत इतकें चर्वितचर्वण झालें आहे कीं त्यासंबंधानें नवीन कांहीं सांगावयाचें क्वचित्च राहिलें असेल. तथापि हा विषय इतका महत्त्वाचा आहे कीं कांग्रेससारख्या प्रसंगीं या विषयाचा ऊहापोह पुनःपुनः करण्याचा मोह वर्तमानपत्रकर्त्यांना टाळतां येत नाहीं. गेल्या महिन्यांत मुंबईच्या दैनिक पत्रांतून विद्यार्थ्यांनीं कांग्रेसचे स्वयंसेवक व्हावें कीं नाहीं या विषयीं दोन्ही पक्षांचीं बरींच पत्रें आलीं होतीं. पण हा नुसता वर्तमानपत्रांतून चर्चा करण्याचा विषय नाहीं. तर मुत्सद्दी व शिक्षणाधिकारी यांनीं एकत्र बसून शांतपण विचार करण्यासारखा विषय आहे. इतकेंच नाहीं तर भावी पिढीचें हिताहित किंबहुना हिंदुस्थान देशाच्या अभ्युदयाची किल्ली या विषयाच्या हातांत असल्यामुळें या विषयाकडे पुनः एकदा वळणें सर्वतोपरी इष्टच आहे.

शिक्षण आणि राजकारण यांच्या मध्यें सबंध नसावा असें कित्येकांचें ह्मणणें आहे आणि या त्यांच्या मताच्या समर्थनार्थ ते बंगाल्यांतल्या विद्यार्थ्यांचें उदाहरण देऊन असें प्रतिपादतात कीं तेथील राजद्रोही चळवळी व गुप्त कट हा या संबंधाचाच परिणाम आहे. वस्तुतः याच्या उलट प्रकार आहे. ह्मणजे उघड रीतीनें राजकारणांत पडूं दिलें नाहीं ह्मणजच तरुण माणसांना गुप्त मंडळ्या करून त्या विषयाची चर्चा करण्याची बुद्धी होते व ते कांहीं तरी अपक्व विचार डोक्यांत भरवून घेऊन कटासारख्या भलभलत्या गोष्टींत शिरतात. कांग्रेससारख्या कायदेशीर पद्धतीनें चालविलेल्या संस्थांच्या बैठकींत त्यांना हजर राहतां आलें, तर गुप्त मंडळ्या करण्याचें त्यांना कारणच पडणार नाहीं, व पोक्त व अनुभवी राजकारणी

पुरुषांचे विचार ऐकण्यास मिळाल्यावर त्यांच्या डोक्यांत भलभलत्या कल्पनांना व विचारांना वाव मिळणार नाहीं. ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं ती अजून पुष्कळ शहाण्या माणसांच्या डोक्यांत कशी उतरत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांतले आईबाप बहुधा अशिक्षित असतात; मुलें मात्र इंग्लंडचा इतिहास, अर्थशास्त्र, राजनीति वगैरे विषय शिकून आणि वर्तमानपत्रें वाचून जिज्ञासु झालेलीं असतात. अर्थात राजकारण हा तुमचा विषय नाहीं. त्याच्याशीं तुह्मांला कांहीं कर्तव्य नाहीं, असें आईबापांचे विचार तरुण मुलांना कसे पटावे? इंग्लंडांत अशी स्थिति नाहीं. तेथें आईबाप ही सुशिक्षित असल्यामुळें तेथें मुलांवर आईबापांनीं आपलीं मतें लादलीं तर चालण्यासारखें आहे. खरें ह्मटलें तर अशा ठिकाणीं मुलांवर आईबापांची हुकमत चालावयाला हवी. पण तेथें पाहावें तर विद्यार्थी खुशाल राजकारणांत पडतात, आणि जेथें आईबापांच्या शिक्षणाभावामुळें व कोत्यासमजुतीमुळें राजकारणासारख्या विषयाचें ज्ञान तरुणांनीं कांग्रेससारख्या संस्थांना हजर राहूनच करून घ्यावयास पाहिजे तेथें त्यांना बंदी! हा कसा उलटा न्याय आहे पहा!

मुलांना राजकारणांत पडूं देण्याच्या किंवा न देण्याच्या पद्धतींत हा असाच फरक आहे. हिंदुस्थानांत राजकीय चळवळ करणारे कांग्रेसचे पुढारी जेव्हां विद्यार्थ्यांना उपदेश करतात, तेव्हां त्यांचीं भाषणें उघड उघड सभांतून होतात. त्यांचे रिपोर्ट घेण्यास पोलीस हजर असतात व वर्तमानपत्रांतून ही तीं भाषणें प्रसिद्ध होतात. पण सरकारी अधिकारी विद्यार्थ्यांना जेव्हां राजकारणांत पडण्याची बंदी करतात, तेव्हां ते गुप्त सरक्युलरासारख्या साधनांचा उपयोग बहुधा करतात! हा फरक लक्षांत न येण्या इतके खुळे आमचे तरुण विद्यार्थी आहेत अशी का सरकारची समजूत आहे? तरुणांना उघडपणें त्यांच्याशीं मिळून मिसळून जो वागेल त्या माणसावर त्यांची भक्ति जडते. त्याच्या गोड भाषणाचा तर त्यांच्य मनावर परिणाम होतोंच होतो, पण वाक्ताडनाचा ही इष्ट परिणाम होतो. पण त्यांच्यापासून कांहीं चोरून ठेविलें, किंवा संशयास्पद वर्तन ठेविलें तर अशा माणसाची त्यांना फार चीड येते. येवढ्यासाठीं त्यांना राजकारणांत खुशाल पडूं द्यावें, त्यांना आपले विचार व्यक्त करण्याची मुभा ठेवावी, व ते वाहवत असले तर उघडपणें त्यांच्या चुका दाखवून त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करावा. देशांतली अराजकता घालविण्याचा हाच राजमार्ग आहे. प्रेमानें प्रेम व विश्वासानें विश्वास वाढतो. तुह्मी तरुणाविषयीं गुप्त सर्क्युलरें काढलीं कीं तरुण ही गुप्त मंडळ्या स्थापन करण्यास तुमच्या पासून शिकतात. खाजगी सभा, खाजगी शाळा, वर्तमानपत्रें, लायब्रऱ्या यांच्याशीं सरकारी अधिकाऱ्यांचें संशयास्पद वर्तन कां असावें? या संस्था प्रामाणिकपणें आपापलें विरुद्ध मत प्रसृत करीत असल्या, तरी जों पर्यंत त्या तें काम उघडपणें करीत आहेत, तोंपर्यंत त्यांचें भय सरकारला कां वाटावें! खरें भय उघडपणें केलेल्या कृतीत नसून गुप्तपणें चाललेल्या कृतींत आहे हें तत्त्व जर सरकारी अधिकारी पूर्णपणें समजून त्या प्रमाणें वागतील तर देशांतल्या गुप्त मंडळ्या, गुप्त कट आणि गुप्त चळवळी आपोआप बंद होतील. विलायतेंत सरकार ज्या कांहीं गोष्टी करतें त्या सर्वांना सारख्या मान्य असतात काय? असणें शक्यच नाहीं. तसें असतें तर सध्याच्या युद्धांत सरकारनें अमुक चुका केल्या, व तमुक गोष्टी केल्या नसत्या तर असा परिणाम घडला नसता, वगैरे जी टीका सरकारवर तिकडील वर्तमान पत्रांतून होते ती होण्याचें कारण नव्हतें. अशा रीतीनें विरुद्ध मत उघडपणें जेथें देतां येतें, तेथें गुप्त मंडळ्या स्थापन करण्याचें कारणच राहत नाहीं. हिंदुस्थानांत दुर्दैवानें तशी स्थिति नाहीं. ह्मणून गुप्त मंडळ्यासारखा दुर्धर रोग हिंदुस्थानच्या राष्ट्र देहाला लागला आहे व तो आमच्यांतल्या राष्ट्र पुरुषांचें रक्त शोषून घेत आहे. हा रोग नष्ट होऊन राष्ट्रपुरुषाचें शरीर पुष्ट होईल तो सुदिन ह्मटला पाहिजे. हा रोग घालविला पाहिजे, या विषयीं सरकार व लोकाग्रणी यांचें पूर्ण मतैक्य आहे. हा रोग घातुक आहे याविषयीं कोणालाच शंका नाहीं. मतभेद आहे तो फक्त घालविण्याच्या पद्धती संबंधानें आहे. कोणी ह्मणतात कीं विद्यार्थ्यांना राजकारणांत पडूं दिलें नाहीं ह्मणजे हा रोग नष्ट होईल. दुसरे ह्मणतात कीं त्यानें तो उलटा वाढेल. कोणाच्या मतांत तथ्यांश अधिक आहे याचा निर्णय करणें बरेंच कठीण आहे. पण वर केलेल्या विवेचनाच्या योगानें हा विचार करण्यास थोडेंसें तरी साधन होईल अशी आह्मास पूर्ण उमेद आहे. आमची सरकारी अधिकाऱ्यास अशी नम्रपणाची विनंति आहे कीं हिंदुस्थान राजनिष्ठ आहे व सध्याच्या लढाई सारखे किती ही संकटाचे प्रसंग आले तरी तो राजनिष्ठच राहील ही पूर्ण खात्री ठेवा. आमच्या तरुणाविषयीं यत्किंचित् ही शंका घेऊं नका; त्यांना राजकारणांत खुशाल पडूं द्या, ह्मणजे सर कृष्ण मोहन गुप्त, सर एस. पी. सिंह, मदन मोहन मालवीय. किंवा सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्यासारख्या पुढाऱ्यांशीं समागम व विचारविनिमय झाल्यानें त्यांच्या डोक्यांतले भलभलते विचार पार दूर होतील, व हिंदुस्थानचे तरुण पूर्ण राजनिष्ठ, व कर्तव्यनिष्ठ नागरिक होऊन ब्रिटिश राष्ट्राची गौरववृद्धि करण्यास त्यांचें पूर्ण साह्य मिळेल.

---

## आस्ट्रिया व अमेरिका.

अमेरिकेचे प्रेसिडेंट मि. विल्सन हे लुसिटानिया बोटीचे बाबतींत जर्मनीशीं पत्रव्यवहार करतां करतां थकले; आतां आस्ट्रियानें अंकोना जहाज बुडविल्याबद्दल त्या राष्ट्राचे मागें लागले आहेत. एका आठवड्यांत उत्तर न आलें तर राजकारणी स्नेहसंबंध तुटेल असा अमेरिकन धाक घातला आहे. जर्मनीनें अमेरिकेचें पाणी ओळखलें,. तसेंच बहुधा आस्ट्रियाही करील. सामदामाचे उपाय हरल्यावर जो दंडाचा अवलंब करणार नाहीं त्याची अशीच फजीती व्हावयाची

---

## चीनमध्यें बादशाहीची प्राणप्रतिष्ठा.

चीनमध्यें गेल्या पांच वर्षांत प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें होतें. पण कारभार सुरळीत चालेना. गुप्त मंडळ्या निर्माण होऊन पुनः बादशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्याचे यत्न सुरू होते. शेवटीं कायदे कौंसिलांत मतें घेण्यांत आलीं. त्यांत बहुमतानें बादशाही स्थापित करण्याचें ठरलें. त्या प्रमाणें हल्लींचे प्रेसिडेंट युआन शिकाई यांनाच बादशहा करण्याचें ठरलें. शेक्सपिअरच्या ज्युलियस सीझर नाटकांतल्याप्रमाणें युआन-शिकाईनें दोनदां राजपद नाकारण्याचा फार्स करून पाहिला. अखेर लोकाग्रहास्तव बादशहाचें पद स्वीकारण्याचें कबूल केलें. युआन शिकाई यांनीं केलेला हा प्रकार 'अग अग ह्मशी, मला कां नेशी' या ह्मणी प्रमाणें एकंदर झाला असें युरोपचीं पत्रें ह्मणत आहेत. ही नवी व्यवस्था नव्या वर्षापासून अंमलांत यावयाची आहे. एकंदरींत प्रजासत्ताक राज्याचें रूपांतर नियंत्रित राजसत्तेंत झालें, येथून पुढें आणखी रूपांतर होऊन मांचु घराण्याप्रमाणें सर्वसत्ताक बादशाही होण्यास किती काळ लागतो तें पहावें.

---

## गव्हाचा निर्गत व्यापार.

हिंदुस्थानचा निर्गत व्यापार हिंदुस्थान सरकारानें आपल्या हातीं घेतल्यास अजून वर्ष झालें नाहीं. तों इतक्यांतच जवळ जवळ वीस लाख रुपयांचा फायदा सरकारास झाला. गव्हाच्या प्रचंड व्यापाराच्या मानानें हा नफा कांहींच नाहीं. तथापि गव्हाच्या निर्गतीला त्यानें आळा बसल्यामुळें हिंदुस्थानांत गव्हाचा भाव बेतांत राहिला हा मोठा फायदा समजला पाहिजे. सरकारानें हा व्यापार आपले हातीं घेतला नसता, तर किती महर्घता झाली असती तें सांगतां येत नाहीं. असेंच कापसासारख्या इतर निर्गत मालासंबंधानें ही व्हावयास पाहिजे.

---

## किंडरगार्टन प्रदर्शन व कान्फरन्स.

गेल्या आठवड्यांत (ता. १९ रोजीं) अलाहाबाद येथें किंडरगार्टन प्रदर्शन लेडी मेस्टन यांच्या हस्तें उघडण्यांत आलें. अशातऱ्हेचें प्रदर्शन हिंदुस्थानांत पाहिलेंच होतें, व याचें अनुकरण इतर प्रांतांतून ही होइल अशी आह्मी आशा करतों. कारण, किंडरगार्टनची खरी कल्पनाच आमच्या लोकांना अद्याप झालेली नाहीं, ती अशा प्रदर्शनामुळें तरी येईल. आमच्या इकडे किंडरगार्टन ह्मणजे लहान मुलांना दगड, माती, गोट्या, वगैरे साधनांनीं हंसत खेळत खेळविणें इतकेंच समजतात. कित्येक शिक्षकांची समजूत याच्या ही पलीकडे गेलेली आहे. त्यांना वाटतें कीं किंडर गार्टन हा एक स्वतंत्र विषयच आहे! पण खरा प्रकार तसा नाहीं. मुलांची अवलोकनशक्ति वाढविणें, त्यांच्या बुद्धीच्या निरनिराळ्या अंगांचा पूर्ण विकास करणें, त्यांच्या त्यांच्या हाताला कौशल्याचें काम करण्याचें वळण लावणें त्यांच्या मनावर उद्योगाचा महिमा ठसविणें वगैरे उद्देश साधण्याचें किंडरगार्टन हें एक साधन आहे. या किंडरगार्टनच्या साह्यानें हवा तो विषय शिकवितां आला पाहिजे. उद्देश स्तुत्य आहे खरा, पण आमच्या शाळांत जेथें दरमहा सादिलाचा खर्च दरमहा आठ बारा आणे ठेवण्याइतकी उदार नेमणूक असते, तेथें किंडरगार्टनचें सामान त्या शाळेनें कसें घ्यावयाचें? जेथें जेमतेम पोटं भरण्याइतका शिक्षकांचा भक्कम पगार असतो तेथें मुलांशीं खेळतांना शिक्षकानें उसनाच उल्हास आणावयाचा कीं नाहीं याचा कोणी विचार करीत नाहीं. असो. अलाहाबादेस भरलेल्या किंडर गार्टन प्रदर्शनांत ज्या मुलांच्या हस्तकौशल्याचीं कामें ठेवण्यांत आलीं होतीं तीं सगळीं युरोपियन शाळांतलीं मुलें होतीं. या प्रदर्शनाचे वेळीं मुलांनीं निरनिराळे खेळ खेळून व गाणीं ह्मणून दाखविलीं. प्रदर्शनांत पुढील वस्तु उत्तम रीतीनें मांडल्या होत्या व त्या सगळ्या मुलांनीं गोळा केलेल्या होत्या. फुलें, फुलझाडें, भावल्या, उत्तम रीतीनें शृंगारलेलीं घरकुलें, शिवण कामाचे नमुने, मासे, पक्ष्यांचीं घरटीं, वगैरे. प्रदर्शनाचे मागून कान्फरन्स झालें. त्यांत किंडरगार्टनची खरी कल्पना देणारीं अनेक भाषणें झालीं. त्यांची हकीकत वाचली ह्मणजे एक गोष्ट मनावर पूर्णपणें बिंबते ती ही कीं आमची गरीबी आमच्या मुलांच्या शिक्षणाच्या आड तर येतेच येते, पण आमच्या शिक्षकांचें अज्ञान ही त्यांत भर टाकतें.

---

## होमरूल लीग.

ता० १७ दिसेंबरचा 'कॉमनवील' पत्राचा अंक विशेष महत्त्वाचा होता. हातीं घेतलेल्या कार्यांत सगळ तनमनधन खर्च करून पुनः निष्काम सेवा कशी करावी याचें उदाहरण पाहावयाचें असेल तर तें मिसेस आनी बिझांट यांचें आहे. त्यांनीं या अंकांत होमरूल लीगच्या मुंबईच्या बैठकीला हजर रहण्याविषयीं जें विनंतिपत्र काढलें आहे तें वाचण्यासारखें आहे, विशेषतः त्या पत्राच्या खालीं त्यांनीं स्वतः विषयीं चार ओळी लिहिल्या आहेत त्या फार महत्त्वाच्या व मनाला अत्यंत चटका लावणाऱ्या आहेत. त्यांत त्या ह्मणतात कीं या विनंतिपत्रावर सह्या करणारे (आणि यांत मि. दादाभाई नवरोजी, मि. जिना, सर राशबिहारी घोष, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, भूपेंद्रनाथ बोस, जे. चौधरी, नीलरतन सरकार, सर सुब्रह्मण्यम् आयर, मी. सुब्रह्मण्यम् आयर, मदन मोहन मालवीय, डॉ० सप्रु, डॉ० रणजितसिंग, सय्यद नबी उल्ला, ना. मझरुल हक, सच्चिदानंद सिंह, मोरोपंत जोशी, सरोजिनी नायडू, डॉ० गौर, यांसारख्या गृहस्थांच्या सह्या आहेत) यांना आपल्या देशाच्या हितासंबंधींच्या प्रश्नावर बोलण्याचा जसा अधिकार आहे, तसा मला नाहीं. मी दुर्दैवानें परदेशी आहे, आणि त्यांचा निर्णय मला ऐकला पाहिजे. तथापि माझी कल्पना त्यांना पसंत पडून मि. ह्यूम प्रमाणें त्यांनीं माझ्या सेवेचा स्वीकार केला, तर मी कृतज्ञ राहीन. त्यांचें मत माझ्या योजनेला प्रतिकूल पडलें, तरी मी नाद सोडणार नाहीं. मी त्यासाठीं एका व्यक्तीला शक्य तेवढें प्रयत्न वाणीनें व लेखणीनें

करण्यास सोडणार नाहीं, व कांग्रेस माझे-कडून मी सेवा घेईल ती मी करीत राहीन.' या थोड्याशाच ओळींत मिसेस बिझांटबाईंचा स्वभाव किती छानदार रीतीनें प्रतिबिंबित झाला आहे! त्यांचा नम्रपणा, देशहिताविषयींची कळकळ, या भारतभूमीवरलें प्रेम, दृढनिश्चय, करारी-पणा 'निःस्वार्थबुद्धि, लीनता, इ. गुणांचें एकवटलेलें चित्र जर कोठें पहावयाचें असेल तर तें या वाक्यांत आहे. अशा बाईच्या गुणांचें चीज कांग्रेस करणार कीं 'आळ-शावर गंगा आली तरी आळशी पळाला दूर' ही कव्युक्ति सार्थ करणार हें आतां पहावयाचें आहे.

---

## देशकार्याचा आठवडा

चालू आठवड्यांत मुंबईस इतक्या परिषदा व सभा व्हावयाच्या आहेत कीं त्यांतल्या एक चतुर्थांश सभांना नेटानें कोणी बसूं म्हणेल तर त्याच्या अंगीं अमानुषच शक्ति पाहिजे. एखादा नवीनच विलायतेहून आलेला मनुष्य यावेळीं मुंबईस बोटींतून उतरला, तर त्याला जिकडे तिकडे प्रतिनिधि, व्हालंटियर, रिसेपशन कमिट्या, आणि ह्यांडबिलांची रास पाहून देशकार्यासाठीं झटणारीं इतकीं माणसें हिंदुस्थानांत असतां हिंदुस्थानाची अशी दशा कां हें खरोखर मोठें गूढ येऊन पडेल. आम्ही देशकार्यासाठीं वर्षांतला येवढा एकच आठवडा आणि तो ही अंगमेहनत करून देशकार्य संपादण्यासाठीं नाहीं, तर परस्परां-च्या भेटीचा लाभ घेऊन परस्परांना आपल्या वक्तृत्वाचा लाभ देण्यासाठीं, देशाभिमान, लोककल्याण, लोकसेवा, इ. मोठमोठ्या सामासिक शब्दांची उजळणी करण्यासाठीं, तमासगिरीसाठीं, निरनिराळ्या प्रांतांतले देखावे पाहण्यासाठीं, किंवा या सारख्या अन्य का-र्यासाठीं काढून ठेविला आहे, बाकीचे वर्षां-तले एकावन आठवडे आम्ही स्वतःच्या उद्योगधंद्यासाठीं, स्वार्थपर वृत्तीसाठीं, किंवा चकाट्या पिटण्यासाठीं राखून ठेविले आहेत हें त्या बिचाऱ्याला काय माहीत! असो. आहे या स्थितींत सुद्धां या चळवळीपासून थोडा फार हिंदुस्थानचा लाभच आहे असें म्हटलें पाहिजे. प्रत्यक्ष काशीला न जातां आलें तरी निदान तोंडानें तरी काशीयात्रेला जाईन म्हणत राहावें. तसें स्वतः देशकार्य न करतां आलें तरी देशकार्य करण्याचे मार्ग अशा सभांना जाण्यापासून सुचतात. या निरनिराळ्या परिषदांसाठीं दूरदूरच्या प्रांतांतून कमींत कमी पंनास हजार तरी लोक मुंबईस येतील. यांत पंनास जणांना जरी खऱ्या देशसेवेची प्रेरणा झाली तरी पुष्कळ आहे. या दृष्टीनेंच अशा सभा व परिषदा यां-च्याकडे पाहिलें पाहिजे.

---

## युद्धाचा वर्षे अखेर आढावा.

१९१५ साल संपत आलें असल्यामुळे या वर्षाचा अखेर युद्धाचा आढावा घेण्यास ही चांगली संधी आहे. प्रस्तुतचें युद्ध सुरू होऊन सुमारें १७ महिने झाले. पण अजून ही युद्धाचा अंत दृष्टीच्या टप्प्यांत आलेला नाहीं. येवढ्या अवकाशांत सर्व युद्धक्षेत्रांत परिवर्तन झालें आहे. रशियांत चर खणून जर्मन लोक बसले आहेत. पण तेथें लढा-ईला जोर नाहीं. पश्चिम रणक्षेत्रांत फ्लांडर्स-मध्यें कधीं कधीं सुरुंग, तोफा, व बांब उडतात. पण युद्धांत जयपराजयाचा निर्णय करणारी अशी एकही घटना अलीकडे घड-लेली नाहीं. इटालियन रणक्षेत्राची स्थिति तर विचित्रच आहे. इटालीला दोस्त राष्ट्रांना मिळून सुमारें नऊ महिने झाले, पण हरदासी तद्दाप्रमाणें 'दो दीसां कोस चाले' या मानानें त्यांची प्रगति आहे. अजून आयसांजो नदीच्या पार ते झाले नाहींत, किंवा आस्ट्रियाचें एकही महत्त्वाचें ठिकाण त्यानें घेतलें नाहीं. इंग्लंडसारखे इटालियन लोक नेटानें लढते तर आस्ट्रियनच्या नाकीं दम त्यांना आणतां आला असता. हल्लीं सर्वांत अतिशय महत्त्वाचें रणक्षेत्र म्हणजे बाल्कनराष्ट्रांमधला सर्वियाच्या राज्यामोंवता-लचा प्रदेश हें आहे. सर्व्हियन लोकांच्या शूरत्वाबद्दल आतां कोणास शंका राहिली नाहीं. जोंपर्यंत एकट्या आस्ट्रियाशीं त्याला दोन हात करावयाचे होते तेव्हां ते बहादर असे शूरत्वानें लढले कीं इतिहासांत त्यांचें नांव शौर्याबद्दल चिरकाल राहील. पण जेव्हां जर्मनी, बल्गेरिया व आस्ट्रिया यांचें त्रिकूट एकदम त्याच्यावर तुटून पडलें, तेव्हां त्याचा निरुपाय झाला, व इंग्लंड व फ्रान्स यांचा-पाशीं साह्यार्थ त्याला याचना करावी लागली. या दोघांनीं त्याला मदत पाठविली खरी, पण तिचा सर्व्हियाला उपयोग फार थोडा झाला. मि. बॉनरलॉ यांनीं ता. १८ नोव्हेंबर रोजीं कॉमन्स सभेंत ही गोष्ट उघडपणें कबूल करून अतिशय खेद प्रदर्शित केला कीं ब्रिटिशांनीं या युद्धांत कितीही यश मिळविलें तरी बेल्जयम व सर्विया यांच्या सारखीं छोटीं छोटीं पण पाणीदार राष्ट्रें इंग्लंडचे दोस्त असतां शत्रूनीं त्यांना बेचिराख करून सोडलें ही गोष्ट इंग्लंड कधीं विसरणार नाहीं, व त्यामुळें जय मिळविला तरी त्या जया-बद्दल त्याला कधीं अभिमान ही वाटणार नाहीं. इतकेंच नाहीं तर खुद्द इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांनीं सर्वियाच्या साह्यार्थ पाठविलेल्या सैन्याला स्वतःच्या रक्षणासाठीं ग्रीसचा व सार्वियन लोकांना अल्बानियाचा आश्रय करावा लागला. ब्रिटिश फौजेंतल्या आयरिश लोकांनीं मागें हटण्यांत मोठी विर-ता दाखविली असें वर्णन वाचून लोकांना मोठें आश्चर्य वाटते आणि मागें हटण्यांत काय विरता आहे असा प्रश्न ते करतात. पण ते हें ध्यानांत घेत नाहींत का मागें हटणारें सैन्यानें जर धीरता, शौर्य आणि प्रसंगा-वधान हीं दाखविलीं नसतीं, आणि धाव-रून पळ काढला असता, तर शत्रूनीं त्याचा पाठलाग करून त्यांच्यांतला एक ही मनुष्य जिवंत ठेविला नसता. आयरिश फौजेवर यावेळीं सोंपविलेली कामगिरी फार बिकट होती. हे लोक थोडे असतां त्यांनीं आपल्या चौपट किंबहुना दसपट शत्रुसंख्येशीं व तोफांशीं टक्कर देऊन सगळा भडिमार आपल्या तोंडावर घेतला, आणि मागच्या फौजेचें रक्षण केलें ही खरोखर असामान्य वीरता म्हटली पाहिजे. पांचवें रणक्षेत्र म्हणजे गयालीपोली मधलें. या ठिकाणच्या सेनापतीचे जागीं सर चार्लस मनरो हे नेमले गेले होते व लॉर्ड ल्यान्सडौन यांनीं पार्लमेंटांत जें भाषण केलें त्यावरून पाहतां सर चार्ल-सनें तेथें केलेले वर्तनाबद्दल लष्करी अधि-काऱ्यामध्यें वाद उत्पन्न झाला असला पाहिजे. लार्ड किचनर यांचा तिकडे जा-ण्यांत हा एक हेतु असावा असें दिसतें. लॉर्ड किचनर यांचें मत अद्याप बाहेर आलें नाहीं, पण विलायतेंतल्या वर्तमानप-त्रांच्या टीकेवरून तिकडे ब्रिटिश फौजेवर मोठा कठीण प्रसंग गुदरला असावा असें अनुमान करतां येतें. त्या ठिकाणीं ब्रिटिश फौजेंत आस्ट्रेलियन व न्यूझीलंडरांची फौज आहे. त्या प्रदेशांत बर्फ फार पडल्यामुळें या फौजेला फार हालांत दिवस काढावे लागले. कारण या लोकांना त्यांच्या देशांत बर्फाची कधीं संवय नाहीं. शिवाय जल-मार्गानें किंवा स्थलमार्गानें हे लोक फारसे दूर गेले नाहींत. कांस्टांटिनोपलवर स्थल-मार्गानें जाण्यास या लोकांना सवड मिळती तर बरेंच कार्य झालें असतें. पण बल्गे-रिया शत्रूला मिळाल्यामुळें तो संभव नाहींसा झाला. सध्याचा मोठा प्रश्न म्हणजे ग्रीसची तटस्थवृत्ति हा आहे. बल्गेरियन फौज ग्रीसच्या हद्दीला येऊन भिडली आहे. ती ग्रीसमध्यें घुसून दोस्त राष्ट्रांच्या सैन्यावर तुटून पडते कीं काय हें आतां पहावयाचें आहे. बल्गेरियन पुढें सरकले तर ग्रीसची फौज त्यांच्याशीं लढेल असें कित्येकांचें म्हणणें आहे. कित्येकांचा तर्क निराळा आहे. सहावें रणक्षेत्र आफ्रिकेंतला क्यामारून प्रदेश व सातवें मेसापोटेमिया आहे. आनंदाची गोष्ट आहे कीं या दोन्ही प्रदेशांत शत्रूला वर मान करण्यास जागा नाहीं. थोडेच दिवसांत खलीफांची राजधानी जे बगदाद शहर त्याच्या झेंड्यावर ब्रिटिश सिंह नाचूं लागेल असा संभव आहे. या ठिकाणच्या युद्धाचा भार पुष्कळसा हिंदुस्थानसरकारावर असल्यामुळें त्यांत ब्रिटिशांना मिळालेला यशाचा वाटा हिंदुस्थानाकडेस येतो. या प्रदेशांतील युद्धाचा-संबंध इराणच्या आखाताशीं येतो. या युद्धक्षे-त्रांत कांहीं गडबड थोड्या दिवसांपूर्वी झाली होती. पण रशियानें इराणच्या सरकारच्या अनुकूलतेनें शत्रूची डाळ तेथें शिजूं दिली नाहीं, व आतां येथें शत्रू वर डोकें काढील असा संभव फारसा दिसत नाहीं. निदान तूर्त तरी असा संभव फार कमी आहे. बार्लिनपासून कांस्टांटिनोपलपर्यंतचा रस्ता शत्रूला खुला झाला आहे. यावरून लोकांचा तर्क आहे कीं आतां शत्रूचा मोर्चा ईजिप्तका-डे वळेल. काय व्हावयाचें असेल तें होईल. पण या युद्धाचा अखेरचा निकाल पूर्व रण-क्षेत्रांत न होतां पश्चिम रणक्षेत्रांतच होईल असें तज्ज्ञांचें मत आहे. आतां सर्वांची भिस्त येत्या वसंतऋतूवर आहे. पहावें जर्मन लोकां-ना त्यावेळीं दोस्त राष्ट्रें ऱ्हाईन नदीच्या पार हाकून देतात कीं काय घडतें तें.

---

## योग्य सूचना.

प्रस्तुतच्या युद्धांत सरकारला इतका प्रचंड खर्च करावा लागत आहे कीं त्यामुळें शिक्षण, आरोग्य, व शेतीची सुधारणा यां-सारख्या अत्यंत लोकोपयोगी कामाकडे खर्च करतांना सरकारला हात आखडता घ्यावा भाग झाल्यास त्याबद्दल सरकारवर कंजूषपणाचा आरोप कोणी करील असें आम्हांस वाटत नाहीं, व कोणीं केल्यास तो योग्य ही होणार नाहीं. अशावेळीं लोकांनीं या बाबतींत सरकारच्या डोक्यावरचें ओझें हलकें करण्यास पुढें येणें हें त्यांचें कर्तव्य आहे असें प्रत्येक नागरिकास खास वाटेल; तथापि पैशाच्या अडचणीमुळें या तिन्ही सुधारणा मागें पडाव्या कोणत्याही दृष्टीनें इष्ट नाहीं. अशा अडचणींत पुण्याच्या डि. कां. कमिटीनें व डेक्कन सभेनें सुच-विलेला उपाय खरोखर यंदाच्या कांग्रेसनें विचार करण्यासारखा आहे. या संस्थांनीं यंदाच्या कांग्रेसला असा ठराव करण्याविष-यीं सुचविलें आहे कीं या तिन्ही सुधारणा करण्यासाठीं अबकारी उत्पन्नावर रुपयास एक आणा या मानानें सेस (कर) ठेवण्याची सरकारनें डिस्ट्रिक्ट बोर्डाला परवानगी द्यावी. परलोकवासी ना. गोखले यांनीं आपल्या शिक्षण विषयक बिलांत नुसत्या शिक्षणा-संबंधानें हा उपाय सुचविलेला होता. पण आरोग्य व कृषिकर्मसुधारणा या ही तितक्याच महत्त्वाच्या बाबी असल्यामुळें सदर संस्थांनीं बाकीच्या दोन बाबींचा ही अंतर्भाव करून हा उपाय योग्य वेळीं कांग्रेसपुढें मांडला ही फार उत्तम गोष्ट आहे. आम्हांस खात्री आहे कीं यंदाचे कांग्रेसपुढें या गोष्टीचा विचार होऊन पुण्याच्या संस्थांनीं सुचवि-लेला ठराव एकमताने पास होऊन सरका-रकडे जाईल.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—थंडी बरीच पडूं लागली आहे; प्लेग अजिबात नाहींसा झाला आहे. दुसरी रोगराई वगैरे कांहीं नाहीं.

रा. पी. डी. किर्ल्याम डि. सु. पोलीस बिलासपूर यांस २० डिसेंबरपासून ३ महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. सी. ई. मिडल्टन स्टेवर्ट, आसि-स्टंट डिस्ट्रिक्ट सुपरिंटेन्डेट पोलीस बिलासपूर यांस रा. पी. डी. किर्ल्याम यांचे जागेवर तात्पुरतें नेमलें आहे.

रा. रा. केशव रघुनाथ चांदोरकर तहसि-लदार हर्दा यांस निमाड जिल्ह्यांत आठव्या ग्रेडचे ए. अ. कमिशनर नेमण्यांत आले आहे.

रा. रा. केशव रघुनाथ चांदोरकर यांनीं जागेचा चार्ज घेतल्यानंतर रा. सयद मीर अली ए. अ. कमिशनर निमार, हे राय-पुरास जागेचा चार्ज घेण्यास जातील.

रा. रा. ए. एच. बेली. डिस्ट्रिक्ट जज्ज हुशंगाबाद यांस मानेवारीच्या १ ल्या तारखे-पासून ए. अ. कमिशनर नरसिंगपूर या जागेवर नेमलें आहे.

रा. रा. ए. एच बेली यांनीं कामाचा चार्ज घेतल्यानंतर रा. शिवप्रसाद ए. अ. कमिशनर नरसिंगपूर, हे रायपूरास बदलून जातील.

ऑ. सर बेंजामीन राबर्टसन चीफ कमि-शनर साहेब हे लेडी रॉबर्टसन, चीफ सेक्रेट-री मि. स्लोकॉक, पर्सनल असिस्टंट मि. वॉटसन यांसह गेल्या शनिवारीं राजनांदगांव मुक्कामीं गेले.

मुंबई मुक्कामीं औद्योगिक परिषदेची ११ वी बैठक मरीन लाइन्स वरील उभारलेल्या कांग्रेच्या भव्य मडपांत ता. २४ रोजीं सुरू झाली. सर दिनशा पेटट स्वागत कमिटीचे अध्यक्ष असून सर दोराब टाटा हे परिषदेचे अध्यक्ष आहेत. दरभंग्याचे महाराज. इंदोरचे महाराज, सर प्रभाशंकर पट्टणी, सर विठ्ठलदास ठाकरसी, ऑ. डी. ई. वाच्छा, ऑ. लल्लूभाई सामल्दास ऑ. मुधोळकर, ऑ. मनमोहनदास रामजी, डॉ स्टान्ले रीड, मि. सी. ए. टॉमस, डॉ मॅन प्रभृती सर्व औद्योगिक बाबतींत पुढाकार घेणारे लोक होते.

## आकोला बाजार भाव.

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें | २४॥। |
| चांदी | ७८ ते ७९ |
| नवस | १३० |
| जवारी नवी | ७० ते ७२ |
| गहूं काठे | ७। ते ७।= |
| गहूं खांडवा पीवडा | ५। ते ५।– |
| चणे | ५-५॥ |
| तुरी | ४॥ |
| उडीद | ५॥०॥ |
| मूग | ५।॥– |
| टोळी मोहाचे बीज | १२॥. |
| तेल | ५॥= |
| सरकी १० | १०। |
| तुप | १२॥ |
| कापूस | ६४ |
| रुई आकोला जीन | ७७॥ |

## नोटीस

प्लेगमुळें बंद असलेलें हायस्कूल ता. १५ दिसेंबर १९१५ बुधवार रोजीं सुरू झालें.

S. N. Dange
High School
Akola

25 Dec 1915
N, N. 424


# येणार ! येणार !!

मोठ्या मौजेची रात्र.

ता. १ जानेवारी १९१६

प्रो० शंकरराव यांची

# कार्लेकर ग्रँड सर्कस.

## जागा—आकोला टेंपल गाडन.

या सर्कसींतः—सहा आफ्रीकन सिंह, ४ बंगाली वाघ, चित्ते, आस्वलें, माकडें, कुत्रीं, कांगेरू, गाढव, बैल, घोडे, हत्ती, म्हैस, बकरें, पोपट, वगैरे जनावरांची कोणत्याही सर्कसींत न झालेलीं कामें फारच प्रेक्षणीय करून दाखविण्यांत येतील.

१ जगामध्यें पहिल्या प्रथम जंगली जनावरांकडून इतर जनावराबरोबर वैरभाव सोडून स्नेहाप्रमाण कामें प्रो० शंकरराव हे स्वतः खालीं लिहिल्याप्रमाणें करून दाखवितील.

**२ सत्ययुगाचा देखावा. सिंह, वाघ, म्हैस, बैल, बकरा, घोडा, हीं जनावरें एके ठिकाणीं मोकळें बसून भोजन करतील.**

सिंह वाघ आस्वलें हीं एका चक्रांत बसून तें चक्र घोडा फिरवील.

३ चिता मनुष्याप्रमाणें पळत्या घोड्यावर स्वारी करील हत्ती, आस्वल, माकडें आणि पोपट हीं मनुष्याप्रमाणें सायकल चालवितील व अकलेचे खंदक गर्दभराज (गाढव) हेही सायकल चालवितील. या शिवाय जंगली जनावरें अग्नींतून पळणें, तारेवर चालणें वगैरे बरीच कामें अप्रतीम करून दाखवतील.

**४ महाभारतांतील कर्ण व अर्जुन यांची धनुष्यबाणाची लढाई पोपट करून दाखवितील**

**इंग्लंडमधील नावाजलेली ॲक्टर्स लोकांचीं कामें .**

२ आक्रोब्याटची युरोपियन जीनकीन्स फ्यामिली कसरतीचे आणि हास्यकारक विदुषकाचीं वगैरे कामें फारच प्रेक्षणीय करून दाखवितील.

६ रशीयन, स्पॅनिश, इटालीयन वगैरे तऱ्हेची नाचाचीं कामें युरोपियन मुली आणि मुलें करून दाखवितील. डन, विल्ली, जुई, फ्रेडी, हे घोड्यावरील रायडींगचे इंग्लंड प्रमाणें हरएक तऱ्हेची कसरतीची कामें करून दाखवितील. मि० डायल हे जगलीनचीं कामें करून दाखवितील.

७ मि० ( कोंड्या, कना, कनारी, कीटन, केरा ) आणि लहान मुलें हे हारीझान्टलबार, जपानी बांक, सिडी, सायकल ट्रक जमिनीवर सायकलचें काम, सिंगल झुला वगैरे फारच विलक्षण तऱ्हेची कामें करून दाखवितील.

## तिकिटांचे दर.

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व .... .... .... | ३ रुपये | ग्यालरी .... .... | -।- आणे |
| फर्स्ट क्लास .... .... | २ रुपये | कुलीन स्त्रियां करितां | |
| सेकंड क्लास .... .... | १ रुपया | स्पेशल जागा .... .... | -॥- आणे |
| कारपेट ग्यालरी .... .... | -॥ आणे | | |

दरवाजे ( स्टँ टा. ८ वाजतां उघडून ९॥ वाजतां खेळास सुरुवात होईल

**सूचनाः**— गैरवर्तन करणारास तिकीट परत न देतां बाहेर घालविलें जाईल. एकाचे तिकीट दुसऱ्यास चालणार नाहीं. ग्यालरी भरल्यास जामिनीवर बसावें लागेल.

PROF. SHANKER RAO, SOLE PROPRIETOR — J. JENKINS, MANAGER — M J. RATNAM, BUSINESS MANAGER


## मध्यप्रांत वार-- रिलीफ असोसियेशन.

(वऱ्हाड शाखेचा नोवेंबर महिन्याबद्दल हिशेब.)

वरील संस्थेचे वऱ्हाड शाखेचे आकडे आमचेकडे प्रासिद्धीकरितां आले आहत. त्यांवरून पाहतां जमेचे बाजूस जिल्हेवारीनें:—

| | उमरावती. | आकोला. | बुलडाणा. | यवतमाळ. |
|---|---|---|---|---|
| मागील शिल्लक. | ६७५-५-० | २७१७६-१३-० | ८९२-२-१० | ४२७-१०-१ |
| चालूं महिन्यांत वसूल आलेलीं रकम | २८५-९-० | ८०५-२-३ | ५४८-४-० | ४४७-८-० |
| सैन्यास सुखोपयोगीं सामान पुरविण्यासाठीं. | २६१-११-६ | १२३२-८-० | २३१-२-० | ३-०-० |
| कलकत्ता यंगमेन ख्रिश्चन असोशियेशन करितां. | १००-०-० | ०-०-० | ०-०-० | ०-०-० |
| बेल्जम रिलीफ फंडाकरितां | ५६-०-० | ०-०-० | ०-०-० | ०-०-० |
| सिमला येथील सेंट जान ॲंब्युलन्स असोशियेशन करितां. | ७५-०-० | १०००-०-० | ०-०-० | + ५००-१३-२ |
| मुंबई आरमारी रिलीफ फंडा करितां. | ०-०-० | ५००-०-० | ०-०-० | ०-०-० |
| आफिस खर्च. | ०-०-० | ४८-११-६ | ०-०-० | ०-०-० |
| महिना अखेर शिल्लक. | ४६८-२-६ | २५१३०-११-९ | १२०९-४-१० | ३७१-४-११ |

× सदरहु रकम केडी राबर्टसन मोटार ॲंब्युलन्स फंडाकडे दिली आहे.

## कापूस–तक्ता–साप्ताहिक– ११ डिसेंबर १९१५ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. ता. १८-१२-१५ पर्यंतचा आठवडा | कापसाच्या गाड्यांची संख्या. १।९।१५ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. ता. १८।१२।१५ पर्यंतचा आठवडा | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. १।९।१५ पासून |
|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | १९,४२२ | ८३,७०२ | ५४७ | १,७३२ |
| | गुदस्त | २,४९० | १९,६२८ | १२२ | ४६१ |
| | तिगस्त | ११,४७९ | ५१,०४६ | ३२१½ | २,२२० |
| यवतमाळ | चालूं साल | १,६९४ | १६,१७२ | १,१५३ | ३७०८ |
| | गुदस्त | ९०६ | ८,७९२ | ३५८ | १००६ |
| | तिगस्त | ३,५७० | २२,२७६ | ३१४ | १,४९४ |
| आकोला | चाल साल | १३,१३१ | ९९,४२८ | ३९५ | १३०४ |
| | गुदस्त | ३,२३८ | २५,८४२ | १४७ | [illegible] |
| | तिगस्त | १४,९३८ | ७४,६१५ | ८१६ | २,८४३ |
| बुलडाणा | चालूं साल | १२,५२४ | ८५,५३९ | ५१ | ३७२ |
| | गुदस्त | ४,५३७ | २५,४१३ | ६५ | २११ |
| | तिगस्त | १२,९१९ | ६२,१५२ | ९३९ | २,०६८½ |
| एकूण वऱ्हाड | चालूं साल | ४२,७७१ | २८४८४१ | २,११६ | ७,११६ |
| | गुदस्त | ११,१७१ | ७९,६७५ | १९२ | २,२०० |
| | तिगस्त | ४२,९१६ | २१००८९ | २,३९०½ | ८,६२५½ |

टीप— चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आकडे १९ डिसेंबर १९१४ व २० डिसेंबर १९१३ पावेतों होते.

सी. जी. लेफ्टवीच
डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर इंडस्ट्रीज मध्यप्रांत

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ

**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

**पत्ता** — दयाल्दास लाल्दास आ. कं. जंगी स्टोअर बऱ्हाणपूर

नो. नं. ४२०



आतिशय पौष्टिक व स्तंभक

## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. कि० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बॉ. अ पत्रक सोबत.

सकळकळे ॲन्ड सन्स
शहर आकोला.


## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible.

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.


सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना.

**ए. जे. ह्यात्रे आणि सन सुगंधी.**

ठि:-पांजर पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! **ओटो सुरंगी** ! एकच भाव! !

**आमचेकडे मिळणारा माल**

ओटो सुरंगी.

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुल्हिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ १ रु. १॥ ८ पर्यंत अरगजा व कितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडाक, मुत्रांची लाला, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषधें व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकातिमान ...विल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ता:—मु० मुर्डी, पो०. हर्णें, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० ३६९



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65 269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607, | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | ,72,46,0 | 4,96,8650 |

*Influential and active agents wanted. Terms liberal.*

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown.
Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary.
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

नोटीस.

मुलूक अमानी हैद्राबाद मुलकी कायद्यांतील कलम ७८ (८) प्रमाणें जमीनदारानें कुळावर सारा वाढविण्या बद्दल बजावणीचें नोटिसीचा नमुना.

नोटीस बेशभी गोविंदराव व कान्हूजी काकडे जात कुणबी राहणार मौजे राहरी प्रगणें राळेगांव तालुके केळापूर जिल्हे वणी यांस.:—

खालीं सही करणार यांजकडून.

मी या लेखावरून नोटीस देतों कीं मौजे तेजनी प्र० राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी हा गांव आमचा इजारा असून येथील शेतें

| सर्वे नंबर. | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| ३८ | २८८३८ | ८९ |
| ३९ | १७०२९ | |
| ४३ | २००२२ | |

हीं शेतें हल्लीं तुह्मांस माझे कूळ ह्मणून तुमच्या कबज्यांत आहेत त्या शेताचा सारा येत्या शतकीचे साल सुरूं होण्या पासून ह्मणजे तारीख १ एप्रील सन १९०३ पासून रुपये ८९ चे रुपये १४० प्रमाणें साळीना वाढविण्याचा माझा इरादा आहे सबब तुह्मी येत्या १ ली एप्रील सन १९०३ पासुन वाढविलेला सारा कबूल केला पाहिजे व कबुलायत लिहून दिली पाहिजे. वाढविलेला सारा ता. १ ली एप्रील सन १९०३ पासून तुह्मांस कबूल करण्याचें नसल्यास वर लिहिलेली जमीन ता. ३१ मार्च सन १९०३ रोजीं संपणाऱ्या चालू साल अखेरीस सोडून आमचे कबज्यांत द्यावी. ता. ८।११।०२ इसवी.

सही.

दवलतराव सदाशिव पाटील इनारदार
तर्फे रामकृष्ण वासुदेव.

---

नोटीस.

मुलूक अमानी हैदराबाद मुलकी कायद्यांतील कलम ७८ (८) प्रमाणें जमीनदारानें कुळावर सारा वाढविणें बद्दल बजावणीचे नोटिशीचा

नमुना

नोटीस बेशमी बालाजी वल्लद जंगलाजी बुटे जात कुणबी राहणार मौजे तेजनी प्रगणें राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी यांस

खालीं सही करणार याजकडून.:—

मी तुह्मांस या लेखावरून नोटीस देतों कीं मौजे तेजनी प्रगणें राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी हा गांव आमचा इजारा असून येथील शेतें

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| १७ | २९०३० | ६३ |
| २२ | २८८१२ | |

हीं शेतें हल्लीं तुह्मांस माझे कूळ ह्मणून तुमच्या कबज्यांत आहेत त्या शेताचा सारा येत्या शतकीचें साल सुरू होण्यापासून ह्मणजे तारीख १ ली एप्रील सन १९०३ पासून रुपये ६३ चे रुपये ९५ प्रमाणें साळीना वाढविण्याचा माझा इरादा आहे सबब तुह्मी येत्या १ ली एप्रील सन १९०३ पासून वाढविलेला सारा देण्याचे कबूल केले पाहिजे व कबुलायत लिहून दिली पाहिजे. वाढविलेला सारा ता० १ एप्रील सन १९०३पासून तुह्मांस कबूल करण्याचे नसल्यास वर लिहिलेली जमीन ता० ३१ मार्च सन १९०३ रोजीं संपणाऱ्या चालू साल अखेरीस सोडून आमचे कबज्यांत द्यावी. ता० ८ माहे ११ सन १९०२ इसवी.

सही

दवलतराव सदाशिव पाटील इनारदार
तर्फे रामकृष्ण वासुदेव.

---

नोटीस

रा० रा० रामनाथ बचुलाल हेडकानस्टेबल बारशीटाकळी यांस :—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं विद्यमान शेंबेकर साहेब सबूजज्ज, आकोला यांच्या फायलावरील दिवाणी मेकदमा नंबर ४९० सन १९०२ चा यांत तारीख ४।११।०२ रोजीं वादी हरलाल त्रिंबकसा साहू दुकान अलेगांव यांस प्रतिवादी नं० १ चे तुह्मी व प्रतिवादी नं० २ चा मी या दोघांविरुद्ध रुपये ९३०१४ व खर्च ११८६ मिळून रु०१०५०४ चा हुकुमनामा झाला आहे. या हुकुमनाम्याच्या रकमेचा बोजा गह्मणपाल अलेगांवचीं गोंड मंडळीचीं शेतें जीं तुह्मी मला ५०० रुपयांत खरिदी दिली आहेत त्याजवर ठेवण्यात आला आहे. खरिदीच्या रकमे पैकीं १५० रुपये मला देणें आहेत व त्या रकमेचा मी मुझाला दस्तऐवज २१।१।०२ रोजीं करून दिलेला आहे. खरिदी खता प्रमाणें हा गह्मणाचा बोजा तुह्मावर असून हुकुमनाम्याची रकम तुह्मी अजून चुकती दिली नाहीं. ह्मणून तुह्मास कळवितो कीं सदहू खरिदीच्या मालावरील हुकुमनाम्याची रकम १०५८४ मला देणें आहे ती १५० रुपयाच्या दस्तऐवजांतून कमी करून हुकुमनाम्याच्या मालावरील बोजा दूर केला आहे.

या रकमे शिवाय तुह्मा कडून खरेदीच्या नोंदणीच्या दंडाबद्दल रु०१२८८ वेगे आहेत. एकूण रुपये ११७८१२ वजा जातां बाकीची रकम व्याजांसुद्धा तुह्मास देण्यासाठीं रा० रा० अवधूत शिवराम पाटील राहणार अलेगांव याजपाशीं धरवर ठेविली आहे. ही धरवर ठेवणें तुह्मी रकम घेत नसल्यामुळें जरूर पडलें. आमचा दस्तऐवज परत करावा. तसें न केल्यास या नोटिशीच्या खर्चा सुद्धा सर्व नुकसानी तुह्मास द्यावी लागेल. कळावें, तारीख १४ नोवेंबर १९०२ इ०

सही

गोविंद जैकृष्ण कुळकर्णी अलेगांवकर

---

नोटीस

बेशमी जानकाई मर्द लखु हल्लीं राहणार चंद्रभान पाटील वस्ती बेलूरे यांचे घरीं :—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, माझ्या कडून तुजबद्दल फारकती लेख लिहून देवविला आहे अशाबद्दल गांवांत वदंता आहे. पण मी तुजबद्दल फारकती लिहून दिलेली नाहीं. वरील वदंते प्रमाणें लबाडीनें लिहविलेल्या माझ्या नांवच्या फारकती लेखावरून जर तूं दुसरा गंधर्व करशील किंवा तुला तसें करण्यास जे सल्ला देतील ते सर्व सरकारचे गुन्हेगार होतील. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तूं माझ्या घरीं नांदण्यास यावें असें करण्यास चुकशील तर एकदम सरकार मार्फत तुला ताब्यांत घेतलें जाईल, आणि यासाठीं जी नुकसानी व खर्च होईल तो तुझ्या बापापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १४ ११।०२ इ०

सहीचीनिशाणी

लखु वल्लद सूर्यभान पाटील
राहणार सुकोड ता० आकोला
याचे हातची खुद.

---

नोटीस

बेशमी अमृता वल्लद इरभान राहणार खडकी, शामराव पाटील राहणार सुकोडे, जगू मास्तर राहणार ओकापूर यांस व इतरत्र सर्वत्र लोकांस:—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं गुरुवार तारीख ६ नोवेंबर १९०२ रोजीं शामराव पाटलानें तहशिलींत काम आहे ह्मणून मला आपल्या बरोबर कचेरींत आणिले आणि कांहीं वेळ इकडे तिकडे फिरल्यावर मला सांगितलें कीं डोनद मुक्कामाला २८ तारखेला जावें लागतें. तेथें खडकीचा अमृता पाटील भेटला. त्या दोघांनीं मला सुकोड्याला ओकापुरावरून जाऊ ह्मणून सांगितलें आणि आह्मी तिघेजण बरोबर निघालों. ओकापूरास गेल्यावर तेथें एक कागद अमृता पाटलानें वाचून दाखविला कीं २६ रुपये साऱ्याचे वावरांतील उभें पीक १५० रुपयाला विकलें आणि ह्मणाले कीं यावर साक्ष टाका आणि तशी साक्ष टाकण्याबद्दल अमृतानें एक रुपया आपल्या कंबरेला खोंचला व मला, शामरावला व नाथाला असा एक एक रुपया दिला व जगू मास्तराला ७ रुपये दिले; आणि दोन नवाडे माणसें होतीं त्यांच्याकडून १५० रुपये अमृता पाटलानें घेतले. आणि नंतर शामराव व मी सुगांड्याला गेलो.

हल्लीं गांवांत दोन चार दिवसा पासून गणगुण अशी निघाली आहे कीं एक माझ्या नांवाची खोटी फारकत तयार करण्यांत आलेली आहे व ही गोष्ट मला बरोबर वाटण्यावें कारणही जुळलें. माझी बायको अडीच वर्षापासून आपल्या माहेरीं राहत आहे वरील तीन इसमांस कळवितो कीं तुह्मी हा फारकतीचा बनावटी लेख केला असल्यास तुह्मावर फौजदारींत काम चालविण्याचा इरादा आहे. तुह्मी वरील गणगुणीचा गुप्त मजकूर खोटा आहे. असें लेखी चार पंचा समक्ष कळवावें. नाहीं तर तुह्मावर फौजदारींत अर्ज दाखल करितो. तुह्मास ही आठ दिवसांची समज दिली आहे. कळावें. तारीख १४।११ ।१९०२ इसवी.

सही

लखू वल्लद सूर्यभान इंगळे
राहणार सुकोडे निशाणी खुद्द.

---

नोटीस.

कडतु वल्लद गुणाजी पाटील वस्ती गायगांव तालुके बाळापूर यास:—

नोटीस देणार आंबाई मर्द पुंजाजी पाटील वस्ती गायगांव तालुके बाळापूर इजकडून नोटीस देण्यांत येते कीं गांयगांव तालुके बाळापूर येथील सर्वे नंबर २०६ एकर ११०२३ आकार रुपये १८ चे माझे

नांवें असलेले शेत माझी मुलगी राधा मर्द पंढरी इजला दिले होते पुढे ती मयत झाल्यावर तें शेत माझे नांवें न लागतां पंढरी याचे नांवें लागल्यामुळें त्या कामीं अपील होऊन अखेरीस शेतीचे खातें पुनः माझे नांवें झालेलें आहे या शेतीचे खटपटीसाठीं ह्मणजे पंढरीचे नांवें खातें झालेलें माझे नांवे होण्याबद्दल तुह्मास मी कुलमुखत्यारपत्र या एकच कामापुरते तुह्मास दिलें होते. मुकत्यारपत्रा वरून सर्व काम पुरे तुह्मी केलें. ज्या कामाकरितां मुकत्यारपत्र दिलें तें काम पुरें झालें. मुकत्यारपत्रावरून काम करण्याचें आतां कांहीं राहिलें नाहीं करितां तें मुकत्यारपत्र आज रोजीं रद्द केलें आहे. मुकत्यारपत्रात तुह्मास जे जे अधिकार दिले तेही सर्व निरुपयोगी झाले. यासाठीं या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं आपिलाचे अगर ह्या मुकदम्यासंबंधीं जे कागदपत्र तुमचे पाशीं असतील ते मुकत्यार पत्रासुद्धां परत द्यावें तसें न कराल तर कागद अटकावून ठेवल्याबद्दल तुमच्यावर रीति प्रमाणें काम चालेल तुह्मास आज पासून माझे मुकत्यारपत्र वरून कांहींएक काम करिता येत नाहीं. जर कराल तर त्या कामाचा जबाबदार मी कांहीं नाहीं. शिवाय माझे पश्चात मुखत्यार पत्रावरून काम कराल तरी तुह्मास बाधक होईल. तुमच्यावर इं० पी० को० प्र० फौजदारींत फिर्यादही होईल असे समजून कागद पत्र द्यावे आणि नोटिशीचा जबाब आठ दिवसांत द्यावा तसे न केल्यास सदर लिहिल्या प्रमाणें होईल कळावें तारीख १६।११।०२

सही

आंबाई मर्द पुंजाजी पाटील इचे हातची निशाणी खुद्द बांगडी.

---

दिवाणी दावा नंबर ९ क्लास १८ १९०२

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि ह्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नंबर सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल ज्यडज्य आकोला यांचे कोर्टांत.

गोविंदा वलद गणपती वस्ती बांबर्डे तालुके आकोट—अज्ञान

अर्ज— अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल.

रमाई उर्फ गंगाई मर्द गणपती वस्ती बांबर्डे तालुके आकोट—अर्जदार.

इनें असा अर्ज दिला आहे कीं, मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचें माल मिळकतीचें संरक्षण करण्याकरितां दाखला मिळावा ह्मणोन अर्ज केल्यावरून त्या अर्जाचे चौकशीची तारीख २२ माहे नोवेंबर सन १९०२ इसवी रोजीं अकोलें ठिकाणीं नेमली आहे तर या नोटिशीनें सर्वांत असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय इतर नातलग, मित्र आप्त अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं व सदरी अज्ञानाचे पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्या करितां दाखला आपणास मिळावा असें जे इच्छीत असतील त्यांनीं आमचे समोर सदरी तारखेस येऊन हजर व्हावें. आणि आपणास कां नेमावें अशा बद्दल जे कांहीं दाखले अगर हस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकरितां हजर करावा.

आज तारीख ७ माहे नोवेंबर सन १९०२ इसवी रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस दिली आहे.

V. N. Dandekar
सिव्हिल ज्यडज्य
आकोला

---


## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांत नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यास आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांत हें वॉच वेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस..........४०
१९ ,, हंटिंग..........५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे .......१६०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ..........२६०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह..........२०
१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ..........२२
१९ ,, हाफ हंटिंगचें..........२०
१९ ,, हंटिंगचें ..........२०
१४ ,, रिस्ट वॉच ..........२०

**इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस..........२०
१९ ,, हंटिंग..........२०
१४ ,, रिस्टवॉच..........१०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ..........३०
१४ ,, हंटिंग..........३६
१८ व १९ ,, ओपनफेस..........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ..........३२
१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ..........३६
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३६
१९ ,, हंटिंग ..........४६

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६६-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीवन रास्कोप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई.

---

K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील नगद प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधें विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

टीस
हागीर
नंबर ११३
एकर १०४३९ आ... य २२ या शेताची लागवण आज पर्यंत सरकारी सान्यावर तुह्माकडे आहे. आजपर्यंत आमचे संतोषानें जो सारा घेत होतो त्यापेक्षां आतां आमची इच्छा ज्यास्त घेण्याची असून पुढील साला पासून रुपये ९० घेण्याची इच्छा आहे. तुझे मर्जीस वाटेल तर शेत वहितीस ९० रुपये लागवणीची लेखी कबुलायत देऊन ठेवावें. नाहीं पेक्षां सोडून द्यावें. हें शेत असें घेतल्याबद्दल आह्मांस काय तो जबाब नोटीस पोचल्यापासून २ महिन्यांचे आंत द्यावा. नाहीं तर तुमचा ताबा काढण्या विषयीं तजवीज केली जाऊन फसली १३१३ चे ९० रुपये व नोटिशीचा व इतर खर्च मिळून सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावें ता० ६।१२।०२ इसवी.

सही.

गदाधर श्रीधर जाहागिरदार

दस्तूर खुद्द

---

स्मालकाज दावा नंबर ६६८/०० द. नंबर. १९२८/०२

आक्ट नंबर १४ सन १८८२ इसवी ह्यांतील कलमें ३४७ व ३४८ प्रमाणें रिणकोनें आपणास नादार ठरविण्या विषयीं केलेल्या अर्जाचे हुकूमनाम्याचे मालकास व इतर धनकोस नोटीस.

नादारी किरकोळ मिसल नंबर २ क्लास नंबर १० सन १९०२ इसवी.

विद्यमान रामचंद्र नारायण देशपांडे नादारी कोर्टाचे जड्ज्य आकोला यांचे कोर्टांत.

वादी—पोतीलाल बनसीलाल साहु आगरवाले दुकान आकोले.

प्रतीवादी—माधो वल्लद उदेभान निंभोरेकर राहणार उमरी तालुके अकोले.

हुकूमनाम्याची रक्कम रुपये.

कर्जाची रक्कम

१ मोतीलाल बनसीलाल साहू राहणार आकोले शहर ३४
२ राव बहादूर मुकुंद बाळकृष्ण बुटी दुकान आकोले ३९
३ याकूब डबलरोटीवाले राहणार ताजनापेठ येथें कपड्याची दुकान १४
४ यवसमहमदखा रोहिला हल्लीं आकोले शहरांत किल्याचे पूर्व बाजूंनी राहतो १४
५ सिताराम वल्लद द्वारकानाथ राहणार उमरी ४०
६ सेखजी वल्लद महमदशफी राहणार आकोले १०
७ पांडुरंग गोविंद वकील दुकान आकोले २९
८ सेख उस्मान रोहिला राहणार आकोले शहर ३९

एकूण २०७ रु.

वर लिहिलेले इसम मजकूर यांस. ज्यापेक्षां रिणको माधो वल्लद उदेभान राहणार उमरी यांस हल्लीं कैद केले असून जमीन देऊन मोकळा झाला आहे व त्यानें आपणास नादार ठरविण्या विषयीं लेखी अर्ज केला आहे, त्यापेक्षां तुह्मास त्या अर्जाची नक्कल या सोबत पाठविली आहे व तुह्मास अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, तारीख ९-२-०३ रोजीं दिवसा १० वाजतां अकोले येथें सदहू अर्जाची चौकशी करण्यांत येईल तर तुह्मी हजर व्हावें. आज तारीख ११ दिसेंबर सन १९०२ इसवी रोजीं आमचे सही निशीं व कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

R. N. Deshpande.

जड्ज्य.

---

## वर्तमानसार

चमत्कारिक हुकूम—शाळेंतील विद्यार्थ्यांनीं दोनी हातांनीं कापी बूक लिहिण्यास शिकलें पाहिजे असा हुकूम ओरिसा डिव्हिजनांतील शाळांवरील इनस्पेक्टरानीं केला आहे. कांहीं वाईट गोष्ट दिसत नाहीं.

झोंप येण्यास उपाय— थोडीशी सुंठीची पूड खावी ह्मणजे झोंप चांगली येते असें एका डाक्टरचें मत आहे.

स्त्रियांनो पुरता विचार करा— स्त्रियांना वाजवीपेक्षा फाजील शिक्षण देण्याचा परिणाम काय होतो हे एका गोऱ्या डाक्टरानें प्रसिद्ध केलेलें आहे. अभ्यासाचा बोजा पुरुषा प्रमाणें ज्या स्त्रियांवर पडलेला आहे अशा ६०० स्त्रियांचीं डोकीं त्यांनें तपासून पाहिलीं. त्यावरून "स्त्रियांनीं पुरुषाप्रमाणें अभ्यास केल्यास त्यांच्या वाणींतील माधुर्य नाहींसें होऊन त्यांना गायन चांगलें येत नाहीं. कारण, त्यांचा स्वरच जो स्वभावतः मंजूळ असतो तो कर्कश होऊन जातो" असा त्यानें सिद्धांत काढिला आहे व हा सिद्धांत फारच लक्ष्यांत ठेविण्यासारिखा आहे. गृहव्यवस्था चांगली ठेवण्यापुरतें व नीतितत्वें अंतःकरणांत चांगलीं बिंबण्याइतकें शिक्षण स्त्रियांना अवश्य दिलें पाहिजे. परंतु, त्यांच्या शिक्षणाकरितां हायस्कूलें स्थापन करून त्यांना परिक्षा द्यावयास लावणें हें सृष्टीच्या विरुद्ध आहे व त्याच्या योगानें त्यांची शरीर प्रकृति नीट रहाण्याचा संभव नाहीं. "स्त्रियांना जन्मतःच मंजूळ स्वर गंधर्वांनीं दिलेला आहे" अशा अर्थाचीं स्मृतिवचनें आहेत आणि स्त्रियांचा स्वर पुरुषापेक्षा मंजूळ असतो हा सर्व जगताचा अनुभवही आहे. तेव्हां हायस्कूलें स्थापन करून मुलींना परिक्षेस पाठवूं पहाणाऱ्या लोकांनीं स्त्रियांची आपण एक निसर्गदत्त देणगीच हिरावून घेत आहोंत हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें.

योग्य अभिमान— बोअर लोक आपला वेगळा पक्ष करून आपलें राष्ट्रीयत्व कायम ठेवणार आहेत. या कामीं त्यांस मदत करण्यासाठीं डा० लीड्स यानें आपल्याजवळ एक मोठी रक्कम ठेविली असून, ज० बोथानें आपल्या प्रवासांत जुळविलेल्या वर्गणीचा कांहीं भागही तो त्यांत भरतीस घालणार आहे. अशी इच्छा हिंदुस्थानास होईल का?

सरकारची कृपादृष्टी—सर्व सरकारी नोकरांस दिसेंबर महिन्याचा पगार नेहमीं प्रमाणें पुढील महिन्यांत न देतां, दरबारा निमित्त २३ दिसेंबर रोजीं देण्याचे सरकारानें ठरविलें आहे असें ह्मणतात! ह्या सवलतीनें चैनीसाठीं गरिबांच्या हातीं अगाऊ पैसा येईल.

गव्होक्तीचा निरोप—मुल्लाचे लोक कडवे आहेत. अर्थात शिवावर उदार आहेत. यांजकडून इंग्रेज सरकारच्या सेनापतीस असा निरोप गेल्याचें कळतें कीं, तुमचें काळें सैन्य इकडे आणूं नका. त्यांना कापून आमच्या लोकांच्या तरवारी तीक्ष्ण झाल्या आहेत; तर गोरें सैन्य घेऊन या? या त्यांच्या उद्धामपणाच्या निरोपामुळें, इंग्रेजी सेनापतीच्या मनांतून त्यांची लौकरच चांगली खोड मोडावयाची आहे, पण मुल्लाच्याहि मनांत इंग्रजांची खोड मोडायाची आहे हें विसरतां कामा नये.

नवीन युक्ती— फ्रान्स देशांत रसायनिक माणकें करण्याची कला साध्य झाली आहे. हीं माणकें खऱ्या माणकांतून निवडून काढितां येत नाहीं.

विलायतेंतील पुष्कळ शाळांत—विशेषतः चित्रशाळांत—मुलांस दोन्ही हातानीं चित्रें काढण्यास शिकविण्याचा प्रघात पुष्कळ दिवसांपासून चालूं आहे. अशा प्रकारची कला संपादन करण्यास श्रम व वेळ फार लागत नाहीं व एकदां साध्य झाल्यावर दोन्ही अंगीं नक्षी वगैरे चांगली काढतां येते आणि डोळ्यांस व हातांस उत्तम वळण मिळतें असा तिकडे अनुभव आला आहे.

माहामारीचो अटकळ— आकाशांत घारी दिशेनाशा झाल्या कीं पटकी येणार आणि त्या दिसूं लागल्या कीं पटकी बंद होणार असें समजावें. अनुभवानें ठरविण्याची गोष्ट आहे

मेलेली जिवंत झाली— काके येथें एक वृद्ध बाई मेली. त्या देशाच्या चालीप्रमाणें तीन दिवस प्रेत ठेवण्यांत आलें. चवथे दिवशीं तिला पुरण्यास न्यावयाचें तों ती बाई पुन्हां जिवंत होऊन उठून बसली. मृत्यूची परिक्षा आतांच्या डाक्टरानाहि होत नाहीं मग इतरांस कोठून होणार!

संन्निपात ज्वरावर उपाय— गोव्याकडे जी ... जूची दारू करितात ती सन्निपात ज्वर हटकून हटविते असें ह्मणतात. ती जरूर संग्रही ठेवावी.

आठ लक्ष बनवट रुपये— एका मनुष्यानें आपल्या घरीं सरकारच्या रुपया सारखे आठ लक्ष रुपये पाडून ते प्रचारांत खेळते केले. आणि त्याचें तें कृत्य आज पर्यंत कोणासही उमगलें नाहीं. आतां तें बाहेर आलें आहे. रुपयाच्या मुखवट्याच्या मागच्या बाजूस वेलबुट्टीचें जें एक चक्र असतें त्याच्या खालच्या कमळावर त्यानें आपण तयार केलेल्या रुपयाची वेगळी खूण केली आहे. पहिले एक लक्ष रुपये अगदीं सरकारच्या रुपयासारखेच आहेत. दुसऱ्या लाखावर त्या कमळाच्या वरच्या बाजूस एक टिंब दिलें आहे. तिसऱ्या लाखास दोन, चौथ्यास तीन, पांचव्यास चार, सहाव्यास पांच, सातव्यास सहा, आणि आठव्यास सात अशीं टिंबें दिलीं आहेत. वेगळाले रुपये हातांत घेऊन पाहिले ह्मणजे त्यानें सांगितलेलीं टिंबें बरोबर जमतात, रुपयांचें वजन सरकारी रुपयांच्या

बरोबरीचें असून चांदी व हिणकस यांचेंही प्रमाण सारखें आहे. त्याच्या रुपयांपासून कांहीं तोटा नाहीं. मात्र इतकेंच कीं, रुपये टंकसाळींतून पाडून देण्याकरितां सरकार जें शेंकडा २९ रुपये घेतें तें त्यानें आठ लाखांत सरकारास न देतां आपण घेतले आहेत. आपली ही कृति आजपर्यंत कोणासही उमगली नाहीं याचें त्यास फार आश्चर्य वाटत असून आतां त्यानें आपला व्यवहार बंद केला आहे असें म्हणतात.

**रेशमी वस्त्र कसें धुवावें**— कांहीं बटाटे शिजवून त्याचे तुकडे करावे नंतर ते गार पाण्यांत घालून व मळून त्या पाण्याशीं मिळवावे तें पाणी २४ तास तसेंच स्थिर ठेवल्यानंतर बटाट्याचा साका तळाशीं बसेल. वरील निवळ पाणी दुसऱ्या भांड्यांत ओतून त्यांत रेशमीवस्त्र बुडवून त्यांत चांगलें चोळावें व धुवावें, नंतर तें न पिळतां तसेंच दोरीवर वगैरे पसरून दोहों बाजूंनीं एका स्वच्छ कापडानें तें पुसावें. त्यास गुळगुळीतपणा आणणें इष्ट वाटल्यास थोडीशी उष्णता दिलेली इस्तरी त्यावर फिरवावी. ही कृती केली असतां रेशमी कापड खराब न होतां स्वच्छ तकतकीत होतें. अनुभव करून पहावें.

**कडकडाटानें ऐकूं येणें**— ब्रह्मदेशांमध्यें एका मनुष्यास ६ वर्षे ऐकूं येत नव्हतें परंतु त्या घराजवळ विजेचा मोठा कडकडाट झाला. त्यापासून त्यास आतां ऐकूं येऊं लागलें आहे. प्रचंड आवाजानें बहिऱ्या मनुष्याच्या कानांतील आड आलेले पडदे फुटून त्यास ऐकूं येण्याचा संभव आहे.

**भयंकर काटकसर व दक्षता**— कै० श्री० महाराज तुकोजीराव होळकर शिवाय कै० मातुश्री अहिल्याबाईसाहेब होळकर वगैरे पूर्वजांचे श्राद्धपक्ष राजवाड्यांत नेहमीं होतात तेव्हां तिलोदक, यवोदक याबरोबर एक एक रुपया टाकण्याची वहिवाट आहे. आजपर्यंत हल्लीं शिक्का चालत असल्यानें होळकरशाही रुपया टाकण्यांत येई. पण आतां तो शिक्का बंद होऊन कलदार रुपया सुरू झाला व हा दुसरा रुपया सुमारें तीन आण्यांनीं मोठा आहे. तेव्हां हा सबंध रुपया टाकल्यास वहिवाटीपेक्षां ज्यास्त खर्च केला असें होईल, यासाठीं रुपयाचे ऐवजी तेरा आण्याचे पैसे टाकण्यांत येऊं लागले आहेत ! ! ही गोष्ट खरी असेल तर इतक्या बारकाईनें कारभार चालविणारांची शाबास म्हटली पाहिजे ! उद्यां बाजारांत टक्क्याचा भाव छदामभरानें कमी किंवा ज्यास्ती झाला तर सदर अधिकाऱ्यांनीं छदामाच्या कवड्या तिलोदकांत टाकूं नये म्हणून मिळविली!

इंग्रजीच पत्र काय म्हणतें पहाः—

( १ ) नकाशा न पाहतां सोमाली लँड कोठें आहे हें हजार इंग्रजांत एकासही सांगतां येणार नाहीं. ( २ ) सोमाली लँडशी इंग्रजांचा संबंध काय ? हें दाहा हजारांतील एका इंग्रजासही ठाऊक नाहीं. ( ३ ) सोमाली लँडचें कांहीं झालें तरी फिकिर करणारा एक लाखांत एकही इंग्रज सांपडणार नाहीं ! ! कारण हे हाभीमुल्ला वेडा नसून जॉनबुलच वेडा आहे ! ! "

**महाराष्ट्र भाषेचा अभिमान धरा**— "आपणास आलेलें मराठेपण कायम ठेवणें असेल तर आपण मराठी भाषा कायम ठेविली पाहिजे. इतर भाषांपमाणें तीमध्यें तुर्त सामर्थ्य नसलें तर तो दोष तिचा नसून आमचा आहे. मराठी भाषा आपली आहे व तिचा प्रसार आपणच केला पाहिजे.

ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, रामदास, एकनाथ, मोरोपंत, श्रीधर, वामनपंडित, मुक्तेश्वर इत्यादि अनेक कवींनीं महाराष्ट्र भाषेचा उद्धार केला. महाराष्ट्र भाषा इतर कोणत्याही भाषेपेक्षां योग्यतेनें कमी नाहीं असें त्यांनीं दाखविलें. अति गहन विषयांचा त्याच भाषेंत त्यांनीं उहापोह केला. तर ती मराठी भाषा चांगली नाहीं असें कोण म्हणेल ? आपल्या भाषेचा अभिमान धरा. ती कांहीं अगदींच नादान खचीत नाहीं. "

---

## खर्डा.

( १९ व्या राष्ट्रीय सभेपुढें येणाऱ्या विषयांचा. )

१ ला—चक्रवर्ती महाराज एडवर्ड ७ वे बादशहा यांच्या राज्यारोहणाचा समारंभ जो दिल्लीला जानेवारीच्या १ ले तारखेला लवकरच होणार आहे त्या समारंभाला अनुलक्षून राष्ट्रीय सभा आपला प्रणामपूर्वक नम्रभावानें प्रेषित करीत आहे. आणि राष्ट्रीय सभेला मोठी उमेद आहे कीं श्रीमंत सरकारच्या कारकिर्दींत सर्व राज्यभर शांतता, संपदा आणि स्वस्थता वास करितील, व तसेंच कैलासवासी महाराणी सरकारांनीं आपल्या जाहिरनाम्यांत जीं अभिवचनें दिलीं आहेत तींच अभिवचनें खुद्द श्रीमंत चक्रवर्तींनीं कृपाळू होऊन इंडियन लोकांस संदेशरूपानें पुनरुक्त केलीं आहेत त्या अभिवचनांची परिपूर्ती क्रमाक्रमानें व सर्वपरीनें आपल्या कारकिर्दींत होऊन या कारकिर्दीची चांगली आठवण राहील असा राष्ट्रीय सभेला भरंवसा आहे. हा १ ला ठराव अध्यक्षच सभेपुढें मांडतील.

२ रा ठराव— युनिव्हरसिटी कमिशनाच्या रिपोर्टातील गोष्टी संबंधानें इंडिया सरकारानें स्थानिक सरकारांला जें एकवट पत्र लिहिलें आहे त्या पत्राबद्दल राष्ट्रीय सभा इंडियन सरकाराचे नम्रपणानें आभार मानते. लोकांच्या मनांत जी चलबिचल उत्पन्न झाली होती ती थोडीशी या पत्रानें शांत झाली आहे आणि या पत्रावरून आतां असें वाटतें कीं कमिशनाच्या सूचना अंमलांत आणितांना सरकार लोकमताला योग्य मान देईल. कमिशनाच्या पुष्कळ सूचना संबंधानें राष्ट्रीय सभेला मोठीच भिती वाटते. या सूचना पसंत केल्या तर गेल्या अर्धशतकांत ब्रिटिश सरकारानीं उच्च मतीच्या विद्यादाना विषयीं जें धोरण सतत ठेविलें आहे तें धोरण बदलेल आणि त्या बदलण्यानें उच्च शिक्षणाचा प्रसार संकोचित होईल; त्या शिक्षणाचा लाभ विशिष्ट लोकांसच मिळेल व हल्लीं युनिव्हरसिटींना जें थोडेंबहूत स्वातंत्र्य आज मितीला मिळत आहे तेंही लयास जाईल अशी राष्ट्रीय सभेस मोठी भीती वाटत आहे.

कमिशनाच्या सूचना पैकीं राष्ट्रीय सभेचा आक्षेप ज्या विशेष सूचना संबंधानें आहे त्या येणें प्रमाणें :—

( अ ) विद्यमान सेकंड ग्रेड कॉलेजापैकीं जीं पहिल्या ग्रेडच्या योग्यतेला येतील, तीं खेरीज करून बाकीचीं बंद करणें; आणि [illegible] जास[illegible] ठरवून दे[illegible]

( क ) [illegible] राष्ट्रीनीं त्या[illegible] त्या मनांत न आणितां [illegible]मध्यें अभ्या[स] साचा एकच एक क्रम सुरू करणें.

( ड ) प्रत्येक इलाख्या करितां किंवा प्रांताकरितां एकच सेंट्रल लॉ कालेज स्थापन करून कायद्याच्या शिक्षणाचा मक्ता त्याच संस्थेकडे ठेवणें.

( इ ) खासगी शाळांचें अस्तित्व विद्याखात्याच्या डायरेक्टराच्या मान्यतेवर ठेऊन मध्यम प्रतीचें शिक्षण सर्वस्वी डायरेक्टराच्याच हातीं देणें.

( एफ ) सिनेट व सिंडीकेट यांची सत्ता अधिकाऱ्यांच्या हातीं देऊन युनिव्हरसिटीच्या संस्थेला वस्तुतः सरकारी खात्याचें रूप देणें.

३ रा ठराव—हिंदुस्थानांतील लोकांच्या घोर दारिद्र्याकडे हिंदुस्थान सरकारानें लक्ष्य पुरवावें अशी राष्ट्रीय सभेची कळकळीची विनवणी आहे; पुरुषलेंकरून हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचा व कारखान्यांचा ऱ्हास झाल्यामुळें, या देशांतील संपत्तीचा ओघ वर्षानुवर्षे देशाच्या बाहेर गेल्यामुळें, करांचा बोजा फार वाढल्यामुळें व जमिनीचा धारा अमर्यादित वाढल्यामुळें हें दारिद्र्य पसरलें आहे व ह्यामुळें सर्व देश इतका ग्रस्त झाला आहे कीं दुष्काळाला प्रारंभ होतांच पुष्कळच लोकांना सरकारी रिलीफ कामावर जाऊन उदरनिर्वाह करावा लागतो. आणि ह्मणून राष्ट्रीय सभा मुख्यत्वें करून खालील उपाय सुचवीत आहे :—

( अ ) देशी कलाकौशल्याचें कारखान्यांचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं व त्यांची अभिवृद्धी करण्यासाठीं आणि तसेंच नवे उद्योगधंदे चालू करण्यासाठीं राजाश्रय मिळाला ह्मणजे कांहींसा कार्यभाग सिद्धीस जाईल.

( ब ) देशांतील मुख्य मुख्य ठिकाणीं औद्योगिक शाळा व कालेजें सरकारांनीं कृपावंत होऊन स्थापित करावीं.

( क ) १८६२ व १८६७ सालीं स्टेट सेक्रेटरींनीं ज्या अटी घालून ठेविल्या आहेत त्या अन्वयें ज्या प्रांतांत कायमचा धारा चालू करण्यासारखा आहे तेथें धारा कायमचा करावा. आणि जेथें कायमचा धारा ठेवणें शक्यांतक नाहीं तेथें निदान सारा जबरदस्त न बसविण्यासंबंधानें कांहीं प्रतिबंध घालून ठेवावे.

( ड ) सरकारी चाकरी मधील उच्च दर्जाच्या जागी नेटिवांच्या नेमणुका अधिकाधीक होत गेल्या तर या देशाची पुष्कळशी संपत्ती परदेशीं जात आहे. तिला कांहींसा प्रतिबंध तरी होईल.

[ यापुढील मजकूर दोन पानावर पाहा ]

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.